
# गिरनार अनुभूती

## दिव्यत्वाची जेथे प्रचिती



दत्तदास

# गिरनार अनुभूती (भाग १)

दिव्यत्वाची जेथे प्रचिती


## अनुभव संपादक

## दत्तदास

(Team Made For Marathi & JK Bhakti)

## अक्षरजुळणी

### दत्तदास

(Team Made For Marathi & JK Bhakti)

ई-मेल : work.jkmedia@gmail.com

वेबसाईट : www.jkbhakti.in

**यूट्यूब चॅनल** : made for marathi & **दत्तदास**(dattadas)


या आवृत्तीचे सर्व हक्क सुरक्षित आहेत. या पुस्तकातील कोणताही मजकूर कोणत्याही छापील, मौखिक, इलेक्ट्रॉनिक अथवा अन्य प्रसार माध्यमातून वापरायचा किंवा संग्रहित करायचा झाल्यास प्रकाशकाची व लेखकाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

# समर्पण

गुरुवर्य श्रीदत्त ज्यांच्या कृपेने, प्रेरणेने या ग्रंथ निर्मितीची कल्पना मनी आली आणि या ग्रंथ निर्मितीसाठी अनेक जण धावुन आले. या ग्रंथ निर्मितीसाठी ज्यांनी आपले दिव्य अनुभव आम्हाला पाठवले त्या सर्व दत्तप्रिय भक्तांना व श्रीगुरुचरणी आदरपूर्वक समर्पित....



# विषयानुक्रमणिका


- **मनोगत**

❖ **नास्तिकापासून दत्तमय होण्यापर्यंतचा प्रवास** (श्री. रामदास गुंजाळ, पुणे) .

❖ **पहिली गिरनारवारी गुरुपौर्णिमेची** (सौ. आशाताई पवार, सातारा)

❖ **गिरनार यात्रा : एक विलक्षण दत्त अनुभव** (श्री. सचिन भोगाडे, पारनेर)

❖ **माझी पहिली गिरनारवारी** (श्री.आकाश खडके, पुणे)

❖ **गिरनार : अविस्मरणीय स्वानुभूती चिंतन** (श्री. अतुल घुले, पुणे)

❖ **गिरनार यात्रा : दिव्यत्वाची प्रचिती** (डॉ.सौ. शितलताई मालुसरे, महाड रायगड)

❖ **स्वामी कृपेची साथ : गिरनारवारीचा अलौकिक अनुभव** (सौ. स्मिता पाटील, बोरीवली)

❖ **माझी अविस्मरणीय गिरनारवारी** (श्री. मंगेश वैद्य, नाशिक)

❖ **गिरनारवारी : एक अनाकलनीय अनुभव** (सौ. गिरीजा सावरकर, रत्नागिरी)

❖ **माझी अनोखी गिरनारवारी : श्वानाच्या रुपात दत्तदर्शन** (सौ. रुपाली साठे, पुणे)

# मनोगत

**अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त.**

**गुरूर्ब्रम्हा गुरूर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा.**

---

भूतलावरील सर्व प्राणीमात्रांमध्ये मनुष्य हा सर्वश्रेष्ठ समजला जातो. सारासार विचार करण्याची बुद्धिमत्ता त्याच्याकडे असते. असे असले तरीही आपण पाहतो की सर्वच जण आपल्या बुद्धीचा सुयोग्य वापर करतातच असे नाही. सदसद्विवेकबुद्धीने सत्कर्माचे आचरण केले तर जीवन सफल होऊन आंतरिक समाधान लाभते. मानवी देह हा नश्वर आहे परंतु या मानवी देहाला ईश्वराची साथ लाभली तर जीवन किती सुखदायी आणि मौल्यवान ठरेल. प्रत्यक्ष परमेश्वर जर त्याचा सोबती झाला तर ' जणू देह ही पंढरी आत्मा हा विठ्ठल ' असा प्रत्यय आल्यावाचून राहणार नाही. मनुष्य जन्मामध्ये बालपण, तारुण्य आणि वार्धक्य या अवस्थांमधून मार्गक्रमण करत असतानाही अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. काहीजणांचे जीवन अगदी सुखमय असते तर काहीजणांना अतिशय खडतर, क्लेशदायक प्रसंगांना सामोरे जावे लागते. हे असे का बरे घडते. याचे उत्तर आहे पूर्वजांची पुण्याई आणि आपले कर्म. पूर्वजांची पुण्याई तर आपल्या हातात नसते. आपल्या हातात असते ते केवळ आपले कर्म आणि ते कर्म नुसते कर्म नव्हे तर सत्कर्म घडवायचे आपल्या हातात आहे. सत्कर्माची जोड असेल तर आयुष्य कसे अगदी हवेहवेसे वाटते कारण त्याचे फलित असते निखळ परमानंद आणि अलौकिक समाधान. आपल्या हातून सत्कर्म घडवायचे असेल तर त्याला साथ पाहिजे पूज्य अशा गुरूंची. या जगात पाऊल ठेवताना आपणाला प्रथम भेट होते ते आपले प्रथम गुरू म्हणजेच आपले आई वडील की जे प्रत्यक्ष ईश्वराचे रूप असते. म्हणूनच म्हणतात ना मातृपितृ देवोभव. नंतर आपल्या आयुष्यात अनेक चांगले वाईट गुरू भेटतात. चांगले गुरू चांगल्या वळणावर नेतात तर काही आयुष्य उध्वस्त करून टाकतात. आई वडिलांनंतर

आपल्याला जे शिक्षण देतात ते शिक्षक हे आपले खूप महत्वाचे गुरू असतात की जे आपणाला आयुष्याच्या वाटेवर घडवतात आणि आपल्या आयुष्याला दिशा मिळते. इतरही अनेक  गुरू मनुष्य जन्मात भेटत राहतात.

आपले आयुष्य ज्यांच्या आधीन आहे तो प्रत्यक्ष भगवान जर आपणाला गुरू म्हणून भेटला तर जीवन किती कृतार्थ वाटेल नाही का. ज्यांना आपण गुरूचा देव म्हणतो ते भगवान गुरुदेव दत्तात्रेय जर आपल्या जीवनात आले आणि त्याची कृपादृष्टी या पामरावर राहिली तर परमसुखाचा मेवाच नाही का. आपणाला माहीत असेलच की या जगतनियंत्या भगवान दत्तगुरूंनी चक्क २४ गुरू मानले आहेत किंबहुना त्यांनी त्या सर्वांकडून खूप सारा बोध आणि शिकवण अवगत करून ती आपणापुढे शिकवण म्हणून ठेवली आहे. भगवान दत्तात्रेयांनी गिरनार पर्वतावर १२००० वर्षे अविरत तपश्चर्या केली आहे. त्यांचे येथे चिरंतन वास्तव्य आहे. गिरनार म्हणजे प्रत्यक्ष गिरीनारायण आणि दत्तगुरु यांचे हे सुंदर असे नाते आहे. अत्री अनुसुया नंदन श्रीदत्तमाऊली अनेक भक्तांचे प्रेरणास्रोत आणि जीवनाचा श्वास आहे की जो भक्तांच्या आयुष्यात आजीवन भक्तिमय गंध पसरवतो. अशा या भगवान श्रीदत्तगुरूंची साथ आयुष्यात लाभणे इतके सहज आणि सोपे नाही. त्यासाठी आवश्यक आहे सत्कर्माची जोड, निस्वार्थ भाव, अहंकाराचा त्याग आणि मुखी दत्तगुरूंचे गोड मधुर असे नाम. हे असेल तर त्यांची साथ मिळणार हे नक्की. अनेक भक्त मोठ्या श्रद्धेने आणि दत्तभेटीची आस ऊरी बाळगून या पावन ठिकाणी दत्तदर्शनासाठी जाऊन दत्तमय होऊन जातात. त्यांच्या हाकेला ती दत्तमाऊली आली नाही तर नवलच. अनेकांना सुखद असे अनुभव या ठिकाणी प्रत्ययाला येतात आणि जीवन कृतार्थ करून टाकतात. प्रत्यक्ष दत्तमाऊली भेटल्याचे निखळ समाधान भक्तांच्या चेहऱ्यावर झळकते आणि स्वर्गीय सुखाचा अनुभव येतो. भक्त त्या दत्तमाऊलींवर एव्हढा जीव ओवाळून का टाकतात याचे उत्तर प्रत्येक भक्ताला गिरनार गुरुशिखर येथील दत्तपादुका दर्शन करताना निश्चितच मिळते.

याच विषयाला धरून माझ्या मनी विचार आला की आपण दत्तगुरूंची शिकवण आणि भक्तांना आलेली अनुभूती जनमानसात पोहोचवून भक्तांना श्रीदत्त सेवामार्गात आणण्यासाठी प्रेरित करावे. मीही अशाच अनुभवांतून प्रेरित होऊन श्रीदत्त सेवाकार्यात जोडलो गेलो आहे.

मी आत्तापर्यंत अनेक भक्तांचे दत्तमार्गातील अनुभव विशेषतः गिरनार परिक्रमा आणि गुरुशिखर दर्शन अनुभव यूट्यूबवर व्हिडिओ द्वारे भक्तांसाठी उपलब्ध करून दिले आहेत आणि त्यामुळे अनेक भक्त प्रेरित होऊन दत्त सेवाकार्यात जोडले गेले आहेत.

या पुस्तकामध्ये मी अशा बऱ्याच प्रेमळ दत्तभक्तांचे गिरनार अनुभव लिहिले आहेत की जे आपणा सर्वांना प्रेरणादायी राहतील आणि अनेक भक्त या दत्त सेवाकार्यात सामील होऊन आपले जीवन सफल करून भगवान श्रीदत्तगुरूंचा कृपाशिर्वाद मिळवण्यास पात्र होतील याची मला खात्री आहे.

हे पुस्तक लिहिण्यासाठी ज्यांनी मला प्रेरणा दिली त्या प्रभू श्री दत्तात्रेय यांच्या चरणी माझे शतशः वंदन. या पुस्तकातील अनुभव वाचून जर कुणी भक्त दत्तसेवेत जोडले गेले तर तो मी माझ्या भगवान श्री गुरुदेव दत्तात्रेयांचा आशीर्वाद समजेल. अनावधानाने जर हे पुस्तक लिहिताना काही चूक झाली असेल तर मी तुमचा क्षमाप्रार्थी आहे. संसार आणि पारमार्थिक जीवन मार्गक्रमित करत असताना या दोन्ही गोष्टींची उत्तम अशी सांगड साधून जीवन सार्थक करण्यासाठी हे मौलिक असे गिरनार अनुभव आपणासाठी निश्चितच मोलाचे ठरतील याची मला निसंदेह खात्री आहे. माझ्यासारख्या भोळ्या भाबड्या भक्ताचा हा छोटासा प्रयत्न सर्व वाचक गोड मानून घेतील अशी मी आशा व्यक्त करतो. माझे हे पुस्तक लेखन एक निमित्त आहे बाकी सर्व काही त्या दत्त माऊलींची कृपादृष्टी आपणाला हा भवसागर पार करण्यासाठी समर्थ आहे. सर्व प्रिय वाचकांना माझा सादर प्रणाम आणि मंगलमय आयुष्यासाठी शुभेच्छा. मी हे पुस्तक माझे गुरु श्रीदत्तमाऊली चरणी समर्पित करतो आणि हे अनुभव आपणा

सर्वांना जीवन सार्थक करण्यकामी फलदायी राहो अशी मी दत्तचरणी लीन होऊन प्रार्थना करतो.

**II अपराधी पातकी या स्वीकार लेकरासी II**

**II दत्ता दयाघना रे दे ठाव पावलांसी II**

**- दत्तदास**



( गिरनार पर्वत)

# नास्तिकापासून दत्तमय होण्यापर्यंतचा प्रवास

**श्री.रामदास गुंजाळ, पुणे**



सर्व प्रथम माझे गुरु श्री दत्तात्रेय प्रभू यांच्या चरणाशी नतमस्तक होतो. हे दत्तात्रेया मी तुम्हांस प्रार्थना करतो की माझे जीवन सदैव तुमच्या सेवेत रुजू राहू दे. हा अनुभव लिहिण्यामागे कुठलाही अहंकार मनामध्ये येऊ नये हा प्रामाणिक प्रयत्न असून जर मी यामुळे काही भक्त आपल्या सेवेत जोडू शकलो तर मला कृतार्थ वाटेल. हे दयावरा जर अनावधानाने चूकभूल झाल्यास दयेस पात्र करून घ्या.

**॥ गुरु माझा मायेचा सागर ।**

**दिला त्याने जीवना आकार ॥**

लहानपणापासून मी तसा नास्तिकच होतो. देवाविषयी मनामध्ये पाहिजे तशी श्रद्धा नव्हती. वयाच्या ३२ वर्षानंतर प्रथमच परमेश्वराबद्दल ओढ निर्माण झाली. त्याचे कारण बनले माझे प्रथम गाणगापुर दर्शन. त्या दिवसापासून दत्तमाऊली माझे प्रेरणास्थान बनले. आतापर्यंत मी तीन वेळा गाणगापुरला जाऊन आलो आहे. लॉकडाऊननंतर २२ नोव्हेंबर २०२१ मध्ये लग्न समारंभामुळे मी व माझे कुटुंबीय तेलंगणा येथे गेलो होतो. त्यावेळी परतत असताना २३ नोव्हेंबरला आम्हाला माहूरला जाण्याचा योग आला. जणू काही दत्त माउलींनीच कृपादृष्टी करून हा योग जुळवून आणला होता. आम्ही त्यादिवशी माहूरगडला पोहोचलो. गडावरील वाटेत खूप सारी वानरे जणू काही आमच्या प्रतिक्षेची वाट पाहत होती असे वाटत होते. आम्हीही थांबून त्यांच्याशी संवाद साधत होतो. डोंगरावरून सभोवारचा निसर्ग खूप नयनरम्य दिसत होता. आम्ही सर्वांनी तेथे

दत्तगुरु व रेणुकामाता देवीचे दर्शन घेतले. तसेच अत्रीऋषी आणि अनुसूयामाता यांचेही छान दर्शन झाले. दत्तगुरूंच्या दर्शनाने मी धन्य पावलो असे वाटत होते. एकदा दर्शन घेऊन बाहेर आलो पण मन भरले नाही म्हणून पुन्हा दर्शनास गेलो आणि अक्षरशः डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. दत्त माझी माता दत्त माझा पिता असा कृतार्थ भाव जागृत झाला होता. तेथून अजिबात निघावेसे वाटत नव्हते. मनामध्ये परत केव्हा भेट होईल असे वाटत होते. जड अंतःकरणाने मी तेथून निघालो. त्या रात्री आम्ही तेथेच मुक्काम करण्याचे ठरविले. आम्ही एका हॉटेलमध्ये थांबलो. दुसऱ्या दिवशी गावी जायला निघायचे होते. रात्रभर झोप लागली नाही. मनात विचार येत होता की पुन्हा सकाळी दर्शनाला जायचे. मी माझी दत्तदर्शनाची आस माझ्या कुटुंबियांजवळ सकाळी उठल्यावर बोलून दाखवली आणि सर्वांनी काहीही आढेवेढे न घेता संमती दाखवली. मनोमन खूप आनंद झाला. पुन्हा एकदा दत्तगुरूंचे दर्शन होणार या विचाराने खूप प्रसन्न वाटत होते. सकाळी लवकर आटोपून आम्ही सर्वजण दर्शनास गेलो. खूप छान दर्शन झाले. आमच्या परतीच्या प्रवासात क्षणोक्षणी या गोड आठवणींनी मन भरून येत होते. आजही मला माहूरच्या रेणुकामातेच्या मुखातील विडा व प्रसाद घरपोच येतो. आणि पुन्हा तेथील दर्शनाचा प्रत्यय येतो.

असेच आयुष्य मार्गक्रमण करत असताना पुन्हा दत्तगुरूंचे दर्शन केव्हा होईल असे विचार सारखे मनामध्ये घोंगावत होते. अशातच एकदा गिरनारला दत्तगुरूंनी १२००० वर्ष तपश्चर्या केली असे ऐकण्यात आले आणि त्यानंतर सतत गिरनारला जाण्याचा केव्हा योग येईल असे विचार मनात येत होते. गिरनारसंबंधी बरेच व्हिडिओ पाहण्यास सुरुवात केली. अनेकांचे गिरनारवारीचे अनुभव युट्युबला पाहिले आणि आपणही केव्हा गिरनारला जाऊ हेच विचार सतत मनात डोकावत होते. म्हणतात ना मनी वसे ते स्वप्नी दिसे. परंतु हे स्वप्न सत्यात उतरणार याची खात्री वाटायला लागली. असेच एकदा मी सहजच माझ्या कंपनीतील सहकाऱ्याजवळ माझ्या गिरनारदर्शन ओढीबद्दल बोललो आणि काय आश्चर्य त्याने क्षणाचाही विलंब न लावता जाऊ कि आपण असे वक्तव्य केले. हा माझ्यासाठी पहिला संकेत होता. मी मनोमन खूप सुखावलो.

केव्हा एकदा हा योग येईल असेच सारखे वाटत होते. असेच एके दिवशी आमचे गिरनारला २०२२ च्या दिवाळीमध्ये जाऊ असे ठरले. माझ्या सहकाऱ्याची आई हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असताना मी भेटायला गेलो होतो. माझ्या सहकाऱ्याने त्यांच्या आईला सांगितले की आम्हा दोघांना गिरनारला जायचे आहे आणि त्यांनी तत्पर ' तुमचे गिरनार दर्शन होईल ' असे बोलून जणू काही आशीर्वादच दिला आणि तत्क्षणी आम्हाला खूप बरे वाटले. हा आमच्यासाठी दुसरा संकेत होता. त्यावेळी माझे सहकारी यांचे ज्येष्ठ बंधू समवेत होते. तेही म्हणायचे तुमचे गिरनार दत्तदर्शन लवकरच होईल. तेही एकदा गिरनारला जाऊन आले होते. त्यानंतर क्षणोक्षणी दत्तभेटीची ओढ लागून राहिली होती. अशातच २०२२ च्या जून महिन्यात माझ्या सहकाऱ्याच्या बंधूने थेट आमचे रेल्वेचे तिकीट आम्हाला न सांगताच बुक केले. आम्हाला सोरटी सोमनाथ करुन गिरनारला जायचे होते. म्हणून त्यांनी मुंबईहून बांद्रा टर्मिनस ते वेरावळ पर्यंतचे तिकीट बुक केले होते. असे म्हणतात की जर तुम्ही मनातून गिरनारला जायचे ठरविले तर काही गोष्टी आपोआप घडतात. असेच आमच्या तिकीटाबाबत घडले होते. मनोमन आम्हाला त्यांच्या ह्या गोष्टीचे खूप नवल वाटले. दुसऱ्याच्या समाधानात आनंद शोधणे आणि मदत करणे जणू काही दत्तगुरुंनीच त्यांना हे सुचविले असावे असे वाटले. आता तर आमचे गिरनारदर्शन नक्की होणार या विचाराने मन भारावून गेले होते.

खूप ऐकले होते की गिरनार दर्शन तसे सोपे नाही. भक्ती, साधना, पूर्व जन्मीचे संचित, शरीराची साथ, निस्वार्थ भाव, अहंकाराचा त्याग आणि सर्वात महत्वाचे दत्तप्रभूंच्या आशीर्वादाशिवाय तुमचे गिरनार दर्शन होऊच शकत नाही. नव्हे नव्हे मनी प्रबळ इच्छा, भाव आणि त्यागाची भावना असेल तर दत्तप्रभूच आपणाकडून हे करवून घेतात. असे असले तरी १०००० पायऱ्या चढणे इतके सोपे नाही हे ऐकण्यात आले होते. म्हणून आम्ही अगोदरच डोंगर चढण्याची प्रॅक्टिस करण्याचे ठरविले. एक महिना अगोदर आम्ही पुण्यातील तळेगाव नजिक सोमाटणे फाटा येथील उंच डोंगरावर घोरावडेश्वर म्हणजेच महादेवाचे मंदिर आहे तेथे जाऊन प्रॅक्टिस करण्याचे ठरविले. नवरात्रकाळात २५ सप्टेंबरला प्रथम आम्ही घोरावडेश्वरला गेलो. सुरुवातीला खूप त्रास झाला कारण तशी आमची

काही प्रॅक्टिस नव्हती. आम्हाला चढायला साधारणपणे अर्धा ते पाऊण तास लागला. मंदिरात गेल्यानंतर प्रथम आम्ही महादेवाच्या पिंडीचे दर्शन घेतले. तेथे पिंडीजवळच गणरायाची मूर्ती आहे. दर्शन करत असतानाच गणरायाच्या मूर्तीला अगोदरच कुण्या भक्ताने अर्पिलेले जास्वंदाचे फुल अचानक खाली पडले. जणू काही साक्षात भगवंताने आमच्या गिरनार दर्शनासाठी कौलच दिला असे वाटले. खूप प्रसन्न वाटत होते. हा आमच्यासाठी तिसरा संकेत होता. त्यानंतर आम्ही पुढचे आणखी तीन रविवार याच ठिकाणी येऊन प्रॅक्टिस केली. इतकी प्रॅक्टिस करूनही गिरनार चढणे जमेल की नाही याबाबत साशंकता होती. शेवटी मनी कुठलाही अहंभाव न ठेवता सर्व काही दत्तगुरुंवर सोपवून दिले व तेच आपल्याकडून हे सर्व करून घेतील असे वाटत होते. या दरम्यान आमचे पुणे ते मुंबई, वेरावळ ते जुनागढ व परतीचे तिकिट बुक झाले होते. हे सर्व काही माझ्या सहकाऱ्याच्या बंधूंनी स्वेच्छेने केले होते. त्यांनी आमचे मुंबई बांद्रा ते वेरावळचे तिकीट तर आधीच बुक केले होते. आम्ही २१ ऑक्टोबर २०२२ रोजी गिरनारसाठी निघणार होतो. आमची उत्कंठा शिगेला पोहोचली होती. २१ ऑक्टोबरला सकाळी ७.१५ वाजता पुणे स्टेशनहून मुंबई दादरला डेक्कन क्वीन ट्रेनने निघणार होतो. अखेर तो दिवस आला. सकाळी घरून रिक्षाने पुणे स्टेशनला जायला निघालो. ६ वाजता घरून निघाल्यानंतर ६.३० वाजेपर्यंत स्टेशनला पोहोचण्याचा विचार होता. वाटेत अचानक एके ठिकाणी खूप ट्रॅफिक लागली. वेळेवर स्टेशनला पोहोचेल किंवा नाही याचेच टेंशन येऊ लागले. परंतु १५-२० मिनिटातच ट्रॅफिक मधून बाहेर पडलो आणि वेळेवर स्टेशनला पोहोचलो. पुण्याहून निघून दादरला उतरल्यावर आम्ही तेथून लोकल ट्रेनने बांद्रा टर्मिनसला गेलो.

आमची बांद्रा ते वेरावळ ट्रेन दुपारी १.४० वाजताची होती. तत्पूर्वी आम्ही स्टेशन शेजारील हॉटेल वृंदावन येथे जेवण केले. तेथील काउंटरवर बसलेला माणूस बघून का कुणास ठाऊक पण स्वामी समर्थांची आठवण आली. कदाचित त्यांची मुद्राच खूप प्रसन्न वाटत होती म्हणून की काय. जेवण झाल्यावर आम्ही बांद्रा स्टेशनला गेलो. आमची ट्रेन लागलेलीच होती. आम्ही थेट ट्रेनमध्ये जाऊन

बसलो. मनाला विश्र्वासच बसत नव्हता की आपण आता गिरनारसाठी निघालो आहे. खूप प्रसन्न वाटत होते. बरोबर दुपारी १.४० वाजता ट्रेन निघाली. आम्ही जय गिरनारी म्हणून प्रवासास सुरुवात केली. समोर फक्त आणि फक्त गुरुशिखर दिसत होते. केव्हा एकदा आम्ही पोहोचतो असे झाले होते. आमची ट्रेन दुसऱ्या दिवशी वेरावळला पोहोचणार होती. तेथून आम्ही सोरटी सोमनाथ दर्शन करून त्या दिवशी तेथेच मुक्काम करणार होतो. ट्रेन मधून प्रवास करताना शेजारील माणसेही खूप प्रेमळ गप्पा गोष्टी करत होती. का कुणास ठाऊक प्रवासातील सर्वजण खूप प्रेमळ जाणवत होते. आमच्या शेजारी एक वृध्द गृहस्थ बसले होते. ते गुजरात जवळील गावातच राहणारे होते. त्यांचे याआधीच गिरनार दर्शन झाले होते. तेव्हा ते आम्हाला सोरटी सोमनाथ आणि गिरनार बद्दल माहिती सांगत होते. जणू काही देवानेच त्यांची भेट घडवून आणली होती असे वाटत होते. प्रवासात खूप गप्पागोष्टी केल्या व उर्वरीत वेळी दत्त नामस्मरण चालू होते. काय तो आनंद वर्णावा सांगू शकत नाही. आम्ही दोघेही खूप आनंदी आणि प्रसन्न होतो. संध्याकाळी ५.४५ वाजता मला माझ्या मेहुणीशी बोलावे असे वाटले. मी स्लीपर कोचमध्ये माझ्या सीटवर एकटाच बसलो होतो. मी फोन लावला आणि बराच वेळ बोललो. बोलत असताना अचानक मला इतके रडू आले की मला पुढे एकही शब्द बोलायला जमत नव्हते. मी आवाज न करता गप्पच होतो. तिला वाटले फोनला रेंज नसेल म्हणून आवाज येत नाही की काय. तिने फोन ठेवला. मला राहवले नाही. मी पुन्हा फोन केला पण मी काहीच बोलू शकलो नाही कारण मी त्यावेळी खूपच भावूक झालो होतो. कारण ती माझ्या गुरुस्थानी आहे की जिच्यामुळे मला दत्तगुरुंची गोडी लागली होती. तिला पण रडू आले असे जाणवत होते. शेवटी मी पुन्हा फोन करेन असे सांगून फोन ठेवला. माझ्या मित्राने मला रडताना पाहिले परंतु तत्काळ काही विचारले नाही. मीही फक्त कुणाचा फोन होता ते सांगितले.

रात्रीच्या जेवणासाठी आम्ही घरूनच डबा आणला होता. आम्ही रात्री ९ वाजता जेवायला बसलो. आमच्या शेजारील सीटवर ते वृध्द गृहस्थ व त्यांचे कुटुंबीय सुध्दा जेवायला बसले. आम्ही एकमेकांना आमची भाजी शेअर केली.

जेवणाच्या शेवटी त्यांनी आणलेले ताक आम्हाला देण्यासाठी ते ग्लास शोधत होते. तितक्यात मळक्या वेशात एक गृहस्थ आमच्या शेजारून जाताना आमच्याकडे ताक मिळेल का असे विचारू लागला. ते शेजारील कुटुंबिय मोकळा ग्लास शोधत होते. तितक्यात आम्ही त्यांना ग्लास आणता का असे बोललो. हे ऐकून तो गृहस्थ तेथून पुढे जात पुढच्या एका सीटवर बसला. ग्लास शोधेपर्यंत आम्ही त्यांना चपाती भाजी देऊ केली परंतु त्यांनी नकार दिला व ताकाचीच मागणी केली. शेजारील कुटुंबिय ग्लास शोधत असतानाच तो गृहस्थ उठून पुढे निघून गेला. आम्हाला वाटले तो ग्लास घेऊन येईल. आम्ही वाट पाहत होतो. परंतु तो काही परत आलाच नाही. आम्हाला तत्क्षणी खूप वाईट वाटले. त्यांनी स्वतःहून आमच्याकडे ताक मागितले परंतु आम्ही देऊ शकलो नाही. असे म्हणतात की देव कधी कुणाच्या रुपात येईल हे सांगुही शकत नाही आणि ओळखुही शकत नाही. आमच्याकडून खूप मोठी चूक झाली याचे शल्य सारखे मनाला हुरहुर लावत होते. कोण असेल बरे तो गृहस्थ. आम्ही मनोमन देवाकडे क्षमा मागितली. जेवण झाल्यावर आम्ही रात्री साधारणपणे १०.३० वाजता झोपायला आपापल्या सीटवर गेलो. मला तर पुढील एक दीड तास झोपच येत नव्हती. सारखे मनामध्ये गिरनारबद्दल विचार येत होते. तसेच मनामध्ये प्रश्न घोंगावत होते आपण इतके भाग्यवान कसे की आपल्या नशिबात गिरनार दर्शनाचा हा योग आपसूकच आला. कुठल्या जन्माचे पुण्य म्हणायचे हे. ज्यांनी आपल्याला जन्म दिला त्या आईवडिलांबद्दल खूप अभिमान वाटत होता की ज्यांच्यामुळे आपल्या जन्माला अर्थ आला आणि दत्तगुरुंच्या दुर्लभ दर्शनाचा योग येणार होता. मी खूप भावूक होऊन अंथरुणातच आसवे पुसत होतो. त्याचबरोबर घरातील सर्वजण आणि नात्यातील जवळच्या माणसांच्या आठवणीने समाधान जाणवत होते.

२२ ऑक्टोबरला आम्ही वेरावळला पोहोचलो. तेथील सोरटी सोमनाथ दर्शन आणि इतर धार्मिक ठिकाणे करून त्या दिवशी आम्ही तेथेच मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी पुन्हा सोमनाथ दर्शन करून आम्ही २३ ऑक्टोबरला जुनागढला जायला निघालो. खूप प्रसन्न वाटत होते. जुनागढला उतरून आम्ही

तलेठीला दत्त दर्शनासाठी निघालो. तलेठीमध्ये आम्ही शेरनाथ बापूंच्या गोरक्षनाथ आश्रमात मुक्कामासाठी थांबलो. संध्याकाळी आम्ही तलेठीत फिरायला गेलो. तेथे एका दुकानदाराजवळ आम्ही काश्मिरी बापूंच्या आश्रमाबद्दल चौकशी केली व आम्हाला तिकडे जाण्याची इच्छा आहे असे सांगितले. तेव्हा ते म्हणाले तुम्ही श्री गुरुदत्तांवर विश्वास ठेऊन जावे व तेथे जर त्यांनी प्रसाद दिला तर अवश्य घ्यावा. आम्ही संध्याकाळी तिकडे जायला निघालो. एवढ्या घनदाट जंगलातून जाण्याचे धारिष्ट्य आमच्यात कसे काय आले समजत नव्हते. मनात फक्त श्री दत्तगुरुंवरचा विश्वास होता. अतिशय सुंदर जंगल, किड्यांचा किर्र आवाज, रस्त्याच्या बाजूला पाण्याने वाहणारा झरा. खूप प्रसन्न वाटत होते. आम्ही तेथे खूप सारे फोटो आणि व्हिडिओही काढले. जंगलातून मार्गक्रमण करीत संध्याकाळी ६ वाजता आम्ही तेथे पोहोचलो तेव्हा सायंकाळच्या आरतीची तयारी चालू होती. काही भक्त अंधार पडेल म्हणून माघारी निघाले होते. आम्ही मात्र तेथेच थांबलो. किंबहुना आम्हाला थांबावे असे सुचविण्यात आले. आमच्यासाठी खूप सुंदर योग जुळून आला होता. आम्ही तासभर प्रतिक्षा करत थांबलो. आश्रमातील घंटा आरती खूपच विलोभनीय अशी होती. तेथे प्रसाद घेऊन आम्ही रूमवर येण्यासाठी निघालो. खूप अंधार होता. थोडी भीती मनामध्ये होतीच. आमच्याबरोबर तलेठीच राहणारे कुटुंबिय सोबत होते. म्हणून आम्हाला आधार वाटला. आम्ही रूमवर पोहचलो. आम्हाला त्या २३ ऑक्टोबरच्या रात्री गुरुशिखर चढून दत्तदर्शनासाठी निघायचे होते. रात्री १०.४५ वाजता आम्ही बाहेर पडलो. निघताना आम्ही शेरनाथ बापूंना भेटलो. त्यांनी आमच्याकडे दत्तप्रसादासाठी दुपारीच पैसे दिले होते व एक नारळ दत्तांसाठी घेऊन जाण्यास सांगितले होते. आमच्यासाठी ही खूप भाग्याची गोष्ट होती. अशा तपस्वी महापुरुषाने त्यांचा प्रसाद आमच्या हस्ते दत्तगुरुंसाठी देऊ केला होता. सोबत आधीच तलेठीतील एका दुकानातून आणलेली काठी बरोबर घेतली. गिरनार व दत्तशिखर दर्शनास निघताना खूप प्रसन्न वाटत होते.

२३ ऑक्टोबर २०२२ रविवारची ती रात्र. सर्वप्रथम आम्ही लंबे हनुमानाचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला व रात्री ११ वाजता गिरनार चढायला निघालो.

पहिल्या पायरीवर नतमस्तक होऊन गुरुशिखर चढण्यासाठी भगवान दत्तात्रेयांना आशिर्वाद मागितला. सर्व अहंकार त्यागला. तेथे सुरुवातीला आम्ही चढावा हनुमानाचे दर्शन घेतले. अंतःकरण अगदी भरून आले होते. पहिली पायरी चढताना पत्नी, मुले व जवळच्या प्रिय व्यक्तींना व्हिडिओ कॉल करून पायरीचे व तेथील स्वामी समर्थ, दत्त मूर्ती, देवी देवतांचे दर्शन घडविले. आश्चर्य म्हणजे पहिली पायरी चढत असताना एक श्वान आमच्याबरोबर निघाले. जणू काही आमच्यासाठी पाठीराखा म्हणून भगवान गुरु दत्तात्रेयांनी त्याला पाठविले होते. आम्ही गुरुशिखर चढायला सुरुवात केली. ते श्वान पुढे व आम्ही मागे अशी आमची चढाई चालू झाली. असे वाटत होते की जणू काही प्रत्यक्ष भगवान गुरु दत्तात्रेयच त्या श्वानाच्या रुपात आमची साथ देत आहेत. असे म्हणतात की भगवान दत्तात्रेयांची साथ असल्याशिवाय गिरनार चढणे अशक्यच आहे. आम्ही त्या श्वानाच्या रूपात दत्तगुरूंना अनुभवत होतो. वाटत होते प्रत्यक्ष दत्तगुरुच आमचे दत्तभेटीचे स्वप्न पुर्ण करून घेत आहेत. अंतःकरण अगदी गहिवरून गेले होते. या प्रवासात सतत ते श्वान १५-२० फूट पुढे, मी व माझा सहकारी मागे असे आमचे मार्गक्रमण चालू होते. गिरनार चढताना सतत ‘ जय गिरनारी, जय श्री गुरुदेव दत्त, जय श्री स्वामी समर्थ, अलख निरंजन ‘ असे नामस्मरण चालू होते.

२४ ऑक्टोबर सोमवार उजाडला होता. साधारणतः १००० पायऱ्या चढलो असेल. रात्रीचे १२ वाजले होते. अशातच अचानक आमच्या पुढे चालत असलेले श्वान भयभीत होऊन अतिशय जोरात पळत मागे फिरले व आमच्या जवळ येऊन कान टवकारून पुढे पाहत उभे राहिले. ते श्वान मागे फिरताना वाघाच्या डरकाळीसारखा आवाज मी ऐकला होता. वाटत होते भास तर नाही ना. आम्ही आजूबाजूला पाहिले की कुठल्यातरी दुकानाच्या शटरचा तर आवाज नाही ना. तेथे शेजारी पर्वतावर आमच्या बाजूला एक दुकान होते परंतु ते बंद होते आणि त्याच्या पुढच्या बाजूने पडदे होते. कुठलेही शटर वगैरे काही नव्हते. सभोवार निव्वळ काळोख पसरला होता आणि त्या किर्र रात्रीच्या काळोखात तेथे फक्त मी, माझा सहकारी आणि ते श्वान होते. ते श्वान त्या आवाजाने भयभीत होऊन

मागे येणे हा आमच्यासाठी एक भयावह असा प्रसंग होता. विशेष म्हणजे माझ्या सहकाऱ्याच्या पत्नीने पुण्याहून निघताना सांगितले होते की तेथे चढताना आजूबाजूला जंगल आहे व वाघांचे वास्तव्य असते. तेव्हा तुम्ही चढताना काळजी घ्या. हा प्रसंग घडताना मला त्वरीत त्याची आठवण आली कारण आवाजही वाघाचाच ऐकू आला होता. परंतु रात्रीच्या अंधारात टॉर्च लावून पुढे पाहिले तर काहीच दिसत नव्हते. हा योगायोग म्हणायचा की दत्त महाराजांनी दिलेली प्रचिती. आम्ही मनोमन दत्तगुरुंचे स्मरण करू लागलो आणि त्या भगवान परमात्म्यावर सर्व काही सोडून दिले. प्रत्यक्ष दत्तगुरुंची साथ असल्याने एक विश्वास होता की माझी दत्तमाऊली आम्हाला असे संकटात सोडूच शकत नाही. दोन ते तीन मिनिटांनी आम्ही पुन्हा प्रवास चालू केला. मनात दत्तगुरुंचे नामस्मरण करत होतो. नामस्मरण करता करता मनातील भीती कुठल्या कुठे पळून गेली ते कळलेच नाही. गुरुचरित्रात म्हटलेच आहे

**‘ ज्याचे हृदयी श्रीगुरु स्मरण त्यासी कैचे भय दारूण ‘.**

साधारणतः १२०० पायऱ्या चढून झाल्या होत्या. त्यावेळी आम्हाला एक दत्तभक्त भेटला. तो गुजरातमध्ये सानंद येथे नोकरीस आहे. तसा तो महाराष्ट्रीयन आहे. तो एकटाच आला होता. त्यालाही कुणाची तरी साथ हवी होती. त्यानेही आमच्याबरोबर चढायला सुरुवात केली. आम्हालाही त्याच्या भेटण्याने खूप बरे वाटले. आता आम्ही तिघेजण बरोबर होतो व पुढे दत्तस्वरुप श्वान होते. थकवा जाणवल्यावर आम्ही विश्रांती घेत होतो. आमच्याबरोबर असलेले श्वानही मग आमच्या शेजारी बसायचे व पुन्हा नव्या जोमाने आम्ही चढायला सुरुवात करायचो. असेच एका ठिकाणी आम्ही थकल्याने विश्रांतीसाठी बसलो होतो. ते श्वानही पुढे गेलेले मागे आले आणि आमच्याजवळ बसले. तेही कदाचित थकले असावे. मी त्या श्वानाला बिस्कीट खायला दिले परंतु त्याने काही खाल्ले नाही. माझ्या सहकाऱ्यानेही बिस्कीट खाऊ घालण्याचा प्रयत्न केला परंतु त्याने काही ते खाल्ले नाही. आम्हाला खूप वाईट वाटले. आम्ही त्याच्या

रूपात दत्तगुरूंना पाहत होतो. थोडा वेळ विश्रांती घेऊन आम्ही पुन्हा नव्या जोमाने चढायला लागलो.

गिरनार चढताना खूप थकल्यासारखे होत होते. पाय खूप दुखत होते. अगदी जड झाले होते व आपसूकच पाऊल पुढे पडत होते. जणू काही दत्तगुरुच आम्हाला बळ देत होते व आमच्याकडून हे करून घेत होते. आम्ही गिरनारला येण्यापूर्वी जी काही प्रॅक्टिस केली होती ती सर्व निष्प्रभ ठरत होती. इतके पाय थकल्यासारखे मी आयुष्यात कधीच अनुभवले नव्हते. सोबत आणलेली काठी आम्हाला खूप आधार देत होती. परंतु पदोपदी वाटायचे चढणे खूप कठीण आहे. आपण गुरुशिखरापर्यंत पोहोचू की नाही. कारण काहीजण मधल्या टप्प्यातूनच मागे फिरताना आम्ही पाहत होतो. काहीजण म्हणायचे मंदिर सकाळी उघडणार आहे. काय करणार तेथे जाऊन. आम्ही मात्र गुरुभेटीसाठी व्याकूळ झालो होतो. मनात एकच ध्यास होता कितीही त्रास झाला तरी चालेल पण गुरुशिखर चढून दत्तपादुकांचे दर्शन घ्यायचेच. असे म्हणतात की दत्तगुरूंचा आशीर्वाद पाठीशी असेल तरच तुम्ही गुरूशिखरापर्यंत पोहोचू शकता. आम्ही तर सर्व त्या दत्त माऊलीवर सोडले होते. फक्त एक विश्वास पाठीशी घेऊन आम्ही मार्गक्रमण करत होतो. आम्हाला भेटलेल्या दत्तभक्ताने आणलेले एनर्जी ड्रिंक पिऊन आम्हाला बरे वाटत होते व चढण्यासाठी नवीन उमेद मिळत होती. तो आमची खूप काळजी घेत होता. आता कसे काय वाटते अशी मध्ये मध्ये विचारपूस करायचा. रात्रीच्या त्या काळोखात गिरनारचा तो परिसर खूप नेत्रदीपक दिसत होता. आम्ही प्रवासात खूप सारे फोटो आणि व्हिडिओ काढले.

५००० पायऱ्या चढून रात्री ३ वाजता आम्ही अंबामाता मंदिराजवळ पोहचलो होतो. पहिल्या पायरीपासुन ते ५००० पायऱ्यांपर्यंत ते दत्तस्वरूप श्वान आमच्या बरोबर होते. आम्ही खूप थकलो होतो म्हणून थोडा वेळ अंबामाता मंदिरासमोर बसलो. इतक्यात ते दत्तस्वरुप श्वान आमच्यापासून केव्हा निघून गेले हे आमच्या लक्षातदेखील आले नाही. तब्बल ४ तास त्याने आमची साथ सोडली नव्हती. असे मी आयुष्यात कधीच पाहिले नव्हते. आम्ही ४ तास चालून इतके

थकलो होतो तर त्याची काय अवस्था झाली असेल. का त्याचा एवढा अट्टाहास की त्याने इतक्या रात्री आमच्याबरोबर ४ तास चालावे. काय म्हणायचे याला. यालाच का प्रचिती येणे म्हणतात. आमच्या साशंकित मनाला हा अनुभव लाजवत होता आणि मनात अपराधीपणाची भावना डोकावत होती. कारण उगीच आम्ही गिरनार चढताना घाबरत होतो व नाना शंका मनात आणत होतो. प्रत्यक्ष दत्तगुरुंनी त्या श्वानाला जणू काही आमच्यासाठी पाठविले होते.

गुरुशिखराचा अर्धा पल्ला आम्ही गाठला होता. तेथून थेट दूरवर आम्हाला गुरुशिखर दिसत होते. मन अगदी उल्हसित झाले होते. लवकरच आम्ही गोरक्षनाथ शिखरापर्यंत पोहोचलो. दूरवर खाली दत्त प्रवेशद्वार दिसू लागले. परंतु खूप अंतर असल्यासारखे वाटत होते. काही वेळाने आम्ही दत्तकमानीजवळ पोहोचलो. आता मात्र आमच्या जीवात जीव आला कारण आता आम्ही अंतिम टप्प्यात आलो होतो. आयुष्यातील हि पहिली दिवाळी होती जेव्हा मी माझ्या कुटुंबासोबत नव्हतो. साक्षात श्रीदत्त गुरुरायांनी हि खास दिवाळी आम्हाला जणू काही भेट दिली होती असेच म्हणावे लागेल. थकलेल्या जड पावलांनी आम्ही कसेबसे पहाटे ५ वाजता गुरुशिखराजवळ पोहोचलो. २४ ऑक्टोबर २०२२ सोमवारचा तो दिवस. दिवाळीतील लक्ष्मीपूजनाची ती रम्य आणि प्रसन्न अशी पहाट, समोर दत्तमाऊलीचे मंदिर काय तो सुवर्णयोग म्हणायचा. शब्दांतही वर्णन करू शकत नाही. आत्ताही मला हे लिहिताना डोळ्यात अश्रू आणि अंगावर रोमांच उभे राहिले आहेत. कारण आम्ही तो स्वर्गीय आनंद अनुभवत होतो. पहाटेचा सूर्योदय आम्हाला खूप भावत होता. गिरनार म्हणजेच गिरी नारायणाची ती भव्यता आणि दिव्यता मनाला खूप आनंद देत होती. हे सारे अनुभवताना आमचीच आम्हाला नजर लागते की काय असे वाटत होते. आम्ही गुरुशिखरावर पोहचलो तेव्हा मंदिर बंद होते. सकाळी ६ वाजता मंदिर उघडणार होते. खूप थकल्यामुळे झोप डोळ्यांवर तरळत होती. पण दत्तभेटीची आस आम्हाला झोपू देत नव्हती. जवळ जवळ शंभर एक दत्तभक्त तेथे पायऱ्यांवर विसावले होते. कुणी झोपले होते, कुणी गप्पा मारत होते, कुणी नामस्मरण करत होते, खूप थंडी असल्याने कुणी शेकोटी पेटवून शेकत होते. मनात फक्त दत्तध्यान होते.

कधी एकदा मंदिर उघडते आणि त्या दत्तमाऊलीला जवळून पाहतो असे झाले होते. काय पावित्र्य त्या स्थानाचे जेथे दत्तमाऊलीने १२००० वर्षे तपश्चर्या केली होती. अशा पावन स्थळाला जाणे म्हणजे साता जन्माचे पुण्य म्हणावे लागेल जेथे माझे दत्तगुरु इतका काळ सानिध्यात होते. अंग रोमांचित होत होते.

आमची उत्कंठा संपली. बरोबर सकाळी ६ वाजता पुजारी आले आणि मंदिर उघडले. आरती सुरु झाली. आम्ही मंदिरापासून २५-३० पायऱ्यांवर उभे होतो. सर्व भाविक आरतीसाठी उभे राहिले. आरती संपल्यावर एकेक जण रांगेत पुढे जाऊन दर्शन घेण्यास आतुर झाला होता. मला पण कधी एकदा आत जातोय असे झाले होते. रांगेने दर्शन सुरू झाले. एकेक जण दर्शन करून बाहेर येत होता. सर्वात प्रथम दर्शन घेतलेला भक्त बाहेर आला. मी त्याच्याकडे एकटक पाहत होतो. त्याचा चेहरा अगदी प्रफुल्लित दिसत होता. का नाही दिसावा किती ओढीने तो दत्तमाऊलीला भेटायला आला होता. कुणास ठाऊक पण मला त्याच्याकडे पाहून वाटायचे हा तर क्षणिक आनंद आहे. एकदा मंदिरातून बाहेर पडल्यावर कुठे मला माझी दत्तमाऊली दिसेल. मला सुद्धा असेच पटकन दर्शन घेऊन बाहेर पडावे लागेल. दर्शन व्हायच्या आधीच ती विरहाची कल्पना मनाला वेदना देत होती. असे वाटत होते रांगेतून बाहेर पडावे व सर्व भक्तांचे दर्शन झाल्यावरच आपण आत जावे जेणेकरून आपण जास्तीत जास्त वेळ दत्तमाऊलींसमोर राहु. डोळ्यांची तृष्णा भागवून घेऊ. एकेक जण रांगेत पुढे सरकत होता तसे आम्हीपण पुढे जात होतो. आम्ही अगदी दत्तमय होऊन गेलो होतो. त्या स्वर्गीय आनंदात न्हाऊन निघालो होतो. अखेर तो क्षण आला ज्याची आम्ही कित्येक महिन्यांपासून चातकासारखी वाट पाहत होतो. मंदिरात शिरल्यावर लगेच माझ्या दत्तमाऊलीवर डोळे विसावले. डोळ्यांची पापणी इकडची तिकडे हालत नव्हती. साता जन्माचे सार्थक झाल्यासारखे वाटत होते. दत्तपादुकांचे दर्शन करताना दत्तमाऊलीला साकडे घातले हे गुरूदत्ता मला तुझ्या चरणापासून दूर लोटू नको. मला पुन्हा पुन्हा तुझ्या भेटीचा योग येऊ दे. बाकी जीवनात काही नको. मला मागण्याची काही गरजच नाही कारण प्रत्येक भक्ताची तू काळजी घेतो. एकदा का कुणी दत्तप्रेमात पडले तर त्याला कुणीही

दूर करू शकत नाही. नव्हे ती दत्त माऊली तुमच्या पाठीशी अविरत उभी राहते. हा माझा अनुभव आणि १००% विश्वास आहे. आम्ही बरोबर आणलेला प्रसाद, जपमाळ आणि गुरुचरित्र ग्रंथ दत्त पुजाऱ्याकडून पादुकांना स्पर्शून घेतला. दर्शन घेऊन मी बाहेर आलो.

दर्शनाची रांग तुरळक झाली होती. पुन्हा दुसऱ्यांदा दर्शन घेण्याचा मोह मला आवरला नाही. मी पुन्हा दर्शनासाठी आत गेलो आणि दर्शन घेऊन बाहेर आलो. माझे सहकारी बाहेर पायाऱ्यांजवळ वाट पाहत उभे होते. अजूनही मनातली दत्तदर्शनाची तृप्तता संपत नव्हती. पुन्हा पुन्हा दर्शन करावेसे वाटत होते. तेथून पायच निघत नव्हते. कारण पुन्हा केव्हा येणे होईल हे माहीत नाही. भक्त त्या दत्तमाऊलीवर एवढा जीव ओवाळून का टाकतात याचे उत्तर मला मिळाले होते. पुन्हा एकदा दर्शन घ्यावे म्हणून मी माझ्या सहकाऱ्यांना बोलावले व तिसऱ्यांदा मी दर्शनासाठी आत गेलो. या वेळी आतून बाहेर जाण्यास मन तयारच होत नव्हते. पुजारी आम्हाला म्हणाला तुम्ही पुन्हा पुन्हा आत येताय. बाकी भाविकांनाही दर्शन घेऊ द्या. मी म्हटले गर्दीही कमी झाली होती आणि मन तृप्त झाले नाही, पुन्हा दर्शन करावेसे वाटले म्हणून आलो. अचानक माझे हात त्या पुजाऱ्याच्या चरण दर्शनासाठी पुढे सरसावले. मनात वाटत होते कुठल्या जन्माचे पुण्य म्हणायचे या पुजाऱ्याचे कि जो दररोज दत्तगुरुंच्या सानिध्यात असतो. दर्शन घेऊन आम्ही बाहेर आलो आणि परतीच्या वाटेला निघालो. तीनदा दर्शन घेऊनसुद्धा मन अतृप्त वाटत होते. तेथून निघताना डोळे पाणावतील असे वाटत होते परंतु तसे काही घडले नाही. आपले दर्शन आणि मनोकामना दत्तगुरूंजवळ पोहोचली की नाही याविषयी मन संभ्रमित होते आणि मनात विचारांची घालमेल चालू होती. इतके छान दर्शन होऊनही मन असमाधानी का वाटत होते. दत्तमाऊली अशा अतृप्त मनाने आम्हाला जाऊन देऊच शकत नाही असा मनोमन एक विश्वास होता. माझी ही अतृप्तता दत्त माऊलींनी ओळखली असावी आणि त्याची प्रचिती मला कशी आली ते अनुभवात नंतर पुढे सांगितले आहे. तेथून निघताना मी व्हिडिओ कॉल करून माझी आई, पत्नी, मुले, मेहुणी,

साडूबंधू, मेव्हणे, काका आणि मावशीला दत्तगुरूंचे काहीशा अंतराहून दर्शन घडविले आणि माघारी निघालो.

परतत असताना गुरुशिखर उतरून खाली आल्यावर दत्तकमान आहे. तेथेच शेजारी दत्तधुनी व कमंडलूतीर्थ स्थान आहे. दर सोमवारी सकाळी ९ वाजता तेथे धुनी पेटवतात आणि आमच्या नशिबात तो योग आला होता. एक तास आम्ही तेथे नामस्मरण करत थांबलो आणि सकाळी ९ वाजता दत्तधुनी प्रज्वलित करण्यात आली. धुनी प्रज्वलित करत असताना सतत 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' असा मंत्र सर्व दत्तभक्त मोठ्या आत्मीयतेने जपत होते. खूपच प्रसन्न वातावरण होते. धूनीचे दर्शन घेऊन प्रसाद घेतला. निघताना बरोबरच आणलेल्या बाटलीमध्ये आम्ही कमंडलूतीर्थ घेतले.

निघताना लांबूनच व्हिडिओकॉलने माझ्या साडूबंधूंना दत्त धुनीचे दर्शन घडविले. आम्ही खूप थकलेलो होतो. पाय खूप दुखत होते.येताना आम्ही गोरक्षनाथ मंदिराजवळ असलेल्या पापपुण्याच्या गुहेतून पाठीवर सरकत सरकत बाहेर आलो. तेथे आम्ही गुरू गोरक्षनाथांचे दर्शन घेतले व नंतर पुढे अंबामाता शिखराजवळ पोहोचलो. तेथून गोरक्षनाथ शिखर व गुरुशिखर दिसत होते. तेथून व्हिडिओ कॉल करून मी माझा भाऊ व घरच्यांना गिरनार व गुरुशिखर दर्शन घडविले. नंतर अंबामातेचे दर्शन घेतले व बाहेर येऊन थोडा वेळ विसावलो. माझा सहकारी खूप थकलेला होता आणि आपण रोपवेने खाली जाऊ असे म्हणाला. मंदिराशेजारीच रोपवेची सोय आहे. त्यालाच उडान कटोला असेही म्हणतात. मीही रोपवेने जायला तयार झालो. आमच्याबरोबर येताना भेटलेला जो तिसरा भक्त होता त्याने मात्र पायीच उतरून येतो असे म्हटले. आम्ही दोघांनी रोपवेची तिकिटे काढली. रोपवेचा अनुभव खूप छान होता. १० मिनिटातच आम्ही रोपेवेने खाली पोहोचलो.

दुपारचे १२ वाजले होते. तेथे नाश्त्याची उत्तम सोय आहे. आम्हाला खूप भुक लागली होती. आम्ही तेथेच नाष्टा करून शेरनाथ बापू आश्रमातील आमच्या रूमवर गेलो. दुपारचे जेवण आम्ही आश्रमातच केले. आदल्या दिवशी रात्रभर

जागे आणि खूप थकलेलो असल्याने दुपारी आम्ही लागलीच झोपलो. संध्याकाळी उठून पायाची मालिश करून घ्यायचा विचार होता. माझ्या मित्राचे पाय खूप दुखत होते. ठरल्याप्रमाणे आम्ही संध्याकाळी ६.३० वाजता गिरनारच्या पायथ्याशी गेलो. माझ्या मित्राने त्याच्या पायाची मालिश करून घेतली. मी मालिश करायला नाही म्हटले कारण मला थोडे बरे वाटत होते. नंतर आम्ही रूमवर येऊन आश्रमात रात्रीचे जेवण करून झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी २५ तारखेला जुनागढ ते बांद्रा दुपारी १२.५६ वाजताची ट्रेन होती. त्या ट्रेनने आम्ही निघणार होतो. मन म्हणावे तसे तृप्त झाले नव्हते कारण आमचे दर्शन झाले तर खरे परंतु दत्तमहाराजांनी आपल्याला तृप्त का नाही केले याचीच खंत जाणवत होती. मी अगोदरच ठरविले होते की गिरनारला गुरुशिखरावर गेल्यावर तेथेच जागा शोधून गुरुचरित्रातील १४ वा अध्याय वाचू. परंतु अक्षरशः तेथे पोहोचून खाली उतरेपर्यंत त्याची मला आठवणही आली नव्हती. मनाशी ठरविले सकाळी लवकर उठून ११ माळी जप आणि १४ वा अध्याय वाचू. आमच्या रुमच्या समोरच गिरनार पर्वत होता. वाटले आपण रूमच्या बाहेर बसूनच जप व अध्याय वाचन करू कारण समोरच गिरनार पण दृष्टीस आहे.

सकाळी लवकर उठून आटोपून ७ जपमाळ पूर्ण झाल्या. काय कुणास ठाऊक असे वाटले की बाकी ४ जपमाळ आणि १४ वा अध्याय गिरनार पायथ्याशी असलेल्या लंबे हनुमान मंदीरात वाचू. तेथे प्रसन्नही वाटेल आणि गिरनारच्या पायथ्याशी गुरुचरित्र वाचनाचे समाधानही मिळेल. आम्ही दोघेही लागलीच तिकडे गेलो. परंतु लंबे हनुमानाचे मंदिर बंद होते. सकाळचे १० वाजले होते. मग आम्ही ठरविले आपण पहिली पायरी ओलांडून आतमध्ये जागा शोधू म्हणून आम्ही पुन्हा एकदा पहिल्या पायरीचे दर्शन घेतले. माझ्या बहिणी आणि जवळच्या आप्तजनांना व्हिडिओकॉल करून पहिल्या पायरीचे आणि गिरनारचे दर्शन घडवले. नंतर आम्ही आत शिरल्यावर एक छोटेसे मंदिर होते तेथे जाऊन बसलो. मंदिराच्या बाजूलाच एक अघोरी बाबा बसले होते. मंदिरात शिरताना वाटले त्यांनी आपल्याला तेथे बसायला मज्जाव केला तर. मंदिरात छोटीशीच जागा होती आणि कुणी दर्शनास आले तर अडचण होईल असे वाटले. कुणी

उगाच उठविले तर सर्व व्यर्थ ठरेल. मी म्हटले आपण आणखी पुढे जाऊन जागा शोधू. बाहेर आल्यानंतर सभोवार असलेला पुज्यमय महाकाय असा गिरनार जणू काही आमची प्रतिक्षा करत होता. त्या वनराईकडे आमचे लक्ष्य वेधले गेले आणि मनात आले की आपण पायऱ्यांच्या बाजूला असलेल्या गिरनार पर्वताच्या वृक्षांशेजारी असलेल्या मोकळ्या जागेत बसू. आम्ही मग त्या मोकळ्या जागेत साफसफाई करून बसलो.

समोर गिरनार आणि प्रत्यक्ष गुरुशिखर होते. याच जागेच्या सुरुवातीला आम्हाला अगोदरच्या रात्री ते श्वान आणि पुढेच काही अंतरावर वाघाच्या डरकाळीच्या आवाजाचा अनुभव आला होता. आता तर आम्हाला खूप धन्य वाटत होते कारण जणू काही दत्तगुरु आमच्या बरोबरच आहेत. आम्हाला कालचा गुरुशिखरावर अतृप्त वाटणारा विरह जणू काही त्यांनी जाणला होता आणि या सर्व घटना क्रमाने घडवून आणत होते. डोक्यात काहीही नसताना हे सर्व आपोआपच घडत होते. आम्हाला त्यांनी पुन्हा त्यांच्या सानिध्यात आणले होते. आम्ही ठरल्याप्रमाणे त्या ठिकाणी अगरबत्ती लावून दत्तगुरूंना वंदन करून माळजप पूर्ण केला. त्यानंतर आम्ही १४ वा अध्याय वाचून आरती करून निघणार होतो. १४ वा अध्याय वाचून झाला आणि लागलीच माझ्या मित्राने मला ५२ वा अध्याय वाचण्यास सांगितले. तसा माझा विचारही नव्हता परंतु त्याने अचानक सांगितल्याने मीही ५२ वा अध्याय वाचण्यास सुरुवात केली. माझा मित्र लक्षपूर्वक श्रवण करीत होता. आश्चर्य म्हणजे अध्यायाच्या ९ ते १० ओव्या वाचून झाल्या असाव्या आणि आमच्या दोघांच्याही अश्रूंचा बांध एकाच वेळी फुटला. आजही हा अनुभव लिहिताना मी स्वामी समर्थांच्या मंदिरात बसलेलो आहे आणि आत्ताही माझ्या डोळ्यांतून आसू येत आहेत. माझी मनोमन इच्छा होती की माझ्या अनुभवाची सांगता दत्तगुरूंच्या सानिध्यात व्हावी. ध्यानी मनी नसतानाही नकळतपणे तेही स्वप्न आज पूर्ण झाले. आज मी स्वामी समर्थांच्या मंदिरात बसून हा अनुभव लिहीत आहे. काय म्हणायचे या प्रसंगाला. आमचे गुरुचरित्र वाचन हे निमित्त वाटत होते. असे वाटत होते प्रत्यक्ष दत्तगुरूंनी आम्हाला त्यांच्या चरणाजवळ आणले होते व आम्हा दोघांनाही त्यांनी त्यांच्या

कृपेच्या छायेत घेतले होते. धन्य तो गिरनार आणि धन्य ती दत्तमाऊली. ५२ वा अध्याय पूर्ण वाचून झाल्यावर आम्ही दोघांनी दत्तगुरूंची आरती केली. जड अंतःकरणाने परंतु अतिशय तृप्त मनाने आम्ही गिरनार व दत्तगुरूंना वंदन करून रूमवर जाण्यास निघालो. प्रत्यक्ष दत्तात्रेय भगवान भेटल्याचे समाधान आमच्या दोघांच्याही चेहऱ्यावर झळकत होते. आम्ही दोघेही निशब्द होऊन रूमवर परतत होतो. निशब्द यासाठी कारण आम्ही ती अनुभती मनोमन आकलन करत होतो. खरोखर त्यावेळी वाटत होते

**‘आज मी दत्तगुरु पाहिले ‘.**

रूमवर जाऊन आमचे सामान घेऊन आम्ही परतीच्या प्रवासाला सज्ज झालो. रिक्षा करून आम्ही जुनागढ स्टेशनला पोहोचलो. आम्ही ट्रेनमध्ये बसलो आणि ठरलेल्या वेळेप्रमाणे ट्रेन चालू झाली. आम्ही मात्र ट्रेनच्या खिडकीतून त्या गिरनारकडे एकटक निरागसपणे बघतच होतो. ट्रेनमध्ये एक जोडपे आमच्या शेजारी बसले होते. त्यांनी आम्हाला विचारले गिरनारला जाऊन आले वाटते. तेही कुतूहलाने आमच्याशी गिरनारविषयी चर्चा करू लागले. तेही आमच्याबरोबर ट्रेनच्या खिडकीतून त्या पवित्र अशा गिरी नारायणाकडे पाहू लागले. दृष्टीक्षेपात असेपर्यंत आम्ही तिकडेच पाहत राहिलो. या सर्व गोड आठवणी घेऊन आम्ही मुंबईत उतरून नंतर बसने पुण्याला पोहोचलो. त्यानंतर पूर्वनियोजन नसतानाही १ जानेवारी २०२३ नववर्ष दिनी मी व माझ्या कुटुंबीयांना नरसोबाच्या वाडीला जाण्याचा योगही आला. शब्दही तोकडे पडावे सांगायला असे भरभरून समाधान मला माझ्या दत्तगुरूंनी दिले आहे. हा अनुभव ऐकून जर काही भक्त दत्तप्रेमात जोडले गेले तर तो मी माझ्या गुरूंचा आशीर्वाद समजेल. धन्य ते अत्रीऋषी अनुसुया माता आणि धन्य ते श्री गुरु दत्तात्रेय. त्यांच्या चरणी नतमस्तक होऊन माझा हा अनुभव सर्वांना प्रेरणादायी राहो अशी प्रभू दत्तचरणी प्रार्थना करतो. अनावधानाने कुठे काही अहंकार माझ्या मनात आल्यासारखे वाटले असेल तर मी दत्तगुरु चरणी नतमस्तक होऊन दयेची याचना इच्छितो. असेच प्रेमळ आणि

सुखद अनुभव सर्व दत्त भक्तांना येवो, दत्तगुरुंची कृपादृष्टी सर्वांवर राहो, दत्तगुरु सर्वांना त्यांच्या कृपाछायेत अनुग्रहित करो अशी मी दत्त माऊलीस प्रार्थना करतो.

श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी म्हणतात......

**॥ जे भक्त असती माझ्या प्रेमी ।**

**त्यासी प्रत्यक्ष दिसो आम्ही ॥**

खरोखर आपली अपार श्रद्धा, भक्ती, नामस्मरण, सात्विक भाव, शुध्द आचरण आणि सत्कर्माची जोड असेल तर प्रत्यक्ष दत्तगुरु आपल्याला दर्शन दिल्याशिवाय राहणार नाहीत. याची मला निसंदेह खात्री आहे.

माझ्या उभ्या आयुष्यात मला कधी देव स्वप्नात दिसला नव्हता. अनेकांना स्वप्नात देव दिसतो. माझ्या पत्नीलाही स्वप्नात अनेकदा श्री स्वामी समर्थांनी दर्शन दिले आहे. मलाही खूप वाटायचे की आपल्यालाही स्वप्नात देव दिसावा. काय अनुभूती म्हणायची याला, माझ्या गिरनार भेटीनंतर मला चक्क तीन वेळा श्री स्वामी समर्थ आणि दत्तगुरुंचे स्वप्नात दर्शन झाले. या विज्ञानयुगात या सर्व गोष्टी अनाकलनीय आहेत परंतु ते शाश्वत सत्य आहे. सर्वात महत्वाचे मी सर्व दत्तभक्तांना सांगू इच्छितो कुठल्याही अंधश्रद्धा, थोतांड आणि भोंदूगिरीला थारा देऊ नका. कारण आजच्या काळात फक्त आणि फक्त देवच खरा आहे बाकी सर्व मायाजाळ आणि भूलभुलैय्या जग आहे. म्हणूनच त्या जगतनियंत्या परमेश्वराला शरण जा आणि सुंदर आयुष्य जगत रहा. मी सर्व भक्तांसाठी श्री दत्तगुरु चरणी लीन होऊन आर्त साद घालू इच्छितो.......

**॥ अपराधी पातकी या स्वीकार लेकरासी ॥**

**॥ दत्ता दयाघना रे दे ठाव पावलांसी ॥**

**॥ राहो आम्हावरी रे दत्ता तुझीच माया ॥**


**॥ मायेविना तुझ्या रे साराच जन्म वाया ॥**

**॥ आतुर माऊलीसी कवटाळ लेकरासी ॥**

**॥ दत्ता दयाघना रे दे ठाव पावलांसी ॥**

सर्व दत्तभक्तांना माझ्याकडून मंगलमय आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**



# पहिली गिरनारवारी गुरुपौर्णिमेची

सौ. आशाताई पवार, सातारा



गिरनार पर्वत गुरु दत्तात्रेयांचे ठिकाण हे फक्त ऐकून होते. पण कुठे आहे हे माहित नव्हते. दर गुरुवारी नारायणपूर येथे होणाऱ्या आरतीनंतर प्रार्थनेत ऐकलेल. गिरनार पर्वती विश्रांती घेती. श्री गुरुदेव दत्त. त्यावेळी खूप वाटायचे की आपणही एकदा गिरनारला जावं. पण कुठे अन कसे जायचे याचा जराही गंध नव्हता. तरीही मनात मात्र निश्चय केला होता. पहिल्यांदा गिरनारला जाताना आईला बरोबर घेऊन जायचे आणि योग येण्याची वाट पाहू लागले.

असेच काही दिवसांनंतर माझ्या आईस्क्रीमच्या दुकानात आईस्क्रीम खाण्यासाठी काही गिऱ्हाईक बसले होते आणि सुदैवाने त्यांच्यामध्ये गिरनारची चर्चा रंगली होती. गिरनार हा शब्द कानावर पडताच मी त्यांच्या चर्चेकडे लक्ष देऊन ऐकू लागले. ते आपापसात गिरनार पर्वताला १० हजार पायऱ्या चढून जावे लागते, कोणाला जमले, कोणी कंटाळले, परत कोणी कोणी जायचे याबाबत बोलत होते. त्यावेळी मला त्यांच्या बोलण्यातून थोडीफार माहिती मिळाली. न राहवून मी त्यांना विचारलेच गिरनारला कसे जायचे? जमतात का १०००० पायऱ्या चढायला? परत जाताना मला सांगाल का? माझी आई चढू शकेल का? नाहीतर तिच्यासाठी डोलीची व्यवस्था आहे का व डोलीवाले किती पैसे घेतात अशा एक ना अनेक प्रश्नांची उत्तरे मी एकाच वेळी विचारून घेतली. त्यांनीही

सर्व माहिती सांगितली अन पुढच्या वेळी जाताना बुकिंगच्या वेळी सांगतो असेही सांगितले आणि तेव्हापासूनच मी गिरनारला जायच्या तयारीला सुरुवात केली. याच वर्षात माझ्या एकुलत्या एका मुलाचा ॲक्सीडेंट झाला होता. गिरनारवारीची जराही कल्पना नसताना मी माझ्या गुरुदत्तांना आर्त साद घालून गिरनारला कितीही कठीण असले तरी मी येणारच असा संकल्प करून माझा मुलगा स्वतःच्या पायावर उभा राहू दे अशी विनवणी केली होती आणि महाराजांच्या कृपेने स्वामींच्या आशिर्वादाने झाले तसेच. माझा मुलगा पूर्ण बरा झाला. अशक्यही शक्य करतील स्वामी याची प्रचिती आली. आता वेध होते ते गिरनारचे , महाराजांच्या चरणी केव्हा एकदा नतमस्तक होतेय याचे.

एक दिवस गिरनारवारी करणारे दुपारच्या वेळेत माझ्या दुकानात आले अन म्हणाले येणार आहात का. गिरनारला आम्ही गुरुपौर्णिमेचे बुकिंग करणार आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे आईस्क्रीमसाठी दुकानात गर्दी होती. तरीही मी त्यांना बोलले फक्त दहा मिनिटे थांबा, मी समोर घरी जाऊन लगेच बुकिंगचे पैसे घेऊन येते. तेही थांबले. मी वाऱ्याच्या वेगाने घराचा जिना चढत पळतच घरी आले. शेजारील भाभीला विचारले, गिरनारचे बुकिंग करायचे आहे तुमचे पण करू का? भाभीचे उत्तर यायच्या अगोदर आपल्या तिघींचे बुकिंगचे पैसे देत आहे असे सांगून पैसे घेऊन दुकानात थांबले होते त्यांना दिले सुध्दा. त्यांनी सांगितले जुलै महिन्याच्या २९ तारखेचे रेल्वे बुकिंग आहे. म्हणजे आपण ३० तारखेला दुपारी पोहचू व रात्री ११ वाजता गिरनार चढण्यास सुरुवात केली की गुरुपौर्णिमेला सकाळी गुरुचरणाचे दर्शन होणार आहे. मी उत्साहाने हो म्हणत होते. घरी आल्यानंतर प्रथम आईला सांगितले गुरुपौर्णिमेला आपण गिरनारला असू. आईलाही खूप आनंद झाला. सर्वांना फोन करून सांगितले. गिरनारचे माझे व आईचे बुकिंग केले आहे. सर्व बोलत होते की जमेल का? तू आईला कसे घेऊन जाणार. मी बोलले आईला चढण्यास नाही जमले तर मी तिला डोली करणार आहे पण आईला घेऊनच जाणार आहे. भाभी पण आहे संगतीला. काही प्रॉब्लेम येणार नाही. झाले एकदाचे फिक्स. आता लागलो

तयारीला. अजून एक महिना बाकी होता. त्यामुळे रोज सकाळी चालायला सुरुवात केली. सर्रास रोज न चुकता चालण्याचा नियम ठेवला.

अखेर तो दिवस उजाडला २९ जुलै २०१५. सकाळी साडेआठला शिरवळ येथून निघायचे होते. शिरवळ ते मुंबई बसने आणि मुंबई सेंट्रल येथून जुनागढ पर्यंत रेल्वे स्लीपरचे रात्री साडेआठ वाजताचे बुकिंग असल्यामुळे आम्ही गिरनारवारीचे सर्वजण मुंबईला जाण्यासाठी सकाळी लवकर उठून सज्ज झालो. मी सोबत वीस हजार रुपये घेतले होते. आईच्या डोलीचे दहा हजार इथूनच बाजूला ठेवले होते आणि दहा हजार आम्हाला खर्चण्यासाठी. बाकी दोन वेळचे जेवण, चहा, नाष्टा बुकिंगच्या पैशातच होते. त्यामुळे बिनधास्त होतो. सकाळी आठ वाजता मला कॉल आला, साडेआठ वाजता स्टॉपला या ‘जय गिरनारी’. अंगावर अक्षरशः काटाच उभा राहिला कारण आज माझे गिरनारचे स्वप्न पूर्ण होणार होते. सकाळी साडेआठ वाजता एकवेळचे जेवण बरोबर घेऊन आम्ही तिघीजण बसस्टॉपला पोहोचलो. तिथे बरीच मंडळी गिरनारला जाण्यासाठी जमली होती. कापूरहोळ, पुणे, मुंबई येथूनही काहीजण आमच्या ग्रुपमध्ये येणार होती. अशी सर्वजण मिळून आम्ही मुंबईतून जवळपास बावीसजण गिरनारच्या ट्रेनमध्ये बसलो. सर्वांना मिळून दोन डब्बे लागून होते. प्रत्येकाने आपापली सीट पकडली. आम्ही पाचजणी महिला होतो. आम्हाला एकाच ठिकाणी जागा देण्यात आली. रात्रीचे ९ वाजता रेल्वेचा प्रवास सुरू झाला. मुंबई मागे टाकेपर्यंत रात्रीचे १२ वाजले होते. नंतर बरोबर नेलेले जेवण करून आम्ही झोपी गेलो. सकाळी जाग आली तेव्हा गिरनार काही तासांच्या अंतरावर राहिले असल्याने अगदी उत्साह शिगेला पोहोचला होता. इकडे तिकडे करत दुपारी अडीच वाजता आम्ही जुनागढला पोहोचलो. सर्वांनी आपापल्या बॅगा ओढत हॉटेल गाठले. तेथे पोटभर जेवण करून भवनाथ येथे कच्छीभवन या ठिकाणी टमटम रिक्षाने गेलो. तेथे रूम बुकिंग केलेल्या होत्या. महिलांना वेगळी रूम दिली होती. गेल्यानंतर आराम करा आठ वाजेपर्यंत आम्हाला सांगण्यात आले. झोपले तर झोप येईना. अस्वस्थता जाणवत होती. इथपर्यंत आलेय पण मला जमेल का? दर्शन होईल का?

सायंकाळी सात वाजता आंघोळ वगैरे आवरून टी शर्ट, थ्री फोर्थ पँट, बूट घालून तयार झालो. सर्वजण चहासाठी बाहेर पडलो. गिरनार चढायचा म्हणून रात्रीचे जेवण टाळले होते. बाहेर येऊन पाहिले तर पुढे उंचच्या उंच गिरनार पर्वत समोर उभा होता. रात्रीच्या अंधारामुळे अंदाज येत नव्हता पण समोर आहे तेवढाच गिरनार असा समज होता. परंतु त्यापाठीमागे तीन शिखरे आहेत हे माहित नव्हते. चहा घेऊन झाल्यावर आई म्हणाली मला डोली करू नको. मी चढेन सावकाश. मी तसे आम्ही ज्यांच्याबरोबर गेलो होतो त्यांना सांगितले तसे ते माझ्यावर भडकले. ते म्हणाले माझे ऐका थोडा अनुभव आहे म्हणून सांगतोय नाही जमणार त्यांना चढायला. माझी पण आई बरोबर आहे ना. या दोघींना डोलीच करू आपण. नको तिथे शहाणपण नका करू. हवं तर मी डोलीचे पैसे देतो पण डोली करा. मीही कन्फ्युज झाले. मी म्हणाले पैशाचा प्रश्न नाही हो, आई ऐकेना डोली नकोच म्हणतेय. आम्ही कसतरी आईला समजावले. मी आईला सांगितले तू पैशाची काळजी करू नको. तुला महाराजांचाच आदेश आहे डोलीतून येणेकरिता. त्यावेळी आई कुठे तयार झाली. ठरले मग. डोलीला आठ हजार रूपये लागतील असे आम्हाला सांगितले. मीही पटकन हो म्हणून ठरवून टाकले. रात्री दहा वाजता चढायला सुरुवात करायचे म्हणून आम्ही परत रूमवर येऊन थांबलो. उत्साहाने वेळेची वाट पाहू लागलो.

चला वाजले एकदाचे दहा. सर्वजण खोलीच्या बाहेर पडलो. तिथल्याच काठ्या प्रत्येकाला एक एक घेतल्या. थोडीशी गंमतच वाटली काठी घेऊन चढायचे. पण ठीक आहे. आईला रेनकोट घातला. बरोबर थोडे पैसे दिले. मीही जॅकेट शूज घालून निघाले. पहिल्यांदा जय गिरनारी म्हणून मोबाईलमध्ये फोटो काढले काही जणांनी. जुलै महिना असल्यामुळे हवेत गारवा जाणवत होता. गिरनारच्या पायथ्याशी आलो अन डोलीवाला ऐनवेळेला आठ हजारात परवडत नाही, दहा हजार लागतील असे सांगू लागला. मला तर आधीच ओढ लागलेली महाराजांची. त्यात वेळात वेळ नको म्हणून दहा तर दहा घ्या. जरा बोलेपर्यंत डोलीवाल्यांनी आईला डोलीत बसवलं देखील. मी त्यांना बोलले नीट न्या व आणून सोडा खाली. डोलीवाले झपाट्याने वरती चढून दिसेनासेही झाले. आता

उरलेल्या आम्ही सर्वजणांनी पहिल्या पायरीला नमस्कार करून जय गिरनारी म्हणून चढायला सुरुवात करणार तोच समोर सर्पराज आले. तिथेच पावले थबकली. सर्पराज मात्र निवांत विनाभय पायरीवरून इकडून तिकडे निघून गेले. त्यावेळी सर्वांना सूचना केल्या सर्वांनी आपापल्या बॅटऱ्या लावा. काठीचा आवाज करत चढायला सुरुवात करा. जय गिरनारी !

आमची पहिलीच वेळ असल्यामुळे पूर्ण तयारीनिशी आम्ही आलो होतो. सर्वांनी चढायला सुरुवात केली. प्रत्येकजण आपापल्या कुवतीप्रमाणे मागे पुढे होत गेला. आता फक्त पायरीवर मी अन भाभी दोघीजणी काठी वाजवत चढू लागलो. पहिलीच वेळ असल्यामुळे दम भरपूर लागलेला. थोडीशी मनात भीती. तशातच अधूनमधून पाऊस पडत होता. रात्रीचा किर्र असा अंधार ग्रुपमधील एखादं दुसरं पुढे गेल्यावर भेटायचं आणि पुन्हा पुढे निघून जायचं. मी माझ्या दत्तगुरुंचा धावा करत होते तर भाभी त्यांच्या गुरुंचा. दोघींचा गुरू एकच पण नावे मात्र वेगळी असावीत असा माझा समज. अंधारात काठीचा आवाज करत आम्ही दोघी एक एक पायरी सर करत पुढे जात असताना एक अनोळखी व्यक्ती गोरी, उंचपुरी चष्मा घातलेली अगदी फॉरेनर शोभावी अशी आमच्याबरोबर कधी मिसळली आम्हालाही कळले नाही. पण त्या व्यक्तीचे बोलणे हिंदी भाषेत असल्यामुळे आम्ही त्याला भैय्या म्हणू लागलो. तो भैय्या आमची खूप काळजी घेत होता. सर्वजण ग्रुपमधले मागे पुढे निघून गेले असताना त्या भैय्याने मात्र आमची साथ सोडली नाही. मी व भाभी थकलो तर तो आम्हाला दोन मिनिटे बसायला सांगायचा. हातात पाण्याची बाटली तीही टोपण काढून द्यायचा व दोन घोट पाणी घ्या बोलायचा आणि तो मारुती स्तोत्र, दत्तात्रेय स्तोत्र म्हणत राहायचा. असे करत करत आम्ही निम्मा गिरनार कधी चढलो समजलेच नाही. वाटेत पावसामुळे वातावरणात खूप गारवा जाणवत होता. घातलेले शूज, जर्कीन भिजल्यामुळे जड जाणवत होते. त्यामुळे आम्ही दोघींनी पायातील शूज एका ठिकाणी काढून ठेवले व मोकळ्या पायांनी चालायला सुरुवात केली. मधेच एक चहाचे दुकान चालू होते. भैय्याने विचारले चहा घेऊ या का? आम्ही हो म्हणत चहा घेतला. पर्समधून पैसे काढायच्या आत त्या भैय्याने

चहाचे बिल देऊन टाकले. आम्हाला ओझे होऊ नये यासाठी साधी पाण्याची बाटली देखील आम्हाला घेऊ दिली नाही. त्याच्याकडेच दोघींच्यापण बाटल्या होत्या. आम्ही न राहवून भैय्याला विचारले आप कहा से आये हो तर हसतमुखाने त्याने सांगितले मुंबई आणि मीही तुमच्याच ग्रुपमधील आहे असं सांगितल्यावर आम्ही आणखीनच बिनधास्त झालो. आमची पहिलीच वारी असल्यामुळे फक्त सुरुवातीपासून पायऱ्या चढत राहिलो होतो. मंदिर केव्हा व कुठे आहे याचा अंदाजही नव्हता. आता मध्यरात्रीचे दोन वाजले होते. जवळ जवळ आम्ही सहा हजार पायऱ्या चढून वर आलेलो होतो. त्यावेळी भैय्यापासून आम्ही दोघी थोडेसे मागे पुढे झालो होतो. थकवा खूप जाणवत होता. मंदिर कधी यायचे, अजून किती राहिले असेल असा विचार करत असताना अचानक अंधारात एक आकृती समोर येऊन ताडकन उभी ठाकली. दोन सेकंद काय घडतेय समजेनाच. तोच आम्ही दोघी दत्त महाराज किती लांब आणि अवघड ठिकाणी बसलाय असे म्हणत त्या आकृतीचे पाय धरले आणि भाभीनेही तिच्या गुरुंचे नाव घेत पाय धरले. अंगावर शहारा आणणारा तो क्षण आजही डोळ्यासमोर जसाच्या तसा उभा राहतो आणि त्यावेळी भैय्या आमच्या सोबत नव्हताच. काय अन कसे घडले हे सांगण्यापलीकडचे होते. तिथपासून आम्हाला आलेला थकवा नाहीसा झाला होता आणि आम्ही पुन्हा भैय्यासोबत पायऱ्या चढू लागलो.

आता आम्हाला खूपच फ्रेश वाटत होते. वारीचा अगदी शेवटचा टप्पा येऊन ठेपला होता. समोरचे, आजूबाजूचे आम्हाला काहीही दिसत नव्हते. फक्त पुढची पायरी आम्ही चढत राहिलो होतो. आता या टप्प्यात ग्रुपमधील बरेचजण भेटत होती. कोणीतरी मधेच म्हणायचे आले आले हे काय जवळ आलेय. त्यावेळी खूप हायसे वाटायचे पण नंतर कळायचे खूप लांब आहे. अजून खूप चढायचे आहे. बरोबर पहाटे चार वाजता ग्रुपमधील व इतर लोक दत्तकमान व कमंडलूधूनी येथे थांबले होते. कारण मंदिर साडेपाच वाजता उघडणार होते आणि जेमतेम दीड हजार पायऱ्या महाराजांपासून आम्ही लांब होतो या भावनेने मन भरून आले होते. इतक्या दिवसांचे स्वप्न साकारण्यापासून अवघा एक तास बाकी राहिला होता. डोळ्यातून आपोआप पाणी ओघळत होते. अचानक मला थंडी

वाजून आली वरून पडणारा पाऊस, पायऱ्यांवरून वाहणारे थंड पाणी, त्यामधे पायात काहीही नसल्यामुळे आणखीनच गारठल्यासारखे झाले होते. तिथेच एका बाजूला दोन्ही पाय, हात आकडून हू हू करत बसले होते. ग्रूपमधील एकाने मला स्वतःची शाल पांघरण्यासाठी दिली. एकाने त्याचे शूज दिले आणि भिजवू नका असे सांगितले पण पडणाऱ्या पावसात ते भिजलेच असते त्यामुळे मी ते घेतले नाहीत. तशीच शाल पांघरून कुडकुडू लागले. महाराजांचा धावा करू लागले तर काय अचानकपणे मला माझ्या पायाखाली गरम पाणी जाणवू लागले. सुरुवातीला मला भास होतोय असं समजून मी दुर्लक्ष केले पण खरंच आणि खरंच माझ्या पायाखाली गरम पाणी होते. माझा स्वतःवर विश्र्वासच बसत नव्हता. एवढ्या पावसात आणि तीन हजार फूट उंचीवर माझ्या पायाखाली गरम पाणी आलेच कसे? हा प्रश्न सुटण्यासारखा नव्हताच. तरीही मी खातरजमा करण्यासाठी सोबत असलेल्या भाभीला माझ्या जागी उभे राहण्यास सांगितले आणि पाणी गरम लागतेय का असे विचारले. भाभी हो म्हणाली. धन्य झाले मी आणि पावन झाली माझी गुरुभक्ती. थंडीचा लवलेशही आता शरीरात उरला नव्हता. तेवढ्यात गुरुशिखरावरून गुरुंच्या आरतीचा घंटानाद ऐकू येऊ लागला. तसे आम्ही पुन्हा महाराजांकडे मार्गस्थ झालो. अगदी काही पायऱ्यांवर महाराज भेटणार होते. शेवटी आला तो क्षण. पर्वताच्या शेवटच्या टोकावर चिंचोळ्या पायऱ्यांवरून आम्ही मंदिरात प्रवेश केला आणि महाराजांना घट्ट मिठी मारावी तसे त्यांच्या चरणांवर नतमस्तक झालो. अश्रू अनावर झाले. कशाचेच भान उरले नाही. खूप प्रेमाने आणि भरल्या डोळ्यांनी महाराजांना होता होईल तेवढे डोळ्यात साठवत गेलो. गुरुपौर्णिमेची ती पहिली गिरनार वारीची पहिली भेट अविस्मरणीय शब्दात वर्णिता येणार नाही अशी होती. संपले सगळे कष्ट, संपली सगळी वणवण. क्षणभर सर्वच गोष्टींचा अगदी मी कोण याचा देखील विसर पडला. खूप आत्मीयतेने दर्शन घेऊन आणि परत नाही येणार अशा दृष्टिक्षेपाने माघारी फिरलो परतीच्या प्रवासाला. पण या सर्वामध्ये भैय्या कुठे होता याचे भानच राहिले नव्हते. पुन्हा मात्र पाचशे पायऱ्या उतरून झाल्यावर भैय्या परत आमच्याबरोबर गिरनार उतरू लागला. गुरुपौर्णिमा असल्यामुळे त्या दिवशी जैन

लोकांची देखील मोठ्या प्रमाणात गर्दी जाणवत होती. वाटेत भेटणारे जैन लोक जय जिनेंद्र असे म्हणायचे. आम्हीपण जय गिरनारी असे म्हणून उत्तर द्यायचो. असे करत असताना आमचा भैय्यापण जय गिरनारी त्या लोकांना बोलायचा. अशातच त्यातील एकजण म्हणाला जय जिनेंद्र बोलो. भैय्या म्हणाला नही बोलेंगे जबरदस्ती है क्या. हम तो जय गिरनारी बोलेंगे क्या कर लोगे? मी आणि भाभींनी भैय्याला समजावले जाने दो भैय्या झगडा मत करो चलो आगे. जय गिरनारी असे म्हणत पुढे नेले. भैय्या रागाने लाल झाला होता. आम्हीच त्याला समजावून सांगितले आणि पुढे जाऊन एका ठिकाणी चहासाठी थांबलो. सकाळचे आठ वाजले होते. चहा आणि बिस्कीट घेतले. तेथेही भैय्याने चहा आणि बिस्कीट हातात आणून दिले आणि बिलही त्यानेच दिले. मी म्हटले भैय्या शुरू से आप ही चाय का बिल दे रहे हो अभी हम देते है. तर भैय्या म्हणाला नीचे जायेंगे तो आप लोग दे दो. इधर तो मैं ही दूंगा. हम चूप ही बैठ गये. जसजशा पायऱ्या उतरत होतो तसतसा पायांना खूप त्रास होत होता. पायच उचलू वाटेना. असह्य अशा वेदना होत होत्या आणि मग माझ्यातला राग उत्पन्न होऊ लागला. रागारागाने गुरुमाऊलीला खूप काही बोलून गेले. आता परत येणारच नाही, पुन्हा पायरी चढणार नाही असं बरंच काही. एका ठिकाणी सर्वजण मोबाईलमध्ये फोटो काढत होते. आम्हीपण भैय्याला आमचा फोटो काढण्यास सांगितले आणि आम्ही त्याचा काढताना त्याने काढूनच दिला नाही. पाय खूपच दुखू लागले. एकदा बसले की उठण्यास त्राणच उरत नव्हता. शेवटच्या तीन हजार पायऱ्या उतरायच्या राहिल्या होत्या आणि भैय्या आमच्याबरोबर नसल्याचे लक्षात आले. आम्ही खूप शोधले पण दिसलाच नाही. याचा अर्थ लावायला महातज्ञ तर आपण नक्कीच नाही परंतु भक्तीने विचार केला तर तो भैय्या दुसरा तिसरा कोणी नसून साक्षात दत्त महाराज होते याची आम्हाला प्रचिती आली. याविषयी लिहिण्याची माझी तरी बुद्धी चालणार नाही हे नक्की.

असो भाभी आणि मी खूप दमत दमत पायऱ्या उतरत होतो. येणाऱ्यांना अजून किती पायऱ्या उतरायच्या राहिल्यात अशी विचारणा करत होतो. सांगणारेही आता थोड्याच राहिल्यात असा दिलासा देत होते. कदाचित त्यांना

आमची हालत पाहवत नसावी. आईला घेऊन गेलेले डोलीवाले मला येताना कुठेही दिसले नव्हते. आम्ही ज्यांच्याबरोबर गेलो होतो त्यांचा फोनही लागत नव्हता. आई अजून कशी खाली जाताना दिसली नाही याची काळजी लागून राहिलेली. मनात नको नको ते विचार घोंगावत होते. भाभींना पण आता उतरणे सहन होत नव्हते. दोघीजणी एकमेकींना आधार देत कसेतरी पावले उचलत होतो. मी तर रडतच उतरत होते. मधूनच माऊलींवर रागावत होते. हळूहळू भाभी पुढे निघून गेली. मी एकटीच रडत रडत उतरताना अजून आई कशी दिसेना म्हणून पुन्हा माघारी पाचशे पायऱ्या चढून पाहिले पण आई काय दिसेना. हताश होऊन एका ठिकाणी दगडावर बसले होते तेवढ्यात आम्हाला नेणारे तेथे आले. ते दिसताच मला धीर आला. त्यांना आईबद्दल विचारले. ते म्हणाले आई केव्हाच खाली पोहोचली सुध्दा. तुम्ही का रडताय चला उठा. मी रागाने त्यांनाही बडबड केली. कशाला आणले आम्हाला, इथून पुढे येणार नाही असे बरेच. पण त्यांनी काहीच न बोलता माझे पाय दाबून दिले. पेनकिलरच्या  दोन गोळ्या खायला दिल्या आणि हाताचा आधार देत खाली नेले. लिंबू सरबत दिला. पायाची मालिश करून दिली. रूमवर जायच्या आधी नको म्हणत असतानाही पोटभर जेवायला घातले आणि रिक्षाने रूमवर आणले. धन्य ती गुरुमाऊली. गिरनारला येणाऱ्या प्रत्येक भक्ताची स्वतः काळजी घेऊन सेवा करते. अशी झाली माझी पहिली गिरनार वारी.

**II अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त II**

# गिरनार यात्रा: एक विलक्षण दत्त अनुभव

श्री. सचिन वासुदेव भोगाडे

मु. भोयरे गांगर्डा, ता. पारनेर, जि. अहमदनगर



तसं दत्तात्रेय भगवंताच आणि माझं नातं हे लहानपणापासून अतिशय घट्ट आणि भक्तिमय आहे. कारण माझ्या गावी (भोयरे गांगर्डा, ता. पारनेर, जि. अहमदनगर) खुप जुने अंदाजे ८० व्या दशकातील दत्त मंदिर आहे. कै. रावसाहेब पंढरीनाथ रसाळ सर हे आमच्या गावातील परमभक्त. दर गुरुवारी मी पहिलीला असल्यापासून दहावीपर्यंत दत्तात्रेय भगवंताची आरती ठरलेलीच. त्यामुळे दत्तात्रेय भगवंताबद्दल भक्ती हि लहानपणापासून आहे. महाराष्ट्रातील दत्त भगवंताची सर्व क्षेत्रे माहित होती. पण गिरनार पर्वत हे ठिकाण मला २०१२ ला समजले. ते असे कि माझे मेक्लोइड्स फार्मास्युटिकल कंपनीतील विनोद पेडणेकर सर हे गिरनार वारी करून आले. तेव्हा समजले हे ठिकाण गुजरातमध्ये असून तेथे गुरुशिखरावर भगवंताने दहा हजार वर्षे तपश्चर्या केली आहे. तेव्हा ठरवलं नक्कीच भेट द्यायची. पण म्हणतात ना आपण देवाला जात नाही, देव आपल्याला बोलावतो. त्यानंतर खुपदा ठरवले पण योग आलाच नाही. माझे गुरूवर्य श्रीकृष्णकृपांकित श्री विकासानंद महाराज मिसाळ यांच्या श्रीमद्भागवत कथेत ऐकलं कि दत्तात्रेय भगवंत रोज रात्री विश्रामाला गिरनार पर्वतावर जातात. मग २०१९ ला ठरवलं कि यंदा नक्कीच जायचं. कारण माझे इंडोको रेमेडिज मधील सहकारी खुप उत्सुक होते. पण काय कोरोनाने आमच्या इच्छेवर पाणी फेरले. माझा इंडोको मधील एक मित्र पराग रिसबूड हा त्याच्या प्रत्येक जवळच्या मित्राला "गुरुचरित्र आणि दत्त अनुभूती" भेट देतो. त्याच दत्त अनुभूती पुस्तकात गिरनारवारी बद्दल लोकांचे अनुभव वाचायला भेटले.

मी डिसेंबर २०२० ला सेंटोर फार्मास्युटिकल कंपनीत रूजू झालो. त्यावेळी माझी ओळख डॉ. संदिप देसाई सर यांच्याशी झाली. सुरवातीच्या भेटीतच ते दत्तात्रेय भगवंताचे किती परमभक्त आहेत आणि त्यांना भगवंताचा आलेला अनुभव सांगितला. सर दरवर्षी गिरनारवारी करतात. सरांना मी बोललो सर योग येईना, सर बोलले त्याने ठरवलं तर नक्की येईल आणि अशाप्रकारे तो योग जुळवून आलाच. पाच डिसेंबरला मी माझ्या गुरुंना सहज फोन केला आणि कळलं मार्गशीर्ष महिन्याच्या पहिल्या गुरुवारी दि. ०९/१२/२०२१ ला आपण गिरनारवारी करायचीय. माझे सिनीअर डॉ. संदिप सरांना विचारलं तर त्यांनी एका क्षणात परवानगी दिली. मग मंगळवार दि. ०७/१२/२०२१ साठी माझा मेहुणा रणजित ढवळे यांनी दुपारी १:४५ ची मुंबई वेरावल एक्स्प्रेसचं बुकिंग केलं. भगवंतानी मला बोलावलं कारण ट्रेन फुल असताना तात्काळ मध्ये तिकीट भेटलं आणि अशाप्रकारे प्रवास सुरू झाला. निघताना बायको बरीच शीधा देत होती. पण मी प्रवासात शक्यतो फळ खातो आणि जास्त आहार टाळतो. त्यामुळे काहीच घेतलं नाही. माझ्या शेजारी मुंबईतील पण मुळचे जुनागड मधील एक कुटुंब होतं. त्या ल़ोकांना मानलं पाहिजे. खुप प्रेमळ लोक, सहप्रवासी लोकांना अगदी लगेच आपल्या कुटुंबातील असल्यासारखी वागणुक देतात. मी जरी ठरवलं काही खायचं नाही तरी त्यांनी मला २ वाजल्या पासून खुपदा आग्रह केला खाकरा, ढोकळा, उंदिओ. पण मी जिद्दीने नाहीच बोललो.

साधारणतः रात्री १० ला गाडी बडोद्यात आली. मला खूप भूक लागली होती. काय करावं. म्हणतात ना देव कुणालाच उपाशीपोटी झोपू देत नाही .त्या लोकांनी मला अति आग्रह केला. मग काय मी त्यांना नाही रोखू शकलो. वाटलं भगवंताची ईच्छा आहे आणि आपण गिरनारला चाललोय. मग मी व्हेज सॅन्डविच खाल्लं आणि एवढी सुंदर झोप लागली. मी डायरेक्ट ५:३० लाच उठलो. कारण मला त्याच लोकांनी उठवलं. " भाई उठो जुनागड आया ". नाहीतर मग मी वेरावल ला गेलो असतो. हा पहिला अनुभव आला मला प्रवासात. जुनागड जंक्शन अतिशय स्वच्छ आणि शांत होतं. मी उतरून डाव्या साइटला जायचं असं त्या सहप्रवाशांनी सांगितले. मी स्टेशनच्या बाहेर आलो तसं गिरनार तलेठी

असं टमटमवाले ओरडत होते. मला पाहून एकजण आला आणि बोलला चलो सर बैठो. मी बोललो किती घेणार. तो बोलला सौ रूपये. मला जरा जास्तच वाटले. मग मी त्याला स्किप करत इतरांना विचारलं तर कुणी १२०, १३० बोलले. शेवटी फिरुन त्याला बोललो चल बाबा. त्याने होऊन त्याची ओळख सांगितली आणि चक्क माझ्याशी मराठीत बोलला. माझं नाव मकबुल. माझी सासुरवाडी सोलापुरात आहे. इथे येणारे ९०% लोक महाराष्ट्रातील असतात. त्यामुळे आम्हाला मराठी येते. तो धर्माने जरी मुस्लिम होता पण काय सांगू , मला बोलला, गेली वीस वर्षे झाली दत्तात्रेय महाराज कि सेवा करता हू. पर्वत पर आठ दिनमे दो बार जाना पडता है. आपको फसाऊंगा नहीं. दत्त महाराज माफ नहीं करेंगे. तो बोलला कुठं जायचंय. मग मी सांगितलं "सनातन हिंदु आश्रम". त्याने मला वीस मिनिटात सोडले आणि जाताना बोलला, मेरा नंबर रख लो. वापस कभी भी गिरनार आओगे तो बस एक फोन करना. बंदा हाजिर रहेगा. तलेठी गावात पोहचलो आणि समोर पाहतो तर काय आकाशाला गवसणी घालणारा जणू काही महादेवाचं ते रूद्र रूपच आहे. मी महाराष्ट्रातील अवघड आणि मध्यम असे २०-२२ ट्रेक केलेत आणि डॉ. संदिप सरांनी मला सांगितले होते, कितीही मोठा गिर्यारोहक असला तरी जर गर्व जागरूक झाला तर दत्त महाराज नाहीच येऊ देत. ते गिरनार पर्वताचं रूप जेवढं आक्राळविक्राळ तेवढंच भव्य पण. त्यात दत्तात्रेय भगवंताचं रूप पाहायचा प्रयत्न केला. मग मला दत्तगुरु वाटले आणि भक्तीमय नजरेनं जणु गेल्या एक तपाची तपपूर्ती म्हणून मला दत्त गुरु बोलावत होते असं वाटलं. मी फेसबुक आणि गुगलवर गिरनार पर्वत म्हणजे तीन पर्वत एक अंबामाता, दुसरं गोरक्षनाथ, आणि तिसरं गुरशिखर. पण तलेठी गावातून फक्त गिरनार पर्वताचा अंबामाता शिखरच दिसतो. म्हणजे दत्तात्रेय भगवंत तिथे येऊनसुद्धा दिसत नाही. अंबामातेला वंदन केलं कि मगच दत्त महाराज दिसतात. ते पण आधी गोरक्षनाथ यांना भेटल्यानंतर. जो माणूस पहिल्यांदा गिरनारला येतो तो साऱ्या जगाला विसरलाच पाहिजे.

मग मी सिंगल रूम बुक केली. कारण संध्याकाळी माझे ११ गुरुबंधु आणि गुरूजी यांची मोठी रुम बुक करायच ठरलं. मग फ्रेश होऊन जरा बाहेर फेरफटका

मारावा असं ठरलं. मला निघाल्यापासून सतत मार्गदर्शन डॉ. संदिप देसाई सरांचं चालूच होतं. तिथे ठिकठिकाणी अरण्यात ऋषीमुनी, अघोरी असतात. त्यांना काही म्हणायचं नाही, ते काहीही बोलले, ओरडले की फक्त "जय गिरनारी" असं बोलायचं.

मी सुट्टी मागितली तेव्हा मी दत्तात्रेय भगवंतासाठी माझं ह्रदय काढुन द्यायला तयार आहे, असे आयआयटीत डॉक्टरेट घेतलेला माणूस बोलला. तेव्हा समजलं दत्त महाराज असं भक्तीप्रेम  कुणालाही देत नाही. त्याला भाग्य लागतं. सरांच्या दत्तभक्तीवर बोलायचं झालं तर दिवस कमी पडेल. असो सरांनी मला सांगितलं, तुझ्या कडे दोन दिवस आहेत. गिरनार मध्ये फिरून घे. तिथे तलेठी गावापासून दोन तीन किलोमीटर गिर अरण्यात "कश्मीरी बापू" हे जवळपास १०० पेक्षा जास्त वयाचे महान तपस्वी आहेत. त्यांनी आयुष्यभर "तारकेश्वर महादेव" या तेथील महादेवाची सेवा केली आहे. त्यांना अवश्य भेट. कुणाबरोबर तरी जा. एकटा नको जाऊस. मग मी साधारणतः १३:३० ला रुममधून बाहेर पडलो. मी ठरवलं माझे गुरूजी येईपर्यंत फलाहार घ्यायचा. मी नेमकच शेरनाथ बापू, गोरखनाथ आश्रमासमोरून चाललेलो. सहज डोक्यात विचार आला, आता जायचं कसं काश्मीरी बापू आश्रमात. तेवढ्यात एक पांढरा शर्ट आणि काळी पॅंट घातलेले एक सद्गृहस्थ समोर दिसले. माझ्याकडे पाहून हसले आणि म्हणाले, "आप महाराष्ट्र से हो क्या. मी हा बोललो. तर काय आश्चर्य मला बोलले चलो साथ मे खाना खाते है. मी बोललो सर क्या कुपन रहेगा. तर त्यांच पुढील वाक्य खूप अभिमानास्पद होतं, "अरे गिरनार में खाना मुफ्त मे मिलता है, कोई भी आदमी भुंखा नही रहता यहा". चलो मेरे साथ. काय करावं, त्यांच्या बोलण्यातील आदर पाहून मी विचारलं सर आप शिक्षक हो क्या. ते बोलले नही मैं अडव्होकेट हू, जूनागड कोर्ट में. मी बोललो ठिक है सर पर मुझे ,"काश्मीरी बापू के यहा जाना है. कोई बात नहीं, मुझे भी जाना है. लगेच मनात आलं हि दत्तात्रेय भगवंताची लिला आहे. मला काहीच कमी पडून देणार नाही. इथे माझी काळजी घ्यायलाच जणू  Ad. A.D Pramod यांना पाठवलं. मग मला ते शेरनाथ बापू आश्रम गोरक्षनाथ आखाडा येथील "अन्नछत्र" या  ठिकाणी घेऊन गेले. माझे गुरु

किर्तनात नेहमी सांगतात, "कुणाच्या ही हातचं अन्न खाऊ नये,अन्न बनवणारा तेवढा शुद्ध असावा, त्याची चित्तशुद्धी, बाह्यशुद्धी असावी. तेधील अन्न हे गोरक्षनाथांची सेवा करणाऱ्या साधकांनी बनवलेलं असल्याने इतकं स्वादिष्ट आणि पवित्र वाटलं कि तृप्त झालो.

**॥ दिगंबरा_दिगंबरा_श्रीपाद_वल्लभ_दिगंबरा ॥**

गिरनारला पोहचल्यावर दुपारच्या न्याहरी पर्यंत चा वेळ कसा गेला कळलेच नाही.मी बुधवारी पहाटे ५:४५ ला गिरनारच्या तलेठी गावात पोहचलो होतो.बुधवारी सायंकाळी माझे गुरू इतर गुरूबंधुसमवेत संध्याकाळी सात पर्यंत येणार होते.आणि९ डिसेंबरचा गुरूवार हा मार्गशीर्ष महीन्याच्या पहिला गुरुवार असा छान मुहूर्त गुरूंनी साधला होता.गुरूवारी पहाटे ४ला जायचं गिरनारला मग बुधवारी दिवसभर काय? तर मग मला डॉ संदिप देसाई सर बोलले कश्मीरी बापूंना भेटून ये.गोरक्षनाथ आश्रमापासून आत जंगलात तीन चार किलोमीटर आहे ,एकटा जाऊ नकोस, अघोरी असतात ,सिंह,वाघ असतात . कुणीही भेटलं तर जय गिरनारी एवढंच म्हणायचं.पण कोण भेटणार असा विचार करतच चाललो आणि स्वतः हून मला हाक मारून बोललेले वकिल.ए.डी.प्रमोद हे मला एक दत्तात्रेय भगवंतांनी पाठवलेले दूतच वाटले.त्यांच्याबरोबर दुपारची न्याहारी केली आणि आम्ही दोघे त्या शंभरहून अधिक वयस्कर महान तपस्वी कश्मीरी बापूंकडे निघालो.किर्र जंगल म्हणजे दुपारची दोनची वेळ असेल पण पावसाळ्यात जसे ढगांमध्ये वातावरण होतं तसं त्या जंगलात वातावरण.थोड चाललो आणि एक सुंदर पाण्याचा झरा लागला,इतक शुद्ध पाणी होतं विचारू नका.गिर अभयारण्यात लक्षावधी प्रकारच्या वनस्पती त्यांना स्पर्शून हे पाणी अतिशय शुद्ध आणि निर्मळ , तसेच कडयाकपारीत बसलेले रूषीमूनी यांच्या स्पर्शाने ते पवित्र असं वकिल प्रमोद बोलले.आमचा जंगल प्रवास चालूच होता.मला त्यांचा परीचय देऊ लागले.त्यांना इंडियन आर्मीत इच्छा होती भरती झालेले पण एकटा असल्याने नाही गेले.पुढे एल एल बी करून ते सरकारी वकील झाले.मुळचे जामनगरचे, त्यांना दोन ठिकाणी पोस्टिंग भेटलं एक राजकोट दुसरा जुनागड.पण

जुनागड पासून गिरनार फार जवळ आणि दत्तात्रेय भगवंताच सानिध्यात राहता येईल म्हणून वकिल साहेबांनी जुनागड निवडलं.मी त्यांना बोललो तुम्ही फार भाग्यवान आहात.ते बोलले "सरजी ऐसा कुछ नहीं,वो दत्तात्रेय प्रभूकी कृपा और प्रारब्ध है.कोई कोई लोक जो जुनागड परीसर मे जन्म देते है और पुरी जिंदगी निकल जाती है पर गिरनार पर दत्तात्रेय भगवंतको नहीं मिलते."

यहा गिरनार आनेवाले लोगोमें ९०% लोग महाराष्ट्र कें है. क्योकी दत्तात्रेय भगवंत महाराष्ट्र के हैं.इसलिए गिरनार रहनेवाले लोगोंको मराठी अच्छी तरह आती है.मग असं बोलता बोलता वकिल साहेब मला दत्त जन्मकथा सांगू लागले.मला सर्व कथा माहित होती पण ते इतक्या भक्तिभावाने सांगत होते,जणू काही या दत्तात्रेय भगवंतांच्या पवित्र भूमीत देवाचीच इच्छा असेल मी ती ऐकावी मी ती  एकचित्ताने ऐकत होतो.तेवढ्यात पाच सहा मोर आणि लगेच पाच मिनिटांत १५-२० हरणांचा कळप समोरून गेला.चलता चालता कश्मीरी बापूंचा आश्रम आला.आश्रमाच्या शंभर मिटर जवळ आलो तेव्हा तो दिसला.आश्रमासमोरच उंच झाडावर अनेक वानर त्यांच्या परीवारासोबत बसले होते.आम्ही समोरून गेला पण आम्हाला पाहून थोडे सुद्धा विचलित झाले नाही, आपल्याच मस्तीत मस्त होते.काश्मीरी बापुंचा आश्रम हा गिरनार पर्वताच्या समोर असणार्या "दातारेश्वर महादे पर्वताच्या" पायथ्याशी आहे.

दातारेश्वर महादेपर्वतावर जायची शकतो कुणी हिंमत करत नाही कारण,"त्या जंगलातगीर अभयारण्य परिसरातील सिंह, वाघ, आणि महादेवाचे कट्टर भक्त अघोरी असतात.आम्ही आश्रमात प्रवेश केला.सुरवातीलाच "कोडीयार देवीच मंदिर"अतिशय सुंदर, दर्शन घेतलं.आणि मग थोडं पुढे गेलो महादेवाच सुंदर मंदिर ,त्यात महादेवाचा एक जटाजुट धारी ,जसकि महादेव त्याच्या प्रिय अघोरी भक्तांच्या वेशात असा सुंदर फोटो, त्याला लागुनच काश्मीरी बापूंचा मला फोटो काढायचा खुप मोह झाला पण तेथील साधकांनी मला विरोध केला.मी असा महादेवाचा फोटो पूर्वी कधीच पाहिला नव्हता पण मला तो फक्त माझ्या स्मरणातच सेव्ह करावा लागला.आम्ही पुढे किश्मीरी महारांजांना भेटायला

गेलो.त्यांचे सेवेकरी यांनी आम्हाला लांबूनच इशारा करत सुमारे वीस एक फूट लांबूनच दर्शन घ्यायला सांगितले.महाराजांच वय जवळपास एकशे दहा असावं असं वकिल साहेब बोलले.एवढ वय पण डोळयात तेज जबरदस्त होत, तीक्ष्ण डोळयांनी माझ्या कडे पाहत स्मित करत मला हात उंच करून आशिर्वाद दिला आणि डावीकडे जाण्यास खुणावले.याचा अर्थ मला नाही समजला मग वकिल साहेब मला बोलले बस जैसा बोले वैसा करो.काश्मीरी बापूंकडे पाहून समजत होतं या महात्म्याने आयुष्यभर महादेवाची सेवा केली ,शरीर थकले होते पण त्यांचे डोळे त्यांच मन किती स्थिर आहे ते दर्शवत होते.आम्ही डावीकडे चाललो लगेच त्यांच्या सौ त्याही तशाच त्यांचही लांबूनच दर्शन घेतले,काहितरी ग्रंथ पुराण वाचत होत्या.त्या स्पष्टपणे बोलल्या सामने प्रशाद लेके जाणा."तेव्हा मला कळाल बाबांच्या डावीकडे जाण्यास अर्थ.एवढ किर्र जंगलात त्या आश्रमात दिवसभर अन्नदान चालू असतं.तेथील सेवक ते न थकता करतात.मी गोरक्षनाथ आश्रमात पोटभर जेवून सुद्धा त्या तपस्वींची इच्छा न मोडता थोडं वरणभात आणि दोन पुर्या खाल्ल्या.आमच प्रसाद ग्रहण चालू असताना एक आश्चर्य घडलं, आमच्या पुढ्यात एक वानरराज आले आणि एका ताटातील प्रसाद खाऊ लागले.त्यांना कुणाही साधकाने हटकले नाही,पोटभर खाऊ घातले जसे ते घरातील सदस्य आहेत.वकिलसाहेब बोलले सचिनजी ये है गिरनार,इसे कहते हैं जंगल में मंगल.इधर काश्मीरी बापू के आश्रममे कोई आता है रास्ते मे अगर शेर आया तो वो किसी भी प्रकार का हमला नही करेगा." त्यांच्या बोलण्यात जबरदस्त आत्मविश्वास होता.

एवढ्या किर्र जंगलात एवढा सुंदर आश्रम असेल हे कुणाला तिथे आल्याशिवाय नाही समजणार. आमचं प्रसाद घेऊन झालं. आम्ही हात तसेच ताट धुवून स्वच्छ ठेवलं. लगेच तिथल्या साधकाने आम्हाला इशारा करत ओला नारळ आणि साखरेचा प्रसाद दिला. थोडावेळ बाबांच्या आश्रमातील "एक छोटासा हॉल" जो ध्यानधारणे करीता होता तेथे शांत बसलो. एवढ्या पवित्र महादेवाच्या परीसरात खुपच शांत वाटत होतं. वीसएक मिनिटे झाली असतील, वकिल साहेबांना फोन आला घरून मग ते बोलले सचिनजी अब निकलते है.

मग आम्ही काश्मीरी बाबांना लांबूनच वंदन करत आश्रमाचा निरोप घेतला. वाटेत जाताना परत आश्रमातील वानरसेना कसलाही आवाज न करत आम्हाला जसं शांतपणे निरोप देत होते. आम्ही पुढे निघालो तसं चालता चालता चार पाच जण जे पुणे परीसरातील होते (त्यांची ओळख झाल्यावर त्यांनी सांगितले) ते विचारत होते हाच रस्ता का? त्यांनी मला नुसतं पाहूनच ओळखलं कि मी महाराष्ट्रीयन आहे. मी त्यांना हो बोललो. मग वकिल साहेबांना काय वाटतं कुणास ठाऊक. ते असं बोलले कि माझी छाती गर्वाने फुगून आली. मला बोलले सचिनजी, "महाराष्ट्र कें लोगों को हम गुजराती लोक छत्रपती शिवाजी महाराज के नाम से ही पहचानते है. पुरे देश में एक छत्रपती शिवाजी महाराज के मावळे और शिख लोक सबसे जबरदस्त है. मुघल मराठा सरदारोंको बहुत डरते थे इसलिए औरंगजेब महाराष्ट्र में भिकारी हो के मर गया". मी तर त्यांचे पायच धरले कारण माझ्या राजाचं एवढं कौतुक केलं तर आनंद हा होणारच. असं आमचा एकदम हसत हसत चालता चालता संवाद चालू होता. तितक्यात एक अनपेक्षित प्रकार घडला. थोड्या अंतरावर झाडीत एक महादेवाचे प्रिय अघोरी बाबा मोठमोठ्याने ओरडत होते. आम्ही पाहिलं जवळच हरणांचा कळप. त्यांना पाहून कधी हिंदीत, कधी गुजरातीत पण रागाने ओरडत होते. मला लगेच डॉ. संदिप देसाई सरांचे शब्द आठवले. ते बोलले होते , "अघोरींना काहीही बोलले तरी पण त्यांना माघारी न बोलता फक्त जय गिरनारी बोलायचं". पण काय सांगू ते अघोरी बाबा दिसायला एकदम आक्राळविक्राळ, डोक्यात भली मोठी चुंबळ केलेली जटा, शरीरावर कुठेच कपडे नाही. त्यांनी बहुतेक आमचा शिवाजी महाराजांचा संवाद ऐकला असावा. जसं आम्ही त्यांच्या थोडं जवळून जाऊ लागलो, मला आश्चर्याचा धक्काच बसला. तो अघोरी जोरजोरात ओरडू लागला, "कौन था शिवाजी, बहोत अच्छा था, शूर था, तुम सब बेकार हो, चल भाग"...असंच सारखं. मी फार घाबरलो. पण त्याच्या तोंडूनसुद्धा राजांनी स्तुती ऐकली. वाटलं जाऊन दर्शन घ्यावं. पण वकिल साहेब बोलले, "वो बोल रहा है चल भाग " तो सीधा चलो, बस उनको जय गिरनारी बोलो. मी त्याला जय गिरनारी बोललो आणि काय आश्चर्य तो शांत झाला. पण त्याने आमच्याकडील

लक्ष दुसरीकडे वळवून परत काहीतरी पुटपुट करत राहीला. मला खुप विशेष वाटलं त्याने एवढ्या दुरून कसं काय ऐकलं शिवाजी महाराजांच्या बद्दल. असो मी भीत भीत पण तेवढेच खुश होत चालू लागलो. कारण मला श्री गुरुदेव दत्त महाराजांच्या "जय गिरनारी" या नावाची आणि माझ्या राजाची किती किर्ती पसरली आहे यामुळेच खुश होतो.

बोलता बोलता आम्ही तलेठी गावात आलो. आता वकिल साहेब मला निरोप देणार होते. मी त्यांना बोललो "सर आपको मेरे लिए आज दत्त प्रभूने भेजा था". मी त्यांचं दर्शन घेतले. ते मला बोलले, "देखो सचिन तुम साफ दिलके हो इसलिए शायद तुम्हे आज भगवान ने कुछ भी कमी महसुस नहीं होने दी. यही गिरनार कि खासियत है. वैसे तो राम भगवान के अयोध्या में भी पापी लोग थे और श्रीलंका में पुरे राक्षसोमें एक रामभक्त बिभीषण भी थे. वैसे इधर जिसकी नियत खराब उनको खराब भी लोग मिलेंगे. वकिल साहेब माझा निरोप घ्यायला लागले. मी त्यांना फार आग्रह करून लस्सी पाजली. खुप खुश झाले. मला त्यांचं व्हिजीटिंग कार्ड दिलं आणि बोलले दत्तात्रेय भगवान की इच्छा से फिर मिलेंगे.

मी त्यांना निरोप दिला आणि आमच्या उद्याच्या गिरनार वारीची तयारी करु लागलो. आमच्या बारा गुरुबंधू मध्ये काही वयस्कर मंडळी मग मला माझे गुरुबंधू संतोष महाराज वाव्हळ ( शिंगवे पारगाव ता.आंबेगाव सरपंच) यांचा फोन आला कि रोप वे च ठिकाण जरा पाहून या आणि वयस्कर मंडळीसाठी बुकिंगचं पाहून या. मग मी त्या ठिकाणी गेलो. आमच्या मुक्कामी असणाऱ्या आश्रमापासून (सनातन हिंदु आश्रम) जवळच होतं ते. त्याला तेथील लोक उडान खटोला बोलतात. मग रुमवर जाऊन थोडा चहा घेऊन थोडी विश्रांती घेतली. साधारणतः पाच वाजले असतील. मला लगेच फोन आला गुरुबंधूचा. आम्ही गुरुंसोबत एक तासभरात येतोय. जुनागडपासून वीसएक किलोमीटर दूर आहोत. माझा आनंद गगनात मावेनासा झाला. कारण उद्या अखिल ब्रम्हांडाच्या गुरूंच दर्शन करायला जायचं होतं. ते माझ्या परमपूज्य गुरुंसोबत...जय गिरनारी.

गिरनार - गिर म्हणजे गिरी आणि नार म्हणजे नारायण. अशा या गिरीनारायणाच्या पवित्र भूमीत वेळ इतका पटापट जात होता. मला आता गिरनार मध्ये येऊन जवळपास बारा तास झाले होते. दत्तात्रेय भगवंत म्हणजे त्रिदेवाच रुप ब्रम्हा विष्णु आणि महेश. तिन्ही देव एकाच ठाई अशी साऱ्या ब्रम्हांडाची शक्ती. सारं ब्रम्हांड हे त्रिदेव चालवतात. एक (ब्रम्ह देव) जन्म घालतो, दुसरा पालनपोषण करतो (विष्णु) आणि तिसरा जिवन मुक्त करतो (महेश). श्रीमद्भागवत महापुराणात दत्तात्रेय भगवान हा श्रीकृष्ण परमात्म्याचा अवतार सांगितला आहे. माझे गुरुजी मिसाळ महाराज यांनी दत्तात्रेय भगवंताच खुप छान वर्णन केले आहे, "ब्रम्हदेवाच्या नेत्रापासून जन्माला आलेला पुत्र," आत्रेय.

अत्रेय आणि अनुसुया यांचा विवाह झाला. त्यांचा आधी भाव लक्षात घ्या. अनुसुया-असुया, ईर्षा,द्वेष. जिच्याअंतःकरणामध्ये द्वेष, ईर्षा, असुया नाही अशी असणारी जी आहे तिला म्हणावं "अनुसुया". जिच्यामध्ये कोणत्याही प्रकारची वासना नाही, वासनारहित जी स्थिती असते तिला म्हणावं "अनुसुया".

"अत्रेय"म्हणजे काय " अ म्हणजे नाहीत, त्रेय म्हणजे तीन गुण सत्व,रज आणि तम. या तीन गुणांच्या पुढे जी अवस्था प्राप्त झाली आहे तिला म्हणावं "अत्रेय". ज्यावेळी अत्रेय आणि अनुसुया या दोन भुमिका एकत्र येतात ना तेव्हा भगवान प्रत्यक्ष "दत्त" म्हणुन अवतीर्ण होत असतो. आपण खुप अडचणीत आहोत आणि एखादा मित्र किंवा एखादी व्यक्ती आपली अगदी झटपट आणि अनपेक्षितपणे मदत करते यालाच आपण सहज बोलतो, "काय दत्त म्हणून उभा राहिलास". असं दत्तात्रेय भगवंताबद्ल किती सांगावं.

चला बुधवार दिनांक ०८/१२/२०२१ चे आता संध्याकाळचे साडेसात वाजले आणि मला वाव्हळ माऊलींचा फोन आला. आम्ही गिरनार मध्ये पोहोचलो. पण नेमकं कुठे आहे तुम्ही. मग मी त्यांना सांगितलं सनातन हिंदु आश्रमाच्या जवळच एक "लंबे हनुमान मंदिर" नावाच मंदिर त्यांच्यासमोर मी उभा आहे असं सांगितलं. ते दोन मिनिटात तिथे पोहचले. मला गुरुजींना पाहून फार आनंद झाला. माझ्यासाठी दत्तात्रेय भगवंत त्यांच्याच रुपात आले आहे. ते गाडीतून

उतरल्या उतरल्या त्यांचं दर्शन घेतलं आणि मला त्यांनी विचारलं, "एकटाच आलास" ? मला राहावलं नाही पण काय माहित कुणास ठाऊक मी पटकन बोलून गेलो, "दादा दत्तात्रेय भगवंत होते सोबत एकटं कसं येऊ देतील मला. गुरूजींनी माझ्याकडे पाहून स्मित केलं, त्यांच्याकडे पाहून त्यांना इतका आनंद झाला होता काय सांगू. ते काहिच बोलले नाही पण हास्य मुद्रेने माझ्याकडे पाहतच राहिले. नंतर मी विचार केला काय होतंय मला हे सर्व दत्तात्रेय भगवंतच वदवून घेतायेत. कारण काल प्रवासात मला काहिच कमी पडू दिल नाही, सहप्रवासी किती आदराने वागले कारण गिरनारला जाणाऱ्या भक्तांची दत्तात्रेय भगवंत काळजी घेतातच. असो.

मी सर्वांना बुक केलेल्या रुममध्ये घेऊन गेलो. सर्वजण फ्रेश झाले. माझे गुरु आणि गुरुबंधू हे द्वारका आणि सोमनाथहून आलेले. गुरुबंधूंनी सांगितले कि गुरुजींना हॉटेल किंवा बाहेरचं बिलकुल चालत नाही. त्यामुळे संपूर्ण प्रवासात कुठे साधू संतांनी बनवलेलं किंवा सर्वजण स्वतः अन्न बनवत. गुरूजींनी त्यामध्ये एक दोन वेळा सर्वांना चपाती खाऊ घातली. आता जेवणाच काय मला असं वाव्हळ महाराजांनी विचारलं, नाहीतर आपण बनवू. मी लगेच बोललो इथे गिरनारमध्ये साधूसंत स्वतः अन्न बनवतात. मग आम्ही गुरूजी आणि गुरुबंधू सर्व जण शेरनाथ बाबा यांच्या गोरक्षनाथ आश्रमात रात्रीचं जेवण करण्यास गेलो. जेवण वाढणारे सर्व साधू महाराज. असं वाटायचं आपण रामायण, महाभारत सिरीयल मध्ये जंगलातील आश्रमातच भोजन करतोय. सर्वजण अगदी प्रेमाने आग्रह करीत होते. जेवण कितीही करा फक्त एक म्हणजे उष्टे टाकायचं नाही आणि दुसरे म्हणजे जेवताना कुणीही आपसात बोलायचं नाही असा दंडक. जेवण तर किती अमृततुल्य याच वर्णन मी दुपारच्या न्याहारीच्यावेळी केलं. जेवणाबरोबर एक वाटी ताकाची. काय सांगाव ते ताक "देशी गीर गाईचं. गीर गाई म्हणजेच याच गीर परीसरातील हा परीसर म्हणजे तीच माहेरघर. जेवणात बेसन बर्फी होती साजूक तुपातील. मला आणखी घेऊ वाटली. पण मला माझ्या गुरूंचा श्रीमद्भागवत कथेतील एक दृष्टांत आठवला. त्यात सांगितलं "साधकाने एखाद्या खाण्याचा पदार्थ फार आवडला तर त्याचा मोह धरू नये". गिरनार

मध्ये आलेली प्रत्येक व्यक्ती हि दत्तात्रेय भगवंताची साधक होऊन जाते. मी मोह आवरला आणि दुसरं म्हणजे आम्हाला पहाटे तीनला उठायचं होत. त्यामुळे आहार कमी या हिशोबाने मी तोंड आवरलं. आमचं जेवण झालं. गुरूजींसोबत जेवणाची ही पाचवी वेळ. फार समाधान वाटलं.

आश्रमाचे प्रमुख "शेरनाथ बापू" साडेसहा फूट उंच, चेहर्यावर तेज, वय सत्तरीच्या घरात पण चालण्यात एकदम रुबाब. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे गुरुबंधू. मी सकाळीच त्यांना भेटलो. तेथील साधकांना विचारलं, बापू कुठे आहेत. पण ते बाहेर कुठेतरी गेले होते त्यामुळे गुरूजींची भेट नाही झाली. पण साधक बोलले, “आश्रममे प्रभू गोरक्षनाथ के दर्शन कर लो”. तिथे गोरक्षनाथांचा एक अतिशय सुंदर फोटो आहे. गोरक्षनाथ म्हणजे शिवशंकराचा अवतार, कुरळे केस आणि महादेवाप्रमाणे दोन भुवयांच्यामध्ये तिसरा डोळा. पाहताच क्षणी समोरचा माणूस नतमस्तक झालाच पाहिजे.
आम्ही गोरक्षनाथ आश्रम पाहून कृतकृत्य झालो. एखाद्या पंचतारांकित हॉटेलला मागे सारील असं स्वच्छ आहे. आम्ही त्यानंतर थोडं शतपावली केलं आणि साधारणपणे दहाला परत सनातन हिंदु आश्रमामध्ये आलो. गुरुंनी सर्वांना लगेच झोपण्याची सुचना केली. मला तर झोपच येत नव्हती, कारण उद्याची सकाळ हि किती सुंदर असणार आहे हे शब्दात वर्णन करू शकत नव्हतो. मग मी गुरुंचं एक किर्तन मोबाइलवर चालू केलं आणि शांत झोपी गेलो. तीनचा गजर लावला होता. त्यामुळे बरोबर दोन वाजून पन्नास मिनिटांनी जाग आली. त्याबरोबरच गुरुबंधू वाव्हळ महाराज यांनी दार वाजवलं. मला बोलले गुरूंनी सर्वांना बरोबर जाग केलं. दत्तात्रेय भगवंताच्या रूपाने तेच आमची काळजी घेत होते.

आम्ही तेरा जणांपैकी पाच जण रोपवे ने जाणार होतो. बाकी आम्ही आठजण गुरुंचे दर्शन करून आखिलकोट ब्रम्हांडाचे गुरू दत्तात्रेय यांना भेटण्यासाठी निघालो. आश्रमाच्या बाहेर साधारणततः पहाटे तीन पन्नासला आलो. तोच एक ऐंशी वर्षांचे आजोबा ओरडले, "जय गिरनारी, आप लोग ऐसे काठी के बिना मत जाओ , ये काठी लो चलने मे तकलिफ कम होगी. चालिस रूपये

वापस देने के बाद बीस रुपये लेके जाना. आम्ही प्रत्येकाला काठी घेतली आणि त्याच आजोबांकडून कडक चहा घेतला. थंडी खुप होती पण आम्हाला बिलकुल काही जाणवत नव्हतं. असंच म्हणावं लागेल कारण सर्वजण दत्तात्रेय भगवंतांच्या भेटीसाठी आतुर होते. आश्रमासमोरचा रस्ता सरळ  गिरनार पर्वताच्या पायथ्याशी पायरी मार्गाकडे जाणारा. जेमतेम फक्त तिनशे मीटर दूर असेल पहिली पायरी आश्रमापासून. आम्ही पाच मिनिटांत आलो. पहिल्या पायरीचे दर्शन घेतले. आमच्यातील एक गुरुबंधू रामदास वाव्हळ उर्फ स्वामी माझ्या सारखाच धष्टपुष्ट माणुस, अगदी निरागस आणि खेळकर. जोरात ओरडले जय गिरनारी आणि आम्ही सर्वांनी त्यांना साथ देत जय गिरनारी म्हणत गिरनार वारी सुरू झाली. गिरनार यात्रा बदल आनंद कामत यांचं "दत्त अनुभूती" हे पुस्तक मला पराग रिसबूड या दत्तभक्ताने भेट दिलं होतं. त्यात गिरनार वारी करताना भक्तांना दत्तात्रेय भगवंत कधी वाघाच्या, सिंहांच्या, अघोरी, म्हाताऱ्याच्या किंवा इतर कसल्याही रुपात दर्शन देतात. पण वारी तशी भक्ती भावाने करावी. मी महाराष्ट्रातील गेल्या पाच वर्षांत वीस पंचवीस गडकिल्ल्यांचा ट्रेक केला आहे. दहा हजार पायऱ्या म्हणजे फार कठीण नाही असा थोडा फाजील आत्मविश्वास होता. पण जेव्हा सकाळी तलेठी गावात गिरनार पर्वताचं ते रूद्ररूप पाहिलं तेव्हा भगवंताने माझं गर्वहरण केलं. बरेचशे भाविक लोक ते अप्रतिम पण तेवढंच विशाल असं गिरनार पर्वताचं रूप पाहून त्याला नतमस्तक होतात आणि मनात एकच भाव उत्पन्न होतो, आता भगवंताला शरण जावं आणि मग आपला देव भक्तांवर किती प्रेम करतो याचाच प्रत्यय येतो. तसाच प्रत्यय मला आला पहिली पायरी आणि मला. चालू झाली गिरनार वारी. मनात येत होतं दत्तात्रेय भगवंत कोणत्या रूपात दर्शन देतील. पण नंतर त्यातच गढून गेलो आणि सर्वांच्या मागे राहिले. सोबत रामदास महाराज होतेच धापा टाकत. मग विचार करणं सोडलं आणि एकच ध्यास घेतला कसलाही विचार न करता फक्त "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" हेच नाम आणि ते पण मनात. मग काय एक वेगळीच ऊर्जा संचारली. मी सावकाश पण कसलाही थकवा न जाणवता चाललो होतो.

पहाटे गिरनार वारी चालु करण्यात एक मोठा फायदा हा कि आपल्याला जाणवत नाही, आपण किती वर आलोय आणि किती बाकी आहे, फक्त चालणे. आम्ही आठजणच होतो सुरवातीला. पण शंभर एक पायऱ्या झाल्या असतील. पाच सहा मुलं अगदी दहावी बारावीत असतील आमच्या मागून येताना दिसली. ती बहुतेक गिरनार परीसरातील असावीत, कारण त्यांनी दत्त महाराजांची गुजराती भाषेतील आरती ब्लूटूथ स्पीकरवर लावली होती. "श्री गुरुदेव दत्त अवधूत" खुप सुंदर आरती आहे. तिचं आरती सारखी मनात असते हल्ली. बाकी सर्व मुले पुढे गेली. पण एकजण आमच्या सोबत चालू लागला. खुप बडबड्या होता कधी हिंदीत तर कधी थोडं मराठीत बोलत होता. मग आमचे रामदास बुवा त्याला विचारु लागले, वरती कसं आहे, वाटेत वाघ भेटेल का? तो सडपातळ होता. तो मस्त बडबडत चाललेला. पण रामदास बुवा बोलता बोलता दमत होते आणि साधारणतः पन्नास पायऱ्या झाल्या कि सर्वांना सांगत 'थांबा थोडं'. हे असं दोन तीन वेळा झालं. मग संतोष वाव्हळ बोलले, अरे स्वामी तु कमी बोल किंवा बोलूच नको. त्यामुळेच दमतोय तू. सचिन पहा बरं, थोडा कमी तुझ्या एवढाच पण शांतपणे चालत आहे. मी पण मग स्वामींना (रामदास बुवा) प्रेमाने सांगितले, ' मनात नाम घ्या आणि चला ' नाही दम लागणार. मला का कुणास ठाऊक पण त्या बडबड्या पोरांचा थोडा रागच आला. उगीच काहीतरी बडबडत होता, शेर आता है , किसी को लेके भी जाएगा. आता मात्र स्वामी थोडे ओरडले. अरे बाबा असं बोलू नकोस. आम्ही घाबरणारे नाहीत. वाघ आला तर तो दत्त महाराज यांच्या रुपातील असेल, असं बोलल्यावर मात्र तो गप्प  बसला. स्वामी महाराज मला हळु आवाजात चालता चालता त्यांनी महाशिवरात्रीला रात्री १० ते सकाळी सात या वेळेत खिरेश्वर मार्गे केलेली हरीश्चंद्रगड महादेवाची परीक्रमा सांगितली. मला ऐकून छान वाटले. मग मी त्यानंतर सुरेश वाडकर यांच्या आवाजातील "दत्त नामाचा लागो छंद" हे भक्तीगीत लावलं. मग मात्र सर्व जण दत्त भक्तीत लीन होत चालू लागले.

साधारणतः आम्ही तासाभरात म्हणजेच सव्वा पाच पर्यंत अडीच हजार पायऱ्या सर केल्या. तो गुजराती तरूण मला मधेच गोरक्षनाथांचं कुठले तरी गीत

ऐकवा असं म्हणत होता. पण मी त्याच्याकडे दुर्लक्ष केलं. आता मला फार वाईट वाटत आहे, मी निदान त्याचं म्हणणं ऐकायला पाहिजे होतं. कारणही तसंच आहे कि आम्हाला जवळपास दिड तास झाला असेल आणि आम्ही तीन हजार पायऱ्या पार केल्या. किंचितसं उजाडलं होतं. वरून तलेठी गाव आणि जुनागड शहर तसेच आजुबाजुच्या डोंगररांगा आणि समोरच दातारेश्वर महादेव पर्वत. जणु गिरनार पर्वताला वंदन करत आहोत असंच वाटत होतं. नेमकं त्यांच वेळी तो तरूण आमच्यातून अचानक नाहीसा झाला कि पुढे गेला कळलेच नाही. विशेष म्हणजे त्याने तोंडाला बांधलेला रुमाल सोडलाच नव्हता. मला वाईट वाटलं थोडं का होईना पण त्यांच्याबद्दल थोडासा राग आला होता कि जो गिरनार वारीत नाही यायला पाहिजे. थोडी हळहळ वाटली, दत्त महाराज आपली परीक्षा घेतायेत. मग ठरवलं आता नाही राग आणायचा थोडासुद्धा. म्हणता म्हणता आम्ही "अंबाजी माता " मंदिराच्या जवळपास आलोच. वाटेत "कालीमातेच " एक अतिशय रौद्र रुपातील छोटंसं मंदिर दिसलं. लगेच दर्शन घेतलं आणि मला "सावरखेड एक गाव" या चित्रपटातील "आई भवानी तुझ्या कृपेने तारसी भक्ताला" हे गीत आठवलं. मी लगेच ते सुरू केलं. सर्वांना बरं वाटलं. आता जवळपास दोन तास झाले, भगवती म्हणजेच शक्ती तीचं स्मरण झाले. मग काय आणखी उत्साह संचारला आणि आम्ही पाच हजार पायऱ्यांचा टप्पा पार केला होता. आता तुम्ही म्हणाल हे कसं कळतं कारण दर पाचशे ते हजार पायऱ्या झाल्या कि त्यांचा अंक त्या पायरीवर लिहीलेला होता. जैन मंदिर, नेमीनाथ मंदिर पार करत आम्ही आता , "गोमुखी गंगा" या सतत जल प्रवाह असणाऱ्या तिर्थाचं दर्शन घेतलं. खुप प्रसन्न वाटलं. जसं आम्ही तिथून बाहेर आलो तेच समोर अंबामाता मंदिर पण मान वर केल्यावरच दिसत होतं. मी नवरात्रीत गुरूंच्या इच्छेने "दुर्गा सप्तशतीचं " नऊ दिवस पारायण केल होतं. ते वाचताना अंगावर शहारे यायचे. ज्यावेळी सारे देव हतबल होत, तेव्हा भगवतीने कशाप्रकारे दृष्टांचा नाश केला होता. अंबामाता मंदिर पाहिल्यावर चटकन मला ते आठवलं.

भगवतीचे बावन्न शक्तीपीठे आहेत. त्यातील गिरनार वरील "अंबामाता" हे देखील एक आहे. म्हणजेच काय तर आखिलकोट ब्रम्हांडाचे गुरू दत्तात्रेय भगवंत यांचं दर्शन घ्यायचय पण आधी आईला भेटावं लागेल. आईला किती महत्त्व आहे, याचं आणखी एक उदाहरण म्हणजे गिरनार पर्वत. मला तर खरं "माता अनुसया " काय बोलावं, मी तर एकदम समुद्रातील वाळुच्या लहान कणातील एक अणुच समजा रसायनशास्त्रातील. अनुसुया माता किती थोर,थोर हा शब्द पण कमी पडेल. साक्षात जगाच्या मालकांनी तिच्या पोटी जन्म घेतला. ब्रम्हाणी, माता लक्ष्मी, माता पार्वती तिला शरण आल्या. अस म्हणतात माहूर गडाच्या तिथे अनुसुया पर्वत आहे तिथे अनुसुया मातेने बालरुपी दत्तात्रेय भगवंताला पालथं करून आंघोळ घातली आहे.हे नुसतं ऐकलं तरी किती धन्य वाटत. माझे गुरूजी भागवत कथेत सांगतात, "तुका म्हणे पतिव्रता तिची देवावरी सत्ता". अनुसुया माता हि इतकी पवित्र होती कि त्रिदेवांना दत्तरुपात तिच्या पोटी जन्म घ्यावा वाटला. हेच मला सर्व अंबामाता शिखराच्या जवळ येताना आठवत होत तेच मला आता सांगू वाटलं. मग आम्ही थोडंसं थांबलो, ते माझ्या आग्रहाखातर कारण बऱ्यापैकी उजाडलं होतं. तलेठी गाव आणि परिसर वरुन खुप सुंदर दिसत होता. मला फोटोंची फार हौस हे सर्वांना माहित मग आम्ही बरेच फोटो घेतले आणि एकदाचं "अंबामाता मंदिर"आलं आणि आम्ही सहा हजार पायऱ्या पावणे तीन तासात पूर्ण केल्या. अंबामातेचं मंदिर साधारणतः उघडलं होतं पण आम्ही ठरवलं होतं गुरूजी आले कि गुरुजींच्या सोबतच मातेचं दर्शन घ्यायचं. आता जवळपास सव्वा सात वाजले होते. मातेच्या मंदिर परिसरातून खाली पाहिल कि वाटायचं आपण कैलास पर्वतावर आहोत आणि खाली लोक मृत्यूलोकात. आता खाली जायलाच नको. तुम्ही कुठल्याही शक्तिपिठावर जा तुम्हाला एक वेगळीच अनुभूती येईल. अंबामाता मंदिर परीसरात अतिशय प्रसन्न वाटत होतं.

साधारणतः साडेसात वाजले. गुरूजी आणि इतर चार जण रोपवे ने आले. रोपवे हा अगदीच मंदिर परिसरातच आहे. गुरुजींना पाहिलं आणि पुर्वेकडून लागलीच सुर्यनारायणाने ही अंबामातेच चरणस्पर्श केलं. गुरुजी पांढऱ्या वस्त्रात अतिशय तेजस्वी वाटत होते. ते आल्याने आम्हाला आणखीन उर्जा कारण जसं

एखादं अवघड काम असावं पण आपल्या सोबत आपले प्रिय लोक आपल्या सोबत असतील तर आपल्याला ते करताना काहीच अशक्य वाटत नाही अगदी तसं. आम्ही गुरुंसोबत अंबामातेचं दर्शन घेतलं. देवीचा गाभारा बराच आत आहे. शेंदूर असलेलं भगवतीचं रुप अतिशय तेजस्वी आणि भक्तिमय आहे. भगवतीला पाहून असं वाटलं, जसं काही आई आपल्या बाळाला सांगते, मी आहे तुझ्यासोबत चल आता बरोबर. आम्ही पटकन दर्शन घेतलं पण गुरूजी भगवती समोर दहा मिनिटे ध्यानस्थ बसले.

भगवतीच्या परीसरात आम्ही गुरुजींसोबत फोटो काढले आणि आईचा आशीर्वाद घेऊन मंदिराच्या मागील बाजूस गेलो तर काय सांगू. ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होतो ते दत्तात्रेय भगवंताचं गुरुशिखर सुर्यनारायणाच्या किरणांनी एवढं उजाळून निघालं होतं कि जणु सुर्यदेव आम्हाला सांगत आहे, थांबा आधी माझ्या दत्त महाराजांचं दर्शन मी घेणार कारण गेली कित्येक लाखो वर्षे मी दररोज न चुकता ते घेतोय. आम्ही सुर्यनारायणाला वंदन करून जणु त्याची परवानगी घेतली आणि न्याहाळू लागलो. जे मी गेली बारा वर्षे म्हणजे एक तप ज्या क्षणाची वाट पहातोय, जे फक्त फोटोत पाहिलं ते गुरुशिखर अजून चार हजार पायऱ्या दूर आहे पण ते आता चार पावलंच वाटत होतं. तेवढ्यात गुरूजी बोलले चला, मग मी भानावर आलो. माझे गुरू इतक्या झपझप चालत होते. त्यांच्यात आणि माझ्यात शंभर पायऱ्या एवढं अंतर. असं करता "गोरक्षनाथ शिखर " आलं.

**#दिगंबरा_दिगंबरा_श्रीपाद_वल्लभ_दिगंबरा**

**#जय_गिरनारी**

अंबाजी मातेचं दर्शन घेऊन गुरूजी आणि आम्ही साधारणतः दहा मिनिटात गोरक्षनाथांच्या शिखरावर आलो. याच ठिकाणी गोरक्षनाथांनी तपश्चर्या केलेली. दर्शन घेतलं. असं म्हणतात भक्ताची सेवा केली, स्तुती केली तर देवाला त्याची स्तुती किंवा सेवा केल्यापेक्षा जास्त आनंद होतो. गोरक्षनाथ म्हणजे साक्षात शंभू महादेवाचा अवतार. "दत्तप्रबोध" या ग्रंथात असं सांगितलं आहे कि

गोरक्षनाथ यांनी दत्त महाराजांना सांगितले मी कुठेही जाईल, लुप्त होईल तुम्ही मला शोधून काढायचं. अशाप्रकरे त्यांनी पृथ्वीवर वेगवेगळ्या जिवांच्या रूपात गेले पण दत्त महाराज म्हणजे साऱ्या ब्रम्हांडाचे मालक त्यांनी लगेच शोधून काढावं. त्यानंतर गोरक्षनाथ बोलले, आता तुम्ही लुप्त व्हा. यावर गोरक्षनाथांचे गुरू मच्छिंद्रनाथ बोलले अरे दत्त महाराज जगाचे मालक आहेत त्यांची कसली परीक्षा घेतोस. पण ते ऐकेना मग दत्त महाराज बोलले ठिक आहे. दत्तात्रेय भगवान अंतर्धान पावले. मग काय गोरक्षनाथांनी खुप सायास केलं पण दत्तात्रेय भगवान काही दिसेना. मग दत्त महाराजांच्या शिवाय माझं जिवन व्यर्थ आहे. ते बेचैन झाले आणि काकुळतीला येऊन मच्छिंद्रनाथांना बोलले, मी नाही राहू शकत दत्तात्रेय भगवंताशिवाय ते परत कसे प्रकट होतील. मग मच्छिंद्रनाथ बोलले गुरूदेव दत्त खुप दयाळू आहेत. तू त्यांना मनापासून शरण जा, ते लगेच प्रकट होतील. मग काय भक्ताने मनापासून हाक मारली कि देवाला यावच लागतं. दत्तात्रेय भगवंत प्रकट झाले आणि त्यांना दर्शन दिलं. मग गोरक्षनाथ महाराज यांनी याच गिरनार पर्वतावर ज्या ठिकाणी तपश्चर्या केली ते म्हणजे गोरक्षनाथ शिखर. याच शिखराच्या समोर गुरुशिखर आहे जेथे दत्तात्रेय भगवंतांनी दहा हजार वर्षे तपश्चर्या केलेली.

गोरक्षनाथ शिखर हे उंचीला गुरुशिखरापेक्षा थोडे जास्त आहे. त्याला कारण म्हणजे गोरक्षनाथांनी दत्तात्रेय भगवंतांना विनंती केली मी ध्यानस्थ स्थितीतून बाहेर पडल्यावर मला तुमच्या चरणांचं दर्शन व्हावं. ते ही दत्तात्रेय भगवंतांनी मान्य केले. अशा दत्तात्रेय भगवंतांच्या प्रिय शिष्य , भक्त गोरक्षनाथांचं दर्शन घेतले आणि समोर दिसणारं गुरूशिखर हे पहिल्यापेक्षा फार जवळ आणि स्पष्ट दिसत होतं. याच गोरक्षनाथ शिखरावर बहुतेक सर्वच लोक गुरुशिखराचा फोटो काढत होते. मी आणि गुरुबंधू सोमनाथ महाराज यशवंते तसेच राजेंद्र महाराज कुर्हे यांनी फोटो काढले. इथून पुढचा प्रवास जरी छोटा दिसत असला तरी सोपा नव्हता. कारण आता गोरक्षनाथ शिखरारून जरी दत्त गुरु शिखर समोर दिसत असलं तरी आता पुन्हा खाली उतरावं लागणार होतं. कारण देव जरी आपल्या ह्रदयात विराजमान असला तरी सगुण साकार रुपात दर्शन प्राप्त व्हायला

चौऱ्याऐंशी लाख योनीतून प्रवास केला तरी देव भेटेल याची शक्यता कमीच. गोरक्षनाथ शिखरानंतर पुढील प्रवास प्रचंड दमछाक करणारा. येणारा भक्त शक्यतो गोरक्षनाथ शिखरापर्यंत जेवढा दमत नाही तेवढा तिथून पुढच्या पायऱ्यांना दमतो. कारण गोरक्षनाथ शिखराच्या पुढे बरचसं खाली उतरावं लागतं. त्यानंतर थोडसं सरळ चालून परत उंच जायचं मग येतं दत्तात्रेय महाराजांचं गुरूशिखर. मला नेमकं गोरक्षनाथ शिखरावरून गुरुशिखराचा फोटो घेताना एक मजेशीर पण माझ्यासाठी कष्टदायी होणारा अनुभव आला. तो म्हणजे जी बांबूची काठी प्रत्येक गिरनारी भक्ताला दत्त महाराजांच्या कृपेने मोठा आधार देते तीच काठी गायब झाली कि कुणास ठाऊक. माझी इथून पुढच्या नेमकं अवघड वळणावर अडचण झाली. महाराजांनी माझी परीक्षा म्हणून गायब केली किंवा एखाद्या भक्ताला नसेल, त्याला वाटलं कुणीच नाही वाली म्हणून घेऊन गेला असेल. मी मात्र दत्तात्रेय भगवंताची लिला समजून तसाच चालू लागलो.

माझी सत्वपरीक्षा चालू झाली. पायऱ्यांची एकदम उतरण आली. पायावर अचानक प्रेशर आला, पण काही नाही नामजप चालू ठेवला. येणारे जाणारे जय गिरनारी म्हणत चाललेले. इतक्यात मी पाहिलं एक अपंग भक्त फरफटत पायरी उतरताना दिसला आणि मला पाहून बोलला, जय गिरनारी, मी धन्य झालो. मी पण मग जय गिरनारी अशी साद दिली. आणखी आश्चर्य एक महिला तिच्या बाळाला पाठीवर घेऊन "जय गिरनारी" म्हणत दर्शन घेऊन माघारी चाललेली. ते बाळ सहा ते सात महिन्याचं असेल. खरच दत्त महाराजांच्या भक्तीत किती ताकत आहे आणि काही लोक असेही भेटले जे अंबामातेच्या इथून गुरु शिखर पाहिलं, आणि तिथूनच नमस्कार करत बोलले आता समोरच शिखर पहा ,आपल्याला तेथे जाणे शक्य होईल असं वाटत नाही. आपण तिथं दर्शन घेऊन आलो असं समजू. हे बोलणारे शरीराने चांगले धडधाकट होते. त्यांची काही चुक नाही. त्यांचं प्रारब्ध त्यांना एवढ्या जवळ येऊन महाराजांचं दर्शन होऊ देत नाही. असो ज्याचं त्याचं प्रारब्ध. पण इथं माझं प्रारब्ध माझी चांगलीच परीक्षा घेत होतं. सर्व गुरुबंधू पुढे गेलेले. माझे गुरुजी बहुदा गुरुशिखरावर पोहचले देखील असतील. मी मात्र हळूहळू उताराच्या शेवटच्या चरणात आलेलो. म्हणजे

पहा बांबूची काठी किती महत्वाची आहे, ज्या बांबुपासून भगवान श्रीकृष्ण परमात्म्याची बासुरी बनते, ती गिरनार पर्वतावर पण सर्वांना आधार देत गुरुशिखरापर्यंत प्रत्येक भाविक भक्ताला पोहचवते. आजुबाजुचा परीसर अतिशय सुंदर आणि नयनरम्य दिसत होता. एकदाची उतरंड संपली, इथून दोन मार्ग होते. एक सरळ वरती आणि लगेच समजणारा ज्याला "दत्त गुरूद्वार " अशा नावाची कमान असणारा तर दुसरा त्या उतरणीच्या आणखी खाली पण थोडा पुढे "कमंडलुतीर्थ ", अन्नपूर्णा , "दत्तधुनी" कडे जाणारा.

आधी गुरुशिखर आणि शेवटी दत्तधूनीकडे जायचं. आता शेवटचा टप्पा चालू झाला. पहाटे काही वाटलं नाही अंधारात. आता तसे सकाळचे पावणे नऊ वाजलेले. कोवळं ऊन पण चढण अगदीच सरळ होती. बरोबर कुर्हे महाराज आणि सोमनाथ असे आम्ही तिघे. पण आमच्या सोबत महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून आलेले आणि गुजरातमधील भाविक भक्त. सर्वांच्या मुखात एकच स्वर "जय गिरनारी". आमचे गुरुबंधू स्वामी उर्फ रामदास वाव्हळ यांनी अचानक जोरात "जय गिरनारी" म्हणत सभोवतालचा परीसर दत्तमय करून टाकला. सर्वांनी त्यांना दाद देत जय गिरनारी असा सुर लावला. ज्या लोकांना चालणे शक्यच नाही पण गुरु शिखरापर्यंत यायचय असे लोकही डोलीची व्यवस्था असल्याने त्यातून जय गिरनारी म्हणत होते. आता दत्त महाराजांच्या चरण पादुका मंदिराच्या अगदीच जवळ आलो. माझे गुरूजी काही वेळापूर्वी दत्तात्रेय भगवंताचं दर्शन करून माघारी उतरत होते. मला सुचना करत बोलले, पुढे पोलिस हवालदार आहे. सर्वांनी मोबाईल खिशात ठेवा. आतमध्ये मोबाईल बाहेर काढण्यास परवानगी नाही. गुरूजींच्या चेहऱ्यावर अतिशय प्रसन्न भाव दिसत होते. मी पुन्हा एकदा गुरूजींना नमस्कार करून ज्या क्षणाची गेले एक तप वाट पाहतोय त्या तपोभूमीवरील दत्तात्रेय भगवंतांना भेटायला आतूर झालो. शेवटची चढण चढताना जी दमछाक झाली ती निघून गेली. कारणही असंच आहे, आपण चढण चढतो तेव्हा मंदीर वाटतं लगेच आहे. पण आपल्याला वळसा

घालावा लागतो आणि मंदिराचं द्वार तेव्हा दिसतं. मंदिर पुर्व पश्चिम दिशेत आहे. मला लांबूनच पाहून पोलिस हवालदार बोलले मोबाईल बाहेर. मी त्यांनाही जय गिरनारी म्हणत हो बोललो आणि एकदाचा आतमध्ये प्रवेश केला. भगवंतांच्या चरण पादुका न्याहाळू लागलो. खरच किती भक्त वेडे होतात याच दर्शनासाठी. एक वेगळीच अनुभूती आली. जगाच्या मालकाने हि जागा तपश्चर्या करण्यासाठी निवडली. लोकांचं आयुष्य संपून जातं पण नशीबात गिरनार दर्शन घडतं नाही, तिच हि जागा आणि अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे हि पवित्र पावन भूमी "फक्त योगी, तपस्वी, संत लोक यांनाच इथे पूर्वी परवानगी होती". संसारी लोक इथे येऊ शकते नव्हते.

आपण लोक दत्तात्रेय भगवंताचे परमभक्त टेंबे स्वामी यांचे उपकार मानायला पाहिजे. असं म्हणतात त्यांच्या विनंतीवरून त्यानंतर संसारी लोकांना गिरनार दर्शनाचं भाग्य मिळाले. म्हणजे किती दुर्लभ आहे हे ठिकाण. मी दत्तगुरूंना साष्टांग प्रणिपात केला. चरण पादुकांना लागुनच दत्तात्रेय भगवंताची मुर्ती आहे, महादेवाची पिंड आहे, शंकराचार्य आहेत. मंदिर आकाराने जरी छोटं असलं तरी तेथील दत्त अनुभूती काय आहे याच वर्णन मला आता शब्दात करता येत नाही. दहा हजार पायऱ्या सर करून आलो होतो पण त्याचं काहिच वाटत नव्हतं. दत्त महाराज सारं जाणतात , त्यांना एकच बोललो शक्य होईल तसं बोलवत रहा, नशीबात काहीही असो पण तुम्हाला या ठिकाणी भेटण्यात जो परमानंद आहे तो किती दुर्लभ आहे याचा अनुभव येतोय. तिथे दोन पुजारी होते. दर्शन झाल्यावर खुप आत्मियतेने मला बोलले, अब नीचे दत्तधूनी के इधर अन्नपूर्णा माता के इधर जाके गुरूजी का प्रसाद जरुर लेना. तेव्हा मला माहित झालं या इतक्या उंच ठिकाणी येणारा प्रत्येक भक्त पोटभर जेवण केल्याशिवाय दत्तात्रेय भगवंत त्याला सोडत नाही. मला तर असं वाटत होतं इथून जावूच नाही. पण काय करणार बाहेर इतर भक्तांना यायचं होत आणि आपलं प्रारब्ध पण आपल्याला येवढ्या तपोभूमीत जास्त वेळ थांबू देत नव्हतं. मी जय गिरनारी म्हणत तसाच मागे न वळता देवाकडे पहात पहात मंदिराच्या बाहेर आलो. जय गिरनारी म्हणत पायऱ्या उतरू लागलो. गुरूजी आणि इतर गुरुबंधू आमची वाट

पहात होते. मग त्या पुजाऱ्याच्या विनंतीला मान देत आम्ही कमंडलु कुंड आणि दत्तधूनीच्या दिशेने निघालो. आता उतरण होती आणि परत थोडं सरळ चालून आणखी उतरण होती. आम्ही वीस एक मिनिटांत दत्तधुनीजवळ आलो. दत्तधुनी आणि कमंडलु कुंड याबद्दल अशी कथा आहे. गिरनार पर्वतावर दत्तात्रेय भगवंत तपश्चर्या करत होते. खुप दुष्काळ पडला होता. मग भगवती माता अनुसूयांनी आपल्या पुत्राला दत्त महाराजांना सांगितले, पृथ्वीवर दुष्काळ पडला आहे. जिवांना जलाची गरच आहे. मग आईचं म्हणणं ऐकत दत्तात्रेय भगवंताने हातातील कमंडलू या ठिकाणी सोडलं. ते खाली पडल्याने त्यातून "कमंडलु कुंड" आणि खडकावर आपटून त्यातून जो अग्नी प्रज्वलित झाला तो म्हणजे "दत्तधुनी". आजही दत्तधुनी दर सोमवारी अचानकपणे प्रज्वलित होते. पिंपळाच्या पानाच्या समिधा इतर ठिकाणी यज्ञात कुठेही टाकत नाही. पण या दत्तधुनी मध्ये पिंपळाच्या समिधांना मान आहे. आम्ही कमंडलु कुंडाचं लांबूनच दर्शन घेतले. कारण त्या ठिकाणी काहीतरी बांधकाम चालू होतं. नंतर दत्तधुनीचं दर्शन करून अन्नपूर्णा मातेचं दर्शन घेतलं आणि लगेच तेथील साधु आणि साधकांनी येणाऱ्या प्रत्येक भाविक भक्ताला दत्त प्रसाद घ्यायला आग्रह केला. मला सगळंच धन्य वाटत होतं कारण मी माझ्या गुरुंजींबरोबर परत एकदा जेवण करणार होतो. आम्ही ताटे घेतली. अगदी हुबेहूब जसं गोरक्षनाथ आश्रमात, तसच इथेही अगदी प्रेमाने वाढत होते. साजुक तुपातील शिरा, ढोकळा, हरभऱ्याची भाजी चपाती,भात, ताक असं सुंदर भोजन. इथेही तोच दंडक जेवताना बोलायचं नाही आणि उष्टे टाकायचं नाही. याचा एक अनुभव आला. माझ्या समोर तेथील साधकाने एकाला उचिष्ट ठेवल्यामुळे चांगलंच ओरडले आणि ते सगळं खायला लावलं. त्यामुळे मी पण ताटात लागलं तेवढंच घेतलं. आमचं जेवण झालं. थोडावेळ त्या पवित्र ठिकाणी इतर गुरुबंधूंचे जेवण होईपर्यंत थोडं वरती येऊन पायरीच्या कडेला लवंडलो. तो आजुबाजुचा परीसर म्हणजेच गिरनारच्या चोहोबाजूंनी असणारे इतर पर्वत जणु दत्तात्रेय भगवंताची सेवा करत उभे आहेत असंच वाटत होतं. आणखी एक अतिशय सुंदर चित्र दिसलं ते म्हणजे गुरुशिखर परिसरात असणारे औदुंबरांचे झाडेच झाडे. त्याला आपण औदुंबर वनक्षेत्रच म्हणू.

असं म्हणतात नृसिंह अवतारात नृसिंह भगवंताने हिरण्यकश्यपूचा वध केल्यानंतर रक्ताचे नख हे औदुंबराच्या पानाला पुसले म्हणून ते नख लागल्याने पानांना इजा झाली आणि फोड आले. तो वृक्ष जखमी झाला पण नृसिंह भगवंताने त्याला आशिर्वाद दिला आणि सांगितले तुला इजा झाली तरी काळजी करु नकोस मी पुढील अवतारात तुझ्याच ठिकाणी वास करील. असे भाग्यवान औदुंबर पाहून मन प्रसन्न झाले. आता गुरुजींच्या  आज्ञेनुसार आम्ही परतीच्या मार्गाला लागलो. सर्वजण कृतकृत्य झाले होते. आम्ही तासाभरात अंबामाता मंदिराजवळ पोहोचलो. मग काहीजण रोपवे ने गेले. संतोष वाव्हळ, मी आणि इतर गुरुबंधू आम्ही तलेठी गावाकडे उतरू लागलो. आश्चर्य याचं वाटत होतं, आपण पहाटे एवढा पर्वत शिखर पार केला. चालताना पाय फार बोलत होते पण मी त्यांना बिलकुल जुमानले नाही. कारण सकाळी काही बोलले नाही आणि आता कशाला बोलता. मी दुर्लक्ष केलं. सुमारे अडीच तासात आम्ही खाली उतरलो. शेवटच्या पायरीच्या आसपास आलो असेल उसाच्या रसाचं दुकान दिसलं आणि तिथेच एक आजी मला काहीतरी दे म्हणत होत्या. मग मी माझ्याबरोबर त्या आजींना रस पाजला. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद मला लगेच भगवान तेरा भला करेगा असा आशिर्वाद घेत मी गावी आणि मुंबईला  प्रसाद न्यावा म्हणून दुकानात जावून तो घेतला. जवळपास तीन वाजलेले. मला पाचची जुनागड बोरीवली बस पकडायची होती. गुरुजी पुढे त्र्यंबकेश्वरला त्यांच्या गुरुंजवळ जाणार होते. मी गुरूंचा आशिर्वाद घेतला आणि सामानाची भराभर केली.

खाली आल्यानंतर प्रत्येकाचे  पाय दुखणारच यात काही नवल नाही. मग तलेठी गावात येथील लोक पायाची मालीश करतात आणि आश्चर्य म्हणजे लगेच आराम मिळतो. पण माझ्या नशीबात ते नव्हतं. मी बॅगेत सामान भरून बाहेर आलो. चेक आऊट केलं आणि रिक्षा पकडली. जाताना जुनागड येईपर्यंत सतत गिरनार पर्वतच पहात होतो. अशा परिस्थितीत जुनागड वरून बस निघाली आणि हायवेला लागली. जोपर्यंत गिरनार शिखर दिसतंय तोपर्यंत पहातच होतो. हे असं का घडत होतं. खरच किती प्रेम करतात दत्तात्रेय भगवंत आपल्या भक्तांवर. असे म्हणतात जो एकदा गिरनारला येतो तो परत परत यायचा संकल्प करतोच.

माझे गिरनारवारी नंतर आठ दिवस पाय दुखत होते. पण त्या वेदनेतही मला परमोच्च आनंद वाटत होता. खुप मित्रांचे फोन आले. अजुनही येतायेत, ओरडतायेत. कधी ट्रेकला निघाला तर दहावेळा फोन करतो पण गिरनारला गुपचूप आणि एकटा गेलास आणि गिरनार वारी हा लेख कसा काय लिहिलास? यावर माझं एकच उत्तर मी गिरनारला गेलो, मी एकटा नव्हतो. माझ्याबरोबर दत्तात्रेय भगवंत होते आणि लेख हा माझ्याकडून त्यांनीच लिहून घेतला. शेवटी राहिलं गिरनारला जायचं ते तर आपलं प्रारब्ध आणि दत्तात्रेय भगवंत बोलावतील मगच शक्य आहे.

**|| जय गिरनारी ||**

# माझी पहिली गिरनारवारी

श्री. आकाश खडके, पुणे




सन २०२१. गुरुपौर्णिमा माझी पहिली गिरनार वारी. मी गिरनारला का जायचे ठरवले ते आधी सांगतो. साधारण जानेवारी २०२१ च्या ५ ,६ महिने आधी संजय जोशी आमच्या समोरच्या घरात राहायला आले.तसे ते आमच्या इमारती मधले जुने सभासद पण माझी आणि त्यांची कधी अशी निवांत भेट झाली नाही म्हणून जास्त परिचय नव्हता.संजय जोशी स्वामी भक्त. आमच्या घरी सुद्धा आई आणि पत्नी स्वामी भक्त. आई खूप आधी पासून स्वामी सेवेत होती.आम्ही सर्व बहिण भावंडे सुद्धा स्वामी सेवेत होतो पण कळत नकळत माझ्या हातून स्वामी सेवा बंद झाली.खर सांगायचे तर म्हणतात ना मोठे झाले की माणसाला शिंग फुटतात तसे माझे झाले होते. पत्नी नुकतीच स्वामी सेवेत आली होती. माझ्या मागे लागून लागून तिने मला स्वामी ची १ माळ जप करत जा असे बोलून माझ्या कडून करून घेत होती. माझा मुलगा समोर जोशी कडे त्याच्या मुलासोबत खेळत असे. एके दिवशी मी जोशी कडे गेलो असता त्यांनी मला स्वामी चे नामस्मरण करत सुरू करा व ध्यान चालू करा तुमच्या साठी चांगले आहे. हे ऐकून मी मनात विचार केला मला का हे सांगत आहे.घरी येऊन मी आई व पत्नी मयुरीला सांगितले असे बोलत आहे म्हणून त्या दोघी बोलल्या चांगले आहे कर चालू. पण माझे मन तयार होत नव्हते.जोशी बोलले एक महिना करा चांगले वाटले तर पुढे चालू ठेवा नाही तर बंद करा. मला ते पटले बघू तरी करून असे बोलून मी सुरुवात केली.

सकाळी उठून मी उपासना चालू केली. तोच पुढील आठवड्यात माझ्या काका कडे स्वामी समर्थ पादुका आल्या होत्या मी जाऊन दर्शन व प्रसाद घेऊन

खाली आलो.पत्नी मुंबईला माहेरी गेल्या मुळे दर्शन करू शकली नाही पण तिने माझी बहिणीला फोन करून समर्थ पादुका आमच्या घरी येऊन शकतील का विचारले. जे गृहस्थ पादुका घेऊन आले होते त्यांना काकूने व बहिणीने विचारले व ते चालेल म्हणाले. ऋतुजा चा मला फोन आला मी पादुका घेऊन खाली येते तू पूजेचे ताट तयार कर. मी सर्व तयारी करून समर्थ पादुका येण्याची वाट बघत होतो. ऋतुजा त्या गृहस्थां सोबत पादुका घेऊन खाली आली मी पूजा करून पादुका देवघरात नेल्या आणि तेथून सर्व कालचक्र फिरायला सुरुवात झाली.माझे घर स्वामीमय होण्यास सुरुवात झाली.

कोरोनाची दुसरी लाट आली.आमच्या घरात सर्वांना कोरोनाची लागण झाली.मला व वडिलांना त्रास होत होता तर मयुरी, आई व आयुर ह्यांना कमी त्रास होत होता.तोपर्यंत माझी उपासना नियमित चालू होती. मला व वडिलांना उपचार घेण्यासाठी सरकारी रुग्णालयात हलविण्यात आले.माझी अवस्था फार बिकट झाली होती मला श्वास घेण्यासाठी त्रास होत होता.मी तेथील डॉक्टरांना सांगितले.त्यांनी ऑक्सिजन लावून सोडून दिले.मला त्रास खूप होत होता मी सांगून सांगून दमलो त्यांना. आता वाटले काही खरे नाही इथे राहिलो तर घरी परत जाऊ शकणार नाही. मला काही समजत नव्हते काय करू.त्रास वाढू लागला होता.काळ समोर दिसत होता.मी अमृता व कल्याणी ह्यांना फोन करून सांगितले.मनात भीती होती.मला आजूबाजूला काय चालू होते माहित नव्हते.मी घरी असे फोन करून सांगितले वर सर्व जण चिंतीत झाले.फोन येत होते पण शुद्धीत नसल्यामुळे फोन उचलू शकत नव्हतो.गिरीश शिंदे व अतुल मारणे यांनी मला तिथे येऊन खाजगी रुग्णालयात हलविले. गुरुचरित्र मध्ये लिहिले आहे.गुरू पाठीशी असेल तर काळ सुद्धा त्याच्या शिष्याला घेऊन जाऊ शकत नाही.गुरू ने स्वतःची काळजी न करता मला उचलुन धरले. खरच स्वामी नी त्यांना पाठवले.

खाजगी रुग्णालयात हलविले तेथील डॉक्टर म्हणाले शक्यता कमी आहे. फुफुस ७०% खराब झाली आहे. ICU मध्ये ठेवावे लागेल. माझी ही

अवस्था ऐकून सासरे पुण्याला येयला निघाले.ते येऊन कधी भेटून गेले मला माहित नव्हते.काय चालू होते मला माहित नव्हते. दुसऱ्या दिवशी दुपारी मी जागा झालो.ऑक्सिजन लावला होता बोलता येत नव्हते नीट.घरी फोन करून आता थोडे बरे वाटत आहे सांगितले. घरी मयुरी व आईने तारक मंत्र पठण सुरू ठेवले होते माझ्या साठी. बाकी सर्वांना फोन करून कळवा सांगितले.सासरे आयुर ला घेऊन मुंबई ला गेले कारण इथे सर्व जण आजारी असल्यामुळे त्याला अजून त्रास नको. मी सुध्दा रुग्णालयात रोज सकाळी उठून उपासना चालू ठेवली. माझ्यात पुन्हा ऊर्जा येऊ लागली.बरोबर सहा दिवसांनी मला ICU मधून घरी सोडले.घरी आलो स्वामी चरणी मस्तक ठेवून दुसरा जन्म दिला त्या साठी आभार मानले व ठरवले जेवढी जास्त स्वामी सेवा करता येईल तेवढी मी जिवंत असे पर्यंत करणार.

स्वामींनी माझे गुरू शिंदे आणि मारणे यांना पाठवले नसते तर माझे काही खरे नव्हते. जोशी माझे आध्यमिक गुरू ह्यांनी सर्व घरच्यांची काळजी घेतली. जे संपूर्ण ब्रम्हांड चालवतात असे साक्षात दत्त गुरूंनी २४ गुरू केले होते.जीवनात गुरू किती आवश्यक आहे हे मला समजले. जोशी गिरनार वारी करणार होते. त्यांना विनंती करून आम्हाला सुद्‌धा घेऊन चला बोललो. गुरुपौर्णिमेला आपण सर्व जाऊ म्हणून तयारी ला लागा असे ते बोलले.

गिरनारला जाणार म्हणून मी खूप खुश होतो. कोरोना मधून ठीक झालो होतो पण शरीर कमजोर होते. कोरोना लागण झाल्यापासून माझे वजन १० ते ११ किलो कमी झाले होते.डॉक्टर बोलले, मला अजून ६ महिने लागतील पूर्ण बरा होण्यासाठी. कारण माझे फुफुस ७०% खराब झाले होते.चालताना सुद्‌धा थकवा जाणवत होता.मी गिरनार कसे चढणार विचार करत होतो.एक महिना शिल्लक होता. डॉक्टर बोलले गिरनार वारी करू नका.माझे मन दत्त गुरूचे दर्शन करू असे म्हणत होते.गिरनारला जायचा दिवस उजाडला.पुण्याहून आमची रेल्वे होती.सात वाजता पुणे स्थानका वर भेटणार होतो.पुण्यात आणि बाकीच्या ठिकाणी पाऊस जोरदार हजेरी लावत होता.आमची

सात वाजता गाडी होती.मुंबईहून सासरे पुण्याला रवाना झाले.पाऊस जोर खूप वाढला होता. रस्त्यावर पाण्याचे तलाव झाले होते.तेवढ्यात जोशीचा फोन आला पाऊसामुळे रेल्वे रद्द झाली.जोशीचा फोन आला तेव्हा मी ऑफिस मध्ये होतो.माझे ऑफिस डेक्कन जिमखाना इथे आहे.रेल्वे रद्द झाली बातमी एकुन मन उदास झाले. डोळे बंद करून बसलो मनात महाराजांशी बोलो का केले असे आधी आस दाखवली मग असे केले. तेवढ्यात माझा शाळेतील मित्र मनोज शिवरकर हा सुद्धा गिरनार वारी सारखा करत असतो.दोन महिन्या आधी मी फेसबुक वर त्याचे गिरनार फोटो पाहिले होते.त्याला फोन केला की तू चालला आहे का गिरनारला.तो बोलला मी एक्स्प्रेस वे वर आहे बस मध्ये आमची रेल्वे रद्द झाली पुण्याहून निघणार होती.मी बोललो मी सुद्धा त्याच रेल्वेने जाणार होतो आता काय करू.त्यावर मनोज बोलला की आम्ही ज्या बस मधून निघालो आहे ते अजून दोन बस सोडणार आहे राजकोटला तिथून दोन तास पुढे गिरनार तुला त्यांचा नंबर पाठवतो बोलून बघ.त्याने पाठवलेल्या नंबर वर फोन केला तर ते म्हणले दोन बस सोडणार आहे मी बोललो १०मिनिट द्या लगेच सांगतो. सर्वांना फोन करून सांगितले सर्वांनी होकार दर्शवला. बस मधून जायचे ठरले त्यांना फोन केला तर ते म्हणाले एक बस भरली आहे.१० मिनटात संपूर्ण बस भरली.सर्व पुण्याहून गिरनार जाणारी लोक होते.दुसऱ्या बस मध्ये देतो म्हणाले.बस ६ वाजता वकडेवाडी वरून निघेल ला लवकर.मी ऑफिस मध्ये होतो ५.१५ मिनिट झाली होती. सासरे लोणावळामध्ये कसे होणार समजत नव्हते.मी लगेच निघालो घरी सर्व तयारी करून झाली होती.घरी जाऊन आम्ही लगेच निघालो तरी आम्हाला बस स्थानकावर पोहविण्यासाठी वेळ लागला. बरोबर ६.१५ वाजता पोहोचलो. बसमध्ये बसून राजकोट प्रवासाला सुरुवात झाली.सासरे पण आमच्या बरोबर येणार होते पण ते कसे शक्य होणार होते बस निघणार होती व सासरे लोणावळा इथे होते.बस ड्रायव्हरशी बोलून त्यांना ह्यातून मार्ग काढा सांगितले.त्यांनी सासऱ्याना तळेगांव टोल नाका येथे थांबण्यास सांगितले.पाऊस जोरदार चालूच होता.कसे बसे अडथळे पार करत प्रवास सुरू केला होता.तळेगांव टोल नाका येथे सासऱ्याना घेऊन आम्ही पुढे निघालो.ते तिथे पावसात भिजत

थांबले होते.आम्हाला सर्वांना जाणीव झाली आपला प्रवास सोपा जाणार नाहीये. महाराजांनी आमचा प्रवास कसा लिहिला होता त्याची आम्हाला कल्पना सुद्धा नव्हती.मुंबई वापी असे स्थानके पार करीत अहमदाबाद दिशेनी जात होतो.डॉक्टर पत्की दर पौर्णिमा गिरनारी वारी करतात. अहमदाबादच्या आधी हायवे वर उतरून शॉर्टकट घेऊन राजकोटला जाऊ म्हणाल्या. आपले ३ तास वाचतील. असे त्यांचे म्हणणे ऐकून आम्ही खाली उतरलो.खरतर त्या शॉर्टकट वरून फक्त खाजगी गाड्या जातात.कोणतीही बस सेवा असणारी गाडी त्या मार्गावरून जात नाही.आमचा निर्णय चुकला. दोन तास वाट बघून पुन्हा दुसरी बस पकडुन राजकोटला निघालो.मनात खूप राग होता उगाच उतरलो म्हणून पण काय बोलू शकत नाही म्हणून गप्प राहिलो.राजकोटला पोहचलो. तेथून कॅब करून गिरनारला जायला निघालो.जवळ जवळ आमचा २४ तास प्रवास झाला होता.गिरनारला पोहोचलो तेव्हा संध्याकाळी ६.३० वाजले होते.तिथे पावूल ठेवता वेगळेच वाटत होते.तिथल्या हवे मध्ये ती जादू वेगळीच होती. तिथली ऊर्जा जाणवत होती. हॉटेल वर जाऊन सर्वांनी तयार होऊन लगेच भेटायचे ठरले. सर्व जण तयार होऊन हॉटेलच्या खाली भेटलो.पुढे असणाऱ्या चहा टपरीवर चहा बिस्कीट खाऊन निघालो. २४ तास प्रवास करुन थकून गेले होते सर्व जन. महाराजांचे दर्शन घेण्यासाठी मन आतुर झाले होते तीच इच्छाशक्ती आम्हाला पुढे घेऊन जाणार होती. मारुतीरायचे दर्शन घेऊन आमच्या सोबत रहा अशी प्रर्थना केली.स्वामीच्या मंदिरात जाऊन आमच्या सोबत रहा अशी प्रार्थना केली. जय गिरनारी तेरा भरोसा है भरी म्हणून गिरनार चढायला सुरुवात केली.पटपट वरती जाऊ असे म्हणून अतिउत्सहात सुरुवात केली.जेमतेम ५०० पायरी झाल्या आणि दम लागायला सुरुवात झाली.सासरे व पत्नी हे सुद्धा दमली होते.जोशी व त्यांचा मुलगा हे आम्हाला प्रोत्साहन देत पुढे पुढे घेऊन जात होते. खरच गिरनार चढणे एवढे सोपे नाही आम्हाला समजले. मी नुकताच कोरोनातून बाहेर आल्या मुळे थकवा मला खूप जाणवत होता.साधारण ३००० पायरीला गोमुख मंदिर आहे तिथे पोहोचलो. पाय एवढे दुखत होते. डोळ्यातून अश्रू वाहू लागले.असे वाटत होते संपले इथून पुढे जाऊ नाही शकत. सासऱ्यानी आयुर्वेदिक

पेन किलर आणले होते ते आम्ही घेतले व महाराजांना स्मरण करून म्हणालो तुमचे दर्शन करून आम्हाला खाली पाठवा.दत्त गुरूचे नाव घेऊन पुढे निघालो.जुलै महिना थंडी पडली होती व रिमझिम पाऊस चालू झाला होता. कुणी सुद्धा चप्पल घातली नव्हती.पाय गार पडून सुन्न झाले होते.जस जसे वरती जाऊ वारे खूप थंड वाहू लागले होते. चेहऱ्या वरील पावसाचे पाणी गोठून कडक बर्फ सारखे झाल्या सारखे भासत होते.थोडे अंतर चालून झाल्यावर चहा घेण्यासाठी थांबलो.तेव्हा एक पायांनी अपंग मुलगा भराभर जाताना दिसला. मी पत्नी ला सुद्धा बोललो लाज वाटत आहे मला ह्याच्या कडे बघून तो कस भराभर जातोय आणि मी १०० वेळा थांबतो. तो मुलगा दुसरा कोणी नसुन धनकवडी चे राजा श्री शंकर महाराज होते हे सुद्धा आम्हाला आठ महिन्यांनंतर दत्त अनुभूती पुस्तक वाचून समजले. तो मुलगा आम्हाला परत दिसला नाही जायची येयाची एक रस्ता आहे त्यामुळे वर दर्शन करून येणारा प्रत्येक माणूस दिसतो तो मुलगा परत दिसलाच नाही.

थोडे पुढे गेलो पत्नी च्या मोबाईल वर कॉल आला.true caller वर दत्ता करडे नाव दाखवत होते.फोन उचलला समोरून आवाज आला झाले का दर्शन आणि मागे भजन चालू असल्याचा आवाज येत होता.एवढे बोलून फोन कट झाला. परत फोन लावत होतो तर लागत नव्हता.आम्हाला काही समजत नव्हते काय चालू आहे.एक अनोळखी माणूस भेटला त्याला पाहून ह्यांना कुठे पाहिले आहे असे वाटत होते त्यांने पांढरे शुभ्र कपडे घातले होते.डोके चक्रावून जात होते.जस जसे वर जाऊ काही घटना अश्या घडत होत्या की बुध्दी काम करणे बंद होत होती.गोरक्षनाथ शिखरावर गेल्यावर त्याच्या पादुका भवती एक माणूस फेऱ्या मारत होता वेळ ब्रम्हमुहूर्तचा होता. त्याने डोक्या पासून पायापर्यंत स्वतःला झाकून घेतले होते.कुणाशी बोलत नव्हता ना कुणाकडे बघत होता.तो माणूस सुद्धा आम्हाला एकदाच दिसला कुठून आला कुठे गेला काही काळात नव्हते.गार हवेमुळे हात पाय सुन्न झालेच होते आणि आता डोके सुद्धा सुन्न झाले होते.आम्ही सर्व जण प्रवेशद्वार कानामीच्या इथे आलो.एक रस्ता गुरू शिखरावर जात होता व एक रस्ता कमंडलू कुंडला जात होता तिथे ह्या दोन

कमानी होत्या.कमानीवर लाईट चालू होत्या धुके होते.त्यातून कमानी कडे बघून असे वाटत होते की साक्षात विठुराया आपल्या भक्तांच्या मार्गदर्शनासाठी तिथे विटे वर उभा आहे.सर्व अडथळे पार करीत सकाळी ५.३० मि. गुरू शिखरावर होतो. वारे सुद्धा  खूप जोराचे चालू होते जणू दत्त गुरूच्या दर्शनाचे वर्णन करत आहे.गुरुपौर्णिमा चे दत्त गुरूचे ते रूप अजून ही डोळ्या समोरून जात नाही. महाराजांना बघून असे वाटत होते की माता अनुसुया व अत्री ऋषि मुळे त्रिदेवांचे ते विलोभनीय रूपाचे दर्शन झाले. ती नुसती मूर्ती नव्हती साक्षात दत्त गुरू समोर बसले आहे असे वाटत होते.मनात खूप धाकधूक होत होती.मंदिरात दत्त गुरूचे वास्तव्य जाणवत होते.साक्षात चार वेद त्यांच्या श्वान बनून त्यांच्या पायाशी आहे अश्या त्रिलोकी महाराजांचं  दर्शन  घेतल्यावर थकवा निघून गेला.शरीरात नवीन ऊर्जा निर्माण झाली.पहाट झाली तरी आकाशात चांदणे होते जणू काही ते सुद्धा महाराजांचे दर्शन घेण्यासाठी रांगेत उभे आहे.आजही असे म्हणतात की दत्त गुरु दर पौर्णिमेला बिंदू रुपात येतात व पर्वताच्या आतील बाजूस दत्त गुरू व सर्व देवांची सभा भरते.गुरू पौर्णमेनिमित्त महाराजांचे दर्शन झाले याहून मोठे भाग्य नाही.खरच गिरनार असा पर्वत आहे की तिथे बुध्दी काम करणे बंद होते. आध्यतमिक मध्ये माणूस काय करू शकतो हे सर्व कल्पनेच्या पलीकडे आहे.आजच्या कलयुगात आध्यात्म असे आहे की दिवस कसे ही आले तरी ते आपल्याला लढ्याची ताकत देतात. कलयुगात देव धर्म केला तर त्रास होणार कारण हे युग तसे पण ह्या कलयुगात एकदा का दत्त गुरूंनी तुमचा हात धरला की युग कोणते ही असो महाराज सोबत असेल तर आपले कल्याण होणारच.पण त्याआधी भक्तांना सर्व परीक्षा द्यावी लागते.असे सर्व अनुभव गाठीशी बांधून आम्ही पुण्याला परत आलो. रेल्वे मधून येताना आमच्या सोबत जोशी यांचे नातेवाईक निशांत भाई होते.ते सुद्धा दत्त भक्त होते.त्यांनी आम्हास दत्त गुरु बदल सांगण्यास सुरूवात केली बोलता बोलता ११ तास कसे निघून गेले समजले नाही.त्या वेळेत कुणी सुद्धा आपली जागा सोडून गेले नव्हते. तब्बल ११ तास महाराजांची स्तुती आणि आध्यात्मिक प्रश्न उत्तर मंजुषा रंगली होती.मला तर


नाही आठवत की मी ११ तास एकाठिकाणी कधी बसलो असेल.परतीचा प्रवास सुखरूप झाला. महाराजांच्या कृपे मुळे गुरुपौर्णिमा सफल झाली.

**|| श्री गुरुदेव दत्त ||**



# गिरनार : अविस्मरणीय स्वानुभूती चिंतन

श्री. अतुल घुले, पुणे



पश्चिम भारतातील गुजरात राज्यामध्ये असलेले व भगवान दत्तात्रय यांनी आपल्या चिरंतन वास्तव्याने पुनीत केलेले आणि १२ हजार वर्ष तपाने सिद्ध केलेले स्थान म्हणजेच गिरनार. भौगोलिक दृष्ट्या असंख्या छोट्या मोठ्या पर्वतांचा, शिखरांचा आणि सुळक्यांचा समूह असलेला हा परिसर आहे. शिवपुराणात गिरनार चा उल्लेख रेवाताचल पर्वत म्हणून करण्यात आलेला आहे. यथे अनेक दर्शनीय स्थळे आहेत. गिरनार पर्वत उजव्या हाताला ठेऊन प्रदक्षिणा घालणे यालाच परिक्रमा असेही म्हणतात. या वर्षी (२०२२) माझा कडून गिरनार पर्वताची यात्रा घडली. या प्रवासात जे घडले ते सगळ्या बरोबर शेअर करावा म्हणून हा अनुभव.

यावर्षी च्या सुरवातीला साधारण जानेवारी / फेब्रुवारी (२०२२) मध्ये आम्ही सर्व 'पेब्लस अर्बेनियाचे' मंडळी, संध्याकाळच्यावेळी नेहमीप्रमाणे गप्पा गोष्टी करत असतांना, अध्यात्म आणि फिरण्याची आवड असणारा मित्र नागेश, याने गिरनार या धार्मिक स्थळा बद्दल आणि त्याला पूर्वी आलेल्या अनुभवाबद्द्ल माहिती दिली त्यानंतर मनात श्री क्षेत्र गिरणार दत्त पादुका दर्शनाची इच्छा निर्माण झाली व शोध सुरु झाला गिरनारच्या माहितीचा, जणू नादच लागला होता. तोपर्यंत गिरनार काय आहे याबद्दल काहीच कल्पना नव्हती पण कुठेतरी जाण्यासाठी एक स्फुर्ती येत होती.

या चर्चेला बरेच दिवस लोटले पण गिरनारचा विषय काही निघाला नाही. काही गोष्टी मनाच्या कोपऱ्यात घर करून राहतात, त्याचा ध्यास आपल्याला सतत लागलेला असतो. असाच मनाशी लागलेला ध्यास होता गिरनार येथील श्री दत्त महाराजांच्या पादुकांच्या दर्शनाचा. दरम्यान मी नागेश ला दोन - तीन वेळा गिरनार ला जाण्याबद्दल विचारले पण तो हसत उत्तर दयायचा, “जाऊयात महाराजांचा चा आदेश आला की.”

आणि अचानक नागेश चा १४ जून २०२२ ला गिरनार परिक्रमा आणि गुरु शिखर बद्दल माहिती असलेला व्हाटस ऍप संदेश आला तसे अजूनच दर्शनाचे वेध लागले आणि कधी जायचे म्हणून विचारले देखील आता तयारी सुरु झाली होती ती गिरनार वारीची, तसा ३ नोव्हेंबर २०२२ ला मी, नागेश व अमोल ने निघण्याचा प्लॅनहि तयार केला आणि आता फक्त प्रतीक्षा होती ती ट्रेन तिकीट बुक करायची. साधारण १२० दिवसा पूर्वी ट्रेन तिकीट ओपन होतात त्यामुळे आमचे ३ नोव्हेंबर २०२२ चे तिकीट ६ जुलै २०२२ ला ओपन झाले. तिकीट बुक करताच वेटिंग लिस्ट मध्ये होते. गिरनार चे काय महत्त्व आहे ह्याची जाणीव मला त्याक्षणी झाली. आमचा उत्साह बघून या गिरनार वारीत हळू हळू एक एक वारकरी सामील होत होता त्यापैकीच एक होते नितीन साहेब, प्रीतम आणि योगेश. १३ जुलै २०२२ (गुरु पूर्णिमा) रोजी आम्हा ६ यात्रेकरूंच्या मेळाव्यामध्ये अजून ६ यात्रेकरू सामील झाले (राजश्री ताई, शुभदा ताई, राज दादा, पूनम अक्का आणि मुग्धा) आणि अशा प्रकारे ११ जणांचा जत्था गिरनार वारी साठी सज्ज झाला.

दत्त दर्शनाला मन अधीर झाले होते, मनोवेगाने तर प्रत्येक जण कधीचाच गिरनार ला पोहचला होता, व्हाटस ऍप ग्रुप द्वारे व्हिडिओ, अनुभूती Share होऊ लागले, चालण्याचा  सराव, धावणे, पायऱ्या चढणे याची रोज प्लांनिंग होऊ लागली पण तसे काही एकत्र शक्य होत नव्हते जो तो आपल्या परीने तयारी मात्र करू लागले. असेच पाहता पाहता दिवस, काही महिने निघून गेले, दसरा दिवाळी च्या धावपळी नंतर जाण्याचा दिवस जवळ येऊ लागला पण ट्रेन

टिकेट्स काही Confirm झाले नाही तेव्हा कुठेतरी मनात “दर्शन घडवा प्रभू” हाच जप सुरु होता, महाराज ते !! सहजा सहजी थोडीच येऊ देणार दर्शनाला याची प्रचिती आली.

माझे ऐक स्नेही श्री गजानन धोपे जे दिल्ली वास्तव्यास असतात त्यांना फोन करून मी माझी अडचण सांगितली तेव्हा त्यांनी "जो संकटात मदत करतो तोच खरा मित्र" या उक्ती प्रमाणे Railway भवन मधील त्यांच्या एका मित्राकरवी तिकीट कन्फर्म करून देण्याची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली. आता जाण्याचा दिवस अगदी जवळ येऊन ठेपला होता पण तिकीट अजून पण वेटिंग लिस्ट मध्येच होते. मध्ये २/३ वेळा धोपे दादांना याबाबत विचारून देखील झाले त्यावर अगदी शांतपणे 'होऊन जाईल' एवढेच उत्तर यायचे, पण मनात घालमेल सुरु होती, तिकीट कन्फर्म नाही झाले तर?? १ नोव्हेंबर ला शंकर महाराजांच्या प्रकट दिनादिवशी मी आणि नागेश "श्री शंकर महाराज" मठ - धनकवडी ला दर्शनाला गेलो आणि एकच प्रार्थना केली ‘दर्शनाला बोलवा प्रभू‘

तिकीट अनिश्चततेमुळे अधर्वट झालेली झोप आणि श्रींच्या भेटीची आतुरता घेऊन तो दिवस उजाडला - ३ नोव्हेंबर २०२२ (गुरुवार) - रोजच्याप्रमाणे पूजा पाठ आटोपल्यानंतर बॅग पॅक करून झाली आणि फक्त वाट होती ती ४ वाजायची आणि तिकीट कन्फर्म चा चार्ट लागण्याची. साधारण ३:५५ ला मी आणि आकाश (माझा भाऊ) आम्ही टीव्ही बघत असतांना माझं लक्ष शेखर साने दादा (नावाजलेले चित्रकार) यांच्या कालातीत दिनदर्शिके कडे गेले, तेव्हा लक्षात आले अरेच्चा!! आपण तर दोन दिवसा पासून दिनदर्शिकेचे पानच बदलवलेले नाही (रोज नचुकता पान बदलवणारे आम्ही त्या २ दिवशी कसकाय विसरलो ??)

तोच क्षणाचाही विलंब न करता मी दिनदर्शिकेचे पान बदलले, तसे आम्ही दोघे स्तब्ध झालो "श्री दत्त गुरु महाराज” "श्रीपाद वल्लभ महाराज " "श्री नृसिंह सरस्वती महाराज आणि त्या खालोखाल "श्री स्वामी समर्थ महाराज" यांची पेन्टींग असलेले पोस्टर - “अंगावर रोमांच उमटणे” म्हणजे काय याची प्रचिती ‘याची देही याची डोळा’ आली मी लगेच नमस्कार केला आणि मनात महाराजांना

ना प्रार्थना केली, ‘गुरु महाराज आम्हाला गिरनार ला दर्शनाला बोलवा.’ त्यादरम्यान आकाश नि ऑनलाइन पीएनआर स्टेटस चेक केला आणि आनंदाने माझ्या कडे बघून म्हणाला ”भैया टिकिट कन्फर्म झाले”. माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. दत्त महाराज त्यांच्या दर्शनाला भक्ताला कसे बोलावून घेतात याचे उत्तम उदाहरण. (परमेश्वराच्या अस्तित्वाचा हा पहिला अनुभव तर होता) तिकीट कन्फर्म ची हि बातमी सगळ्यांना देऊन झाली. कुणाचाही आनंद गगनात मावत नव्हता. धोपे दादांचे आभार मानावे तेवढे थोडेच त्यांनी तिकीटाची जबाबदारी लीलया पार पाडली होती, श्रींचे दर्शन घडवण्यामध्ये तेच तर महत्वाचा दुवा ठरले.

संध्याकाळी ६ ला आम्ही ११ वारकऱ्यांनी सोसायटी च्या मंदिरात "गणपती बाप्पा" "साई महाराज" आणी "स्वामी समर्थ महाराज" यांचे दर्शन घेतले, सामान, तिकीट वगैरेंच्या गप्पा झाल्या, “जय गिरनारी” म्हणत एकमेकांचा उत्साह वाढवत सेल्फी झाले आणि पुणे स्टेशन साठी निघालो. रात्री ८ वाजता टीम गिरनार जुनागड च्या दिशेने निघाली व आतुरता, विश्वास,श्रद्धा, ओढ अश्याने तुडुंब भरलेली मने गाडीत स्थिरावली. रात्री सर्व थोड थोड जेवण करून झोपी गेले. दुसऱ्या दिवशी मला, राज दादा ला आणि पूनम अक्का ला एकादशी चा उपवास होता. आम्ही थोडा फराळ केला आणि बाकी सर्वानी जेवण केले, गप्पा गोष्टी करत, भरपूर शेती, विविध झाड यांवर चर्चा करत प्रवास चालू होता. अचानक पुसटसा डोंगर कडा दिसला आणि ज्याचा ध्यास घेतलेला ज्याची आस, आतुरता होती तोच पवित्र श्री गिरनार पर्वत प्रथम दर्शन देत होता डोळे विस्फारून आम्ही पाहत होतो हळूहळू तो जवळ येत होता. मनात चलबिचल सुरू होती.

दुपारी ३:३० ला आम्ही जुनागड ला पोहचलो, गाडी इन टाइम पोहचल्याने बरे वाटत होते, हवा फार गरम नाही फार थंड नाही अशी होती, जुनागड ला राज दादा चे मित्र (यादव जी) आमची वाट पाहतच होते. हे यादव जी म्हणजे वेगळेच व्यतिमत्व त्यांच्या देहबोलीत, बोलण्यात समर्पण, सेवाभाव आणि

आत्मानंद असे विविध भाव जाणवले, त्यांच्यामुळे आमची राहण्याची अतिशय छान व्यवस्था झाली, जुनागडला असतांना आम्हाला कसलाच त्रास होऊ नये याची सर्व काळजी त्यांनी घेतली. सर्वांना भूकहि लागलीच होती, यादव जींनी स्टेशन जवळच फेमस लस्सी शॉप ला नेले, सर्वांनी उपवास पॅटिस आणि लस्सी चा आस्वाद घेतला. नंतर लोकल ऑटो रिक्षा ने जुनागड ते तलेठी टाउन ला गेलो (गिरनार पायथ्याला गिरनार तलेठी म्हणतात).

ऑटो रिक्षा ने आम्हाला गिरनार प्रवेशद्वारा ला सोडले त्या पुढचा रस्ता प्रशासनाने बंद केला होता. “चला उतरा” आपले ठिकाण आले मध्येच कोणीतरी बोललं समोर पाहतो तर डोळ्याच्या याकडेपासून त्याकडेपर्यंत गिरनार चा विस्तार होता जागा वेगळी भाषा वेगळी माणसे वेगळी पण तरीही आपलेपणा वाटत होतं.

खऱ्याअर्थाने तर आमची गिरनार परिक्रमा तलेठी गिरनार प्रवेश द्वारा पासूनच चालू झाली होती, सर्व जण आपआपली बॅग घेऊन ‘श्री बंडी लालजी दिगम्बर जैन धर्मशाला’  ला निघालो. तलेठी द्वार ते धर्मशाला अंतर ५ km, रस्त्याने दुतर्फा परिक्रमा करण्यास आलेल्यांची तोबा गर्दी. साधारण संध्याकाळी ६ चा सुमाराच आम्ही धर्मशाळेला पोहचलो, रूम गाठली, सामान ठेवलं आंघोळी आटोपल्या, जो आवरून होईल तो बाहेर येऊन, गॅलरीतुन प्रवित्र गिरनार पर्वत पाहत होता, रस्ता पाहत होता सर्वत्र चैतन्यमय वातावरण होते साधारण रात्रीं ८ ला दिनांक (०४/११/२०२२) सर्वजण आवरून एकत्र जमलो.

आश्रमशाळेच्या खाली काठ्या खरेदी झाल्या आपापल्या जवळ सामान कसं कोणी घ्यायचं ते घेतलं बूट चढवले काठ्या पकडल्या, अंबा माता पर्वता कडे बगुन आई अंबा देवी ला नमन केले आणि स्वतःस “श्री दत्तगुरनां”  स्वाधीन करून, "जय गिरनारी" च्या जयघोषा सहित जवळच असलेल्या लंबे हनुमान जी चे दर्शन घेऊन रात्री ८:३० ला परिक्रमेला सुरवात केली. आश्रमशाळे पासून साधारण २ km अंतरावर परिक्रमा द्वार आहे. तेथे पोहचताच सार्वांनी खाली वाकून नमस्कार केला व रात्री ९ ला जंगलाच्या दिशेने वाटचाल सुरु केली.

अंधारातला जंगलातला माहीत नसलेला रस्ता परंतु टॉर्च लावू आणि जाऊ म्हणत एकमताने निघालो यात अंधारातली पायवाट, घनदाट झाडी, मध्ये मध्ये ‘जय गिरनारी’ ‘जय गिरनारी’ नामघोष करत चालणारे वाटसरू दिलासा देत होते. आमची रामरक्षा, भीमरूपी रामाचे अष्टक म्हणणे सुरू झाले होते. महाराजांची कृपा दृष्टी असेल तर काळजीचं कारणंच नसत. कार्तिक पूर्णिमा अगदी ३ दिवसावर असल्याने चंद्राच्या लख्ख प्रकाशात परिक्रमा मार्ग उजळून निघाला होता. वाटेत ठीकठिकाणी असणारे दिवे आणि वर दुधाळ चंद्राने उजळून निघालेला आसमंत. अहा !! किती मनमोहक वातावरण ते !!

"जय गिरनारी" " श्री गुरुदेव दत्त" "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" चे स्मरण करत एका ओळीमध्ये धीमे धीमे आमची वाटचाल सुरु होती. अधून मधून "चला" "चला" म्हणणारा योगेश चा आवाज सर्वांना उत्साहीत करत चालण्याची प्रेरणा देत होता. साधारण २ तास चालून झाल्यावर एक छोटी टेकडी पार करतांना ट्रेन मधील सहप्रवासी मंडळी भेटली. थोड्या अंतरापर्यंत "जय गिरनारी" करत एकमेकांना सोबत केली. आजूबाजूला नारळ पाणी, ताक, शरबत, पाणी अशी छोटीखाणी दुकाने होती, नारळ पाणी चा एनर्जि बुस्टर घेऊन, पुन्हा ताजेतवाने होऊन झिना बाबा कि मढी (पहिला टप्पा) कडे मार्गक्रमित झालो.

परिक्रमा च्या वाटेवर ठीक ठिकाणी प्रसादचे वाटप चालू होते, दुपारचा पॅटिस नंतर कोणीच काहीच खाल्ले नसल्या कारणाने सर्वांना कडकडून भूक लागली होती (माझ्या सोबत सर्वांचाच एकादशी चा उपवास झाला) आज आम्हा सर्वांचेच ग्रह बहुदा प्रबळ होते, रात्री १२:३० ला आम्हाला एका ठिकाणी "कढी भात" चा प्रसाद मिळाला, शांत मनाने कढी भाताचा आस्वाद घेऊन "श्री दत्त गुरु" च्या नामाचा जप करत परत चालायला लागलो.

एकमेकांना आधार देत, प्रोत्साहित करत दुसरा पर्वत कधी सर केला कळलेही नाही. आता मात्र सर्वजण दमले होते. असा म्हणतात की कार्तिकी एकादशी ते कार्तिक पोर्णिमा या ५ दिवसांच्या कालावधीत सर्व देवी देवता या पवित्र गिरनार पर्वताची परिक्रमा करतात त्यामुळे बरेच लोकं परिक्रमेच्या वेळी एक रात्रं तरी

जंगलात काढतात. वाटेवर जिथे भेटेल तिथे लोकं झोपली होती, खूप लक्ष देऊन काठीचा सहारा घेत पाऊले टाकावी लागत होती. इतक्या कडाक्याच्या  थंडीत घनदाट जंगलात कस काय झोपू शकतात ?? प्रत्यक्ष्य सद्गुरूच्या पावन पदस्पशानी पवित्र झालेल्या या तपोभूमीत जिथे साक्षात गुरूंचा सहवास आहे तिथे कसली चिंता - एक विलक्षण अनुभव !!

ठीक ठिकाणी लिंबू शरबत चा एनर्जि बुस्टर घेत घेत २ पर्वत सर करून, तिसरा पर्वत चढायला सुरवात केली, या ठिकाणी वाट जरा छोटी आणि कठीणही होती, कमी जागेतून खूप लोकांचे मार्गक्रमण चालू होते, त्यामुळेअचानक वर्दळ झाली, क्षणात लक्षात आले मी एकटाच चालत आहे बाकी मंडळी कुठे दिसेनात, फोनही लागेना, समोर बघता योगेश आणि मागे वळून बघितले असता आवटे साहेबही अंधारात दिसेनासे झाले होते आम्ही सर्व विखुरले गेलो होतो. इतक्या गर्दीत स्वतःला एकटेच बघून भांबावून गेलो. "जय गिरनारी" चे स्मरण करत एकट्यानेच Shortcut मार्ग निवडला, मनात सतत सद्गुरू चा धावा चालू होता आणि अचानक राज दादा समोर दिसला जणू काही महाराजांनीच माझ्या हाकेला ओ दिली होती. मी आणि राज दादा ने बाकी लोकांची १५ min वाट बघितली पण इतक्या गर्दी मध्ये काहीच मेळ लागेना. शेवटी आम्ही दोघांनी बाकी मंडळी शिवाय ३ रा पर्वत (मलवेला - दुसरा टप्पा) उतरण्याचा निर्णय घेतला. एकमेकांना सोबत करत हळू हळू पाऊल टाकत परिक्रमेची वाट सर करत होतो.

(दिनांक ०५/११/२०२२) आता नारायणाचे छान आगमन झाले होते, कोवळ्या सोनेरी किरणांचा काय तो थाट !! ही किरणे अंगावर झेलत, सूर्याच्या प्रकाशाने उजळलेला रस्ता बघत, धुक्यात न्हाऊन निघालेल्या निसर्गाचा आस्वाद घेत पुढे निघालो, आजूबाजूचा परिसर लक्ष वेधून घेत होता. शेवटी पर्वत उतरल्यावर सपाट रस्ता चालू झाला, या रस्त्याने काही अंतर पुढे चालून गेल्यावर बोरदेवीचे मंदिर आहे. आता बोरदेवी ते भवनाथ (७ किमी) हा परिक्रमेचा शेवटचा टप्पा उरला होता. इथून जातांना एक मधुर सुगंध दरवळायला लागला. खूप प्रसन्न आणि उल्हासित वाटत होते. जसजसे अंतर

कमी होतहोते तसतसा तो वाढत होता, सोबत करत होता. रस्त्यात अनेक ठिकाणी छोटी छोटी देवळे असावीत व त्यात धूप अगरबत्ती चा सुगंध दरवाळावा असे वातावरण होते ते. पण इतर ठिकाणी देवळांच्या भोवती हा सुवास नव्हता, फक्त या मार्गावरच का येत होता? ते वार, तो प्रकाश त्या मधुर सुवासासहित आत जात आहे असे वाटत होते. मनास एक वेगळीच शांती मिळत होती.फार म्हणजे फारच छान वाटत होते. आमचे पाऊल लवकर लवकर पडत होते. आता फक्त ओढ लागली होती ती परिक्रमा संपवून रूमवर जाऊन आराम करायची. परिक्रमा संपायला फक्त २किमी अंतर बाकी होते. सकाळचे ९:३० झाले. मी आणि राज दादा ने ठरवलं कि आता थोडी विश्रांती घायची व बाकी सर्व मंडळी येण्याची वाट बघायची. सकाळी १० ला नागेश आणि अमोल ला बघून डोळ्यांमधली आतुरता थांबली. पण अजूनही इतर मंडळी येणे बाकी होते. १०:३० वाजून गेले तरी मंडळी काही येण्याची चिन्हे दिसेनात तेव्हा सर्वांनी परत चालायला सुरवात केली. थोडे अंतर चालल्यावर एक नागमोडी रस्त्या वर राजश्री ताई भेटल्या आणि आम्ही ५ लोक सोबत निघालो. "जय गिरनारी" " जय गिरनारी " चा नामघोष करत आम्ही शेवटचे १किमी चे अंतर पार करत होतो. सकाळी ११:३० (दिनांक ०५/११/२०२२) ला सतत नथांबता, रात्रीच्या अंधारात १५ तास चाललेली आमची परिक्रमा संपली. अत्यानंदा सहित गुरुशिखर कडे बघून त्या करत्या करवित्याला नमन केले व आभार मानले.

रूमवर येऊन फ्रेश झाल्या नंतर कधी निद्रेच्या स्वाधीन झालो कळले हि नाही. संध्याकाळी जवळच असेलेल्या मंगलम हॉटेल ला गेलो. सात्विक गुजराती भोजन चा आस्वाद घेऊन मन आणि पोट दोन्ही तृप्त झाले (घराची आठवण झाली) आजूबाजूस गिरनार चढून जाणारे बघूनच आपण उद्या कसे दिसणार याचा अंदाज आला. नंतर आम्ही भवनाथ महादेव मंदिरात गेलो. महादेवाचे दर्शन घेऊन रुम वर आलो. आयुष्यात पहिल्यांदा ४० किमी चा इतका मोठा ट्रेक केल्यानंतर आश्चर्य म्हणजे थोड्या पायदुखी शिवाय कुणालाही इतर कुठलाही त्रास जाणवत नव्हता.

(दिनांक ०६/११/२०२२) दिवसाची सुरवात चविष्ट नाष्ट्याने झाली, सर्वांनी मालिशवाल्या कडून पायाची मालिश करून घेतली आणि दुपारी जेवण करून आराम केला कारण संध्याकाळी आम्हाला गुरुशिखर चढायला सुरवात करायची होती. संध्याकाळी ७:३० ला आम्ही गुरु शिखर चढायला सुरवात करण्याआधी सर्वांच्या वतीने आवटे साहेबांनी पहिल्या पायरी वर नारळ फोडून यथासांग पूजा केली, सर्वानी "जय गिरनारी" चा जयघोष केला. "श्रीपाद राजम शरणं प्रपद्ये" म्हणत मी पहिल्या पायरी वर वाकून नमस्कार केला व सर्वानी एक लाईन मध्ये धीमे धीमे चाल सुरू केली. प्रवास सुखकर होवो असे शुभेच्छांच फोन येऊन गेले.

नामस्मरणाचे विविध ताल एकत चालत चालत ५०० पायऱ्या आल्या. सर्व जण एकमेकांचा उत्साह वाढत होते, योगेशचा "चला" चा जयघोष सतत चालूच होता. (आम्ही ३ दिवसात इतकं "चला" ऐकलं की आता आम्हाला स्वप्नात पण "चला" ऐकू येईल). पूनम अक्का आणि राज दादा आम्हा सर्वांची श्वसनाची प्रॅक्टिस घेत होते. सुरुवातीला काही पायऱ्यांवर आकडे आहेत. आता घामानं डोकं वर काढलं होतं श्वासांचा जोर वाढला होता भीमसेनी कापुराचा तुकडा जवळ ठेवला "जय गिरनारी" "अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त गुरुदेव दत्त" म्हणत चढत होतो. जणूकाही महाराजच आमच्या कडून वॉर्मअप करून घेत होते. हळू हळू आम्ही १००० पायऱ्या सर केल्या. इथे "शंकर महाराज" चे छोटेखानी मंदिर आहे, सर्वांनी नमस्कार करून पुढे वाटचाल केली. आम्ही प्रत्येक १००० पायऱ्या वर टाळ्या वाजवून प्रत्येकाचे मनोबल वाढवत होतो.

आता मांड्या पोटऱ्या जाणवू लागल्या परंतु त्रास त्रागा वाटत नव्हता, ठराविक पायर्यांवर आकडे आहेत वर्दळही खूप होती, हळू हळू "जय गिरनारी" चे नामस्मरण करत रात्री १०:०० ला म्हणता म्हणता ४००० पायरी चा पल्ला गाठला. गिरनार पायथ्याला दिव्यांची झगमगाट दिसू लागली, २-३ फोटो झाले. ४००० पायऱ्या जिथे संपतात तिथे जैन गुरु "नेमीनाथ" यांचा अतिशय सुंदर असा पांढऱ्या शुभ्र संगमवराच मंदिर आहे. तिथे पोटभर पाणी प्यायलो. अमृता

सारख्या या चविष्ट पाण्यापुढे बिसलरीचेहि पाणी फिके पडेल, एक नवीन ऊर्जा घेऊन पहिला टप्प्याच्या (अंबामाता मंदिर) दिशेने वाटचाल सुरु केली.

अबब !! ४५०० पायऱ्या झाल्या विश्वासच बसेना. ठराविक अंतराने एक दोन मिनिट उभा राहत होतो काठीची कमाल जाणवत होती जणू तिसरा पायच झाली होती, काठी म्हणजे प्रत्यक्ष दत्त महाराजच हात देत आहेत असं वाटत होतं आता पायऱ्या खूप जास्त होत्या तसाच कातळ दगड सुरू झाला गार वाटत होतं पण ते आल्हाददायक होतं आम्ही घाम पुसत होतो. नेमीनाथ मंदिरानंतरच्या पायऱ्या थोड्या कठीण होत्या. “अंबामाता देवळाजवळ थोडं थांबू” असं कुणीतरी म्हणाले, अजून ५०० पायऱ्या नंतर ते होतं चढताना कोणीच बोलत नसे दम खायला थांबलं की बोलणं होत असे अंबाजी देवळाची वाट आता सुरू झाली. वाटेत बरेच वेळा ‘झाल आता निम्मच आहे चालत रहा पोचाल’ असं म्हणणारे उत्साह वाढवत होते आणि सरतेशेवटी रात्री १०:३० ला ५००० पायरीला अंबाजी देऊळ आलं. मंदिराच्या पायरीवर डोकं टेकवून देवी आई ला नमस्कार केला आणि आभार मानले.

आंबा माता मंदिर पार करून थोडा चालला कि समोर दोन पर्वत दिसतात, पहिला शिखर "श्री गोरखनाथ" आणि त्याचा मागे "गुरु दत्तात्रय शिखर" अंबाजी माता डोंगर ते गोरक्षनाथ डोंगर पायऱ्यानि टोकावरून जोडले आहेत. ०६/११/२०२२ ला गोरखनाथ महाराज चा प्रकट दिन. त्यामुळे पाऊले पटपट पडत होती, मी तर धावतच सुटलो. रात्री १२ चा आतमध्ये "श्री गोरखनाथ" महाराजांचं दर्शन घ्यायच होत. उतारा च्या पायऱ्या, तीव्रचढण असं करत गोरक्षनाथ धुनी जवळ आलो गारवा असूनही उबदारपणा इकडून जाताना जाणवला. रात्रीं ११:१५ ला ७५०० पायऱ्या चढून "श्री गोरखनाथ" मंदिरात पोहचलो. मंदिराच्या पायरी वर डोकं टेकून आत मध्ये महाराजांचं दर्शन घेतल. खूप पूर्वीपासून "श्री गोरखनाथ" मंदिरात बसून "नवनाथ" पोथी चा ४० वा अध्याय वाचायची इच्छा होती. मी दर्शन घेतल्या नंतर हळूच तिथे बसलेल्या गुरुजी ना विनंती केली कि मला पोथी वाचायची आणि त्यांनी लगेच मला होकारहि दिला. माझी इच्छा पूर्ण

केल्याबबद्दल पोथी वाचुन झाल्यावर मनापासून "श्री गोरखनाथ महाराज" "श्री दत्तात्रेय महाराज" यांचे आभार मानले. खूप हलक वाटत होतं. डोळे आणि मन दोन्ही भरून आले. गोरखनाथ कृपेने प्रकटदिनाचा पोळी भाजी चा महाप्रसाद हि मिळाला केवढे ते भाग्य !!

हा रेवताचल चढतांना हा आपला हा परका हि भावनाच लोप पावते. एखादी अनोळखी व्यक्ती जेव्हा आपल्याकडे बघून स्मित हास्य करते, भरभरून बोलते, एक मेकांना "जय गिरणारी" म्हणून प्रोत्साहन देते तेव्हा माणसातील अहंकाराच्या भिंती कधी गळून पडतात हे आपल्यालाही समजत नाही. जसजशी एक एक पायरी मागे टाकली जात होती तस तसे मन व शरीर हलकं होतंय एक अनामिक शक्ती आपल्या सोबत आहे याचा प्रत्यय येत होता. प्रत्येक पायरीवर षडरिपुंचा त्याग केल्याशिवाय सद्गुरू भेट कशी देणार !

आता चंद्र हळूहळू मोठा होत होता स्वच्छ नितळ प्रकाशात "श्री गोरखनाथ महाराज" तपोभुमी वरून गुरु शिखर अतिशय सुंदर दिसत होते. गुरु शिखर चा पाषाण दगड लखलखत होता. "जय गिरनारी" नामघोष करत आम्ही शेवटच्या टप्प्याला सुरवात केली. इच्छापूर्ती च्या जवळ जवळ जात होतो भावुक वाटणे सहाजिकच होतं आता श्री दत्त पादुका टोक नजरेच्या टप्प्यात आलेलं दिसत होतं आनंदामुळे पावलांची गती वाढली. आतुरता, आनंदभाव व श्रद्धा पूर्ण अंत:करणाने आम्ही वर चढू लागलो. चंद्राच्या प्रकाशात व नामस्मरणात पायऱ्या कसं चढलो कळलच नाही. ज्याचा ध्यास ओढ होती ते श्री गुरु दत्त पादुका ठिकाण जवळ येत होतं हात थरथरत होते आनंद वाचा फोडणार अश्रूंचा आधार घेणार याची मला जाणीव होत होती जेमतेम वीस पायऱ्या उरल्या प्रत्येक पायरीवर डोकं टेकवत नमस्कार करत चढत होतो आनंदाश्रू थोपवू शकत नव्हतो. पायऱ्यांवर चंद्राचा प्रकाश होता भगवा झेंडा शुभ्र पांढऱ्या प्रकाशात न्हाऊन निघत होता तो मनास शांती देणारा वारा आरपार न जाता शरीरात मुरतोय आत खोलवर जातोय असच वाटत होत नजरेनच भावना टिपल्या परत नमस्कार करत चढू लागलो समोर गुरुपादुका ठिकाण वर मोठा गोल दुधाळ चंद्र

आजूबाजूस चमचम तारे...आता चार पायऱ्या उरल्या...आणि तो क्षण आला त्या पवित्र भूमीस स्पर्श केला जन्माचं सार्थक झालं आणि मी शेवटच्या ९९९९ पायरी वर डोकं टेकवून महाराजांना नमन केल.

समोर पवित्र दत्त पादुका मोठ्या ठसठशीत सुंदर गंध लावलेल्या, मनाला भावणाऱ्या, मोहक अशा फुलांनी सजवलेल्या भरभरून डोळ्यात साठवल्या जात होत्या या शृंगारलेल्या मनमोहक चरण पादुकांच्या जवळ जाण्याचा व स्पर्श करण्याचा मोह अनिवार झाला पण नेत्रसुखावर  समाधान मानावे लागले. मागे गोड हसणारी श्री दत्तात्रयाची पांढरेशुभ्र मूर्ती अतिशय सुंदर दिसत होती. चुंबक जसा धरून ठेवतो तसं वाटत होतं ही अनुभूती हा आनंद आयुष्यभर कुठेही डोळे मिटले तरी आठवेल असाच आहे.'हे परमेश्वर दर्शनाची इच्छा निर्माण करणारा तूच आणि ती पुरी करण्याची शक्ती देणारा पण तूच'. माझ्या सोबत आणलेला प्रसाद मी मंदिरातल्या गुरुजी कडे दिला त्यांनी तो "चरण पादुका" ना स्पर्श करून माझ्या कडे परत दिला. प्रदक्षिणा मारून मागच्या बाजूला गेलो परत एकदा खाली बसून साष्टांग नमस्कार केला. तिथे बसल्या गुरुजी नि माझ्या कपाळावर गंध लावला त्याला एक अप्रतिम अवर्णनीय सुगंध होता (जो दुसऱ्या दिवशी पर्यंत सारखाच येत होता). प्रदक्षिणा पूर्ण करून मी "चरण पादुका" चे मन भरून दर्शन घेतले, परत डोकं ठेवून साष्टांग नमस्कार केला "माझे पुण्य फळा आले मी दत्तगुरु पहिले" मनात फक्त एकच नामस्मरण "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" “अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त“"जय गिरनारी" दर्शनानंतर ची आनंदी चेहरे भारावलेली मने घेऊन हे परमेश्वराचे मंदिर - शरीर घेऊन खाली आलो गिरनार टीमचा फोटो काढला.

परमेश्वराचे अवतार हे त्यांच्या कार्यापुरते मर्यादित होते परंतु महारांचा अवतार हा चिरंजीव असून ते सदैव कार्यरत आहेत याची पदोपदी जाणीव तिथे जाणाऱ्या भक्ताला येत असते. गिरनारवारी कधीच रिकामी जाणार नाही काही ना काही अनुभव येईलच काहीतरी गवसेलच.

महाराजांच्या दर्शनानंतर साधारण ५० पायऱ्या उतरून मी, नागेश, अमोल आणि राजश्री ताई खाली आलो विश्रांती साठी जरा वेळ थांबलो, सोबतच सतत "गुरु दत्ताचे" नामस्मरण चालू होते, तितक्यात राजश्री ताई म्हणाल्या “खूप छान दर्शन झाले पण प्रसाद नाही मिळाला” महाराज ते !! आपल्या भक्ताच्या इच्छा पूर्ण करून घेणारच. काही वेळा नंतर एक अनोळखी वक्ती आमच्या जवळ आली आणि आम्हाला पेढ्याचा प्रसाद देऊन गेली आम्ही सर्व एकमेकांकडे अचंबित होऊन बघू लागलो, जिथे साक्षात "दत्त गुरु" चा वास आहे तिथून कोणीही रिकाम्या हातांनी परतत नाही. खाली काही अंतरावर पूनम अक्का आमची वाट बगत होती, आम्ही साधारण १००-२०० पायऱ्या उतरून खाली आलो सर्वांना खूप तहान लागली होती, "श्री गोरखनाथ" शिखर पार केल्या नंतर आम्ही पाणीच प्यायलो नव्हतो कारण कुणाकडेही पाणी नव्हते.आसपास पाणी भेटण्याची शक्यता कमीच होती पण आश्चर्य म्हणजे महाराजांनी परत जातांनाही इच्छा पुरी केली साधारण ५० पायरी उतरलो असेल तिथे एक छोट्या झोपडीत पाणी प्रसाद म्हणून वाटप होत होते. ते गोड मधुर अमृतालाही लाजवणारे पाणी पिऊन आम्ही तृप्त झालो.

थोडे रिलॅक्स होऊन चंद्राच्या शीतल प्रकाशाचा आनंद घेत आम्ही सर्व गुरुशिखर उतरू लागलो. सुष्टी ने मुक्त हस्ताने उधळण केलेला तो परिसर रात्रीच्या मंद प्रकाशातही विलोभनीय दिसत होता. तेवढयात मागे वळून बघितले असता गुरुशिखर व त्यासमोर असलेला छोटा पर्वत हे कैलास निवासी "शंकर" भगवान आपले वाहन "नंदी" सोबत विसावले आहेत असे भासत होते, किती लक्षवेधी दृश्य होते ते. (गुरुशिखर चा आकार शंकराच्या पिंडी सारखा व त्या समोरील छोटा पर्वताचा आकार नंदी सारखा दिसत होता).

आंतरिक समाधानाने आम्ही सर्व गुरुशिखर खाली उतरत होतो, योगेश, आवटे कुटुंब, मालपुरे कुटुंब, राज दादा आमची गुरु शिखर च्या पायथ्याला वाट बघत होते. परिक्रमे दरम्यान १-२ वेळा राज दादांनी सर्वांकडे 'खजूर' आहे का म्हणून विचारले पण त्यांची खजूर खाण्याची इच्छा काही केल्या पुर्ण होईना.

तेवढ्यात एक गृहस्त खडीसाखरेचा प्रसाद वाटप करत होते, तेव्हाही त्यांच्या मनात येऊन गेले खडीसाखरे ऐवजी खजूर असती तर!! आणि काय आश्चर्य जणू काही साक्षात महाराजांना मनातील भावना कळाव्या आणि आदेश द्यावा त्या प्रमाणे त्या सभ्य गृहस्थाने स्वतः जवळ असलेले खजूर चे नवीन पॅकेट काढले आणि आमच्या पासूनच खजूर वाटायला सुरवात केली. डोळ्यात पाणी तरळले, आपसुक हात जोडले गेले, काय हव होतं अजून सगळं मिळालं.

पौर्णिमेचे स्वच्छ नितळ चांदणे निरभ्र आकाशात उठून दिसत होते. अचानक योगेश म्हणाला चांदण्यांच्या रूपात गणपती बाप्पा दिसत आहेत (चांदण्यांचा आकार गणपती सारखा दिसत होता). योगेश मनोभावाने नेहमी गणपतीची आराधना करतो. परमेश्वर आपल्या लेकरांच्या नेहमी सोबत असतो. सर्वांनी "गणपती बाप्पा मोरया" "जय गिरनारी" चा नामघोष करत कमंडलू आश्रमकडे मार्गक्रमण केले. कमंडलू आश्रम रात्री सुरु होते, आम्ही सर्वांनी गुरु महारांचे दर्शन घेतले.

गिरनार यात्रा सुरु झाल्या पासून मुग्धा ला ढोकळा खाण्याची खूप इच्छा होत होती, कमंडलू आश्रमात "ढोकळा आणि शिऱ्या" च्या प्रसादाचे वाटप सुरु होते. दत्तकृपेंने आम्ही सर्व भारावून गेलो, मुग्धा च्या आनंदाला तर पारावारच उरला नव्हता तिची पण ईच्छा महाराजांनी पूर्ण केली होती. मला शिरा खाऊन आमच्या माऊली (आई) ची आठवण झाली. काही अनुभव लिहू शकत नाही ते अनुभवायचे असतात, आम्ही सर्वांनी प्रसाद ग्रहण करून परतीच्या प्रवासाला सुरवात केली.

श्रद्धेनं विश्वासाने मन मजबूत झाली होती एक एक नजरेच्या टप्प्यात पुढे सरकत होतो पायऱ्या उत्तरांना आपण काय रस्ता चढलोय याची कल्पना येत होती. परिक्रमेचा खडतर रस्ता एवढ्या उंचीवरून बघून परमेश्वरी कृपेने काय साध्य झाले याचा विचार करून अंगावर शहारे उमटले. उतरतांना १-२ फोटो काढले. परतीच्या या वाटेवर घड्याळाकडे लक्ष नव्हते, लक्ष होते ते पुढच्या पायरीवर. अनेक अपंग, अतिवृद्ध, बालक सगळे चढत होते, गुडघ्यांची कमाल

जाणवत होती. एरवी या अवयवाकडे आपण दुर्लक्ष करतो शरीराची काळजी घ्या हाच तर खरा परमेश्वरी मंत्र.

साधारण ब्रम्हमुहूर्तास आम्ही "श्री गोरखनाथ" मंदिरा जवळ पोहचलो, तांबडं फुटू लागलं होता, पुसटशी लालसर रेघ सूर्यनारायण येण्याची चाहूल देत होती, सगळं खुपसुखद होतं. तो क्षण कॅमेऱ्यात टिपण्याचा मोह आवरला नाही. गोरखनाथ महाराज तपोभूमीत ध्यान करून एका अनामिक ऊर्जेच्या अस्तित्वाचा भास होत होता. ध्यान करता करता १ तास कधी निघून गेला कळलं पण नाही. आम्ही "श्री गोरखनाथ" महाराजांना नमस्कार करून "आंबा माता" शिखर कडे परतीची वाटचाल सुरु केली. सकाळी ५:३० ला आम्ही "आंबा माता" मंदिरा जवळ पोहचलो. थोडा वेळ विश्रांती घेतली, आम्हाला आंबा माता चे दर्शन घायचे होते पण मंदिराचे द्वार सकाळी ७:३० पर्यंत बंद होते.

सकाळी ६:०० ला आम्ही आंबा माता मंदिरा पासून निघालो. खाली उतरतांना माझे आणि नागेश चे पाय अतिशय दुखत होते विशेषतः घुडघे. एक एक पाऊल महत प्रयासाने उचलत होतो, चालणेही कठीण झाले होते, ठराविक अंतराने उभे राहत होतो ५०० पायऱ्या उतरल्या नंतर मी "गुरु शिखर" कडे बघून "गुरु महाराजांना" नमस्कार केला आणि प्रार्थना केली "गुरु दत्ता माझा काही चुकला असेल तर माफ कर रे बाबा". हळू हळू ५००-५०० पायऱ्यांचा टप्पा पार केला, येतांना आम्ही ५-६ वेळा विश्रांती घेतली, पूर्व दिशेला दिनकराचे आगमन झाले होते. सुष्टीच्या या पालनकर्त्याला नमन करून निसर्गाच्या सानिध्यांतुन आमची वाटचाल सुरु होती. गीर पर्वतरांगांचे विहंगमय दृश्य मनाला मोहिनी घालत होते. आस्ते आस्ते आम्ही ३००० पायऱ्या चा टप्पा गाठला. आता सूर्यदेव पदोपदी आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देत होते, आत्तापर्यंत हवी हवीशी वाटणारी कोवळी सूर्यकिरणे प्रखर झाली होती. आम्ही निंबू शरबत, पाणी घेत शरीराला ताजेतवाने ठेवत होतो. जस जस आम्ही खाली येऊ लागलो तस तस माझ्या पायच्या वेदनाही कमी होत गेल्या यातही महाराजांची लीला होतीच हे मला नंतर लक्षात आलं.

(दिनांक ०७/१२/२२) सकाळी १०:५० ला आम्ही गुरु शिखर खाली उतरून पहिल्या पायरी जवळ आलो, डाव्या बाजूला असलेल्या दत्त मंदिरात "दत्त महाराज" "स्वामी महाराज" यांचे दर्शन घेतले. पहिल्या पायरीला खाली वाकून वंदन केले. दैवी जाणिवेतून मानवी जाणिवेत परतत होतो परमेश्वर कृपेने काय साध्य झालं यावर विश्वासच बसत नव्हता. संथ गतीने सर्वांची पावले पडत होती मनात तेच दृश्य फ्रिज झालं होतं वळून बघितलं तर तोच डोळाभर मावणारा पवित्र गिरनार पर्वत पवित्र, गुरुपादुका टोक, अनुभव डोळ्यात तरळत होते, हलके हलके पावलं रूमवर पोचली ती प्रसन्न अद्भुत स्पंदन उराशी कवटाळून गाढ झोपी गेलो ते थेट संध्याकाळी जाग आली बरंच फ्रेश वाटत होतं.

(दिनांक ०७/१२/२२) आज कार्तिक पौर्णिमा. अगदी एखाद्या लख्ख प्रकाशाचा गोळा लावावा व त्याने सर्व परिसर उजळून टाकावा तसे वातावरण झाले होते. पूर्ण आसमंत उजळून निघाला होता. हा पौर्णिमेचा चंद्र पाहणे केवळ अप्रतिम, अलौकिक अनुभव होता. गिरनार पायथ्याचा तलेठी परिसर या शुभ्र नितळ चंद्र प्रकाशात न्हाऊन निघाला होता. भारावून टाकणार वातावरण होत. जशी जशी पौर्णिमेची रात्र होत होती तसा तसा चंद्र अजून मोठा व उजळ होत होता एक वेगळीच जादू होती ती. निरभ्र आकाशात पूर्णाकृती चंद्र तेजाने तळपत होता. काय दृश्य होते ते !! (अदभुत).

दिनांक ०८/११/२०२२: सकाळी लवकरच उठवुन आम्ही सर्व सोमनाथ ला जायला तयार झालो. यादवजी नी जुनागड ते सोमनाथ ला जायला गाडी ची सोय केली होती, आम्ही सर्वांनी "लंबे हनुमानजी" च्या समोर चहा/कॉफी घेतले व आंबा माता शिखर कडे नमन करून सोमनाथच्या प्रवासाला सुरवात केली. जातांना आम्ही गीर प्राणी संग्रहालयाला भेट दिली, ते वन्यवैभव बघून दुपारी २:०० ला सोमनाथ ला पोहचलो. समुद्रतटावर असलेला हा परिसर अतिशय सुंदर प्रकारे विकसित केला आहे. अहो भाग्यम! पौर्णिमेच्या दिवशी असा सोमनाथाच्या दर्शनाचा योग, केवढे ते भाग्य. सर्व मंदिर परिसर फिरून, मंदिराच्या बाहेर असलेल्या महाप्रसाद भवन ला महाप्रसाद ग्रहण केला. नंतर हिरण, कपिला


आणि सरस्वती नदीचा संगम असलेल्या त्रिवेणी संगमाला भेट दिली. संगमाच्या पात्रात पाय ठेवून आमचा सर्व यात्रेचा थकवा निघून गेला. थोडा वेळ थांबून आम्ही परतीचा प्रवास सुरु केला, येताना गीर अभयारण्य ला गिफ्ट्स ची खरेदी केली.

यात्रा, चढण, अनुभव, कोणाला काय दिसला, कोण कुठे होता यावर गप्पा झाल्या. तसेच यात्रा सफल झाल्याचे फोनही झाले त्यांना आम्ही काहीतरी ग्रेट केल अस वाटत होतं परंतु आमच्या कडून महाराजांनीच करवून घेतले हे आमच आम्हालाच समजत होत.आम्ही सर्व प्लॅटफॉर्म वर ट्रेन ची वाट बघत असतांना आमच्या शेजारी एक विदेशी महिला (जिना) जी अमेरिके वरून आध्यात्मिक प्रवासासाठी भारतात आली होती. अंगावर शहारे आणणारा तिचा गिरनारचा अनुभव ऐकून आम्ही सर्व नि:शब्द झालो.

रात्री ११:०० ला जुनागड ते अहमदाबाद ची ट्रेन होती निघतांना मागे वळून त्या पवित्र भूमीस नमस्कार केला, पावले जड झाली होती "गिरनार - अविस्मरणीय अनुभूतीची " ची शिदोरी घेऊन गाडीत बसलो. सकाळी ७:१५ ला आम्ही अहमदाबाद ला पोहचलो, ट्रेन १ तास उशिरा आली होती. दुसऱ्या ट्रेन ला अगदी थोडाच वेळ बाकी होता, प्लॅटफॉर्म बदलून आमचा अहमदाबाद ते पुणे असा प्रवास चालू झाला. गप्पा टप्पा करत सीमा रेषा ओलांडून गुजरातचा निरोप घेतला, जस जस एक एक स्टेशन कमी होत होत तस तशी घराची ओढ लागली होती. संध्याकाळी ७:०० ला गाडी पुणे स्टेशन ला पोहचली. सोसायटी मध्ये परत आलयावर सर्वांनी ग्रुप सेल्फी घेतला आणि आपापल्या घरी आलो. मी घरी येताच आकाश (माझा भाऊ) याने माझे पाय धुतले. मी देवघरातल्या "पांडुरंगाचे" दर्शन घेतले स्वामीचरणी नतमस्तक होऊन संपूर्ण यात्रा सुखरूप पार आणि निर्विघ्न पार पाडल्या बद्दल मनापासून आभार मानले. "जय गिरनारी"

ही यात्रा करायला ज्या परमेश्वराने इच्छा निर्माण केली त्यांचे सर्वांचे खुप आभार,

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**



# गिरनार यात्रा : दिव्यत्वाची प्रचिती

**सह्याद्रीकन्या डॉ.शीतल शिवराज मालुसरे**

**महाड (रायगड)**



एखादी सुप्त इच्छा मनात असते आणि ती पूर्ण होण्याचा योग योगायोगाने जुळून येतो अगदी तसेच झाले. मी मंदार भाऊ यांना मेसेज केला की, आम्हाला आदरणीय केणे काका यांच्या सोबत गिरनार येथे जायचे आहे,तर मंदार भाऊ यांचा संदेश आला मग येता का ३ मार्च ला? मी म्हणाले उद्या सांगते. रात्री १२ वाजता मॅडमना संदेश पाठवला, दुसऱ्यादिवशी चर्चा करून जायचे असे ठरले. मॅडम,मी, प्रिया,वैशाली आणि कांचन ताई असे आम्ही जायचे ठरवले. मंदार भाऊ यांच्याशी विचार विनिमय करून तात्काळ मध्ये आमचे बुकिंग झाले आणि गिरनार यात्रेसाठी आम्ही आतुर झालो. कांकासोबत यात्रा म्हणजे अलभ्य लाभ. तयारी सुरू झाली चालणे,व्यायाम,योगासने,खरेदी आणि तो दिवस उगवला. ३ मार्च २०२३ ला एक वाजता आम्ही महाडहून, महाडमार्गे गणपतीचे दर्शन घेवून सेंट्रल मुंबई येथे पोचलो. ९ ची ट्रेन होती. स्टेशन वर काकांची आणि सर्वांची भेट झाली आणि प्रवास सुरू झाला. सोबत जेवण होतेच. ४ तारखेला द्वारकेला पोचलो. तिथे जेवण केले फ्रेश झालोत आणि द्वारकाधीश मंदिराकडे निघालोत. त्याआधी नागनाथ चे दर्शन घेतले,सीता मंदिराचे दर्शन घेतले आणि द्वारकाधीश मंदिर दर्शनासाठी रांगेत थांबलो आणि जगाला तत्वज्ञान सांगणारे श्रीकृष्ण आठवू लागले. दर्शन घेवून मन प्रसन्न झाले. तिथेच जवळपास काठीयावाडीत मस्त जेवण केले आणि दुसऱ्या दिवशी बेट द्वारका येथे जायचे होते. सकाळी लवकर उठायचे होते. यामध्ये युगंधर सर यांचा फोन आला, त्यांना या वर्षीचा म. टा. चा उत्कृष्ट लेखकाचा पुरस्कार मिळाला होता. काय योग पाहा...त्यांचे अभिनंदन करायला शब्द अपूरे होते.

दुसऱ्या दिवशी बोटीतून जाताना सरावलेले समुद्रपक्षी, उंच फेकलेले खाणे चोचीने बरोबर वरच्यावर टिपत होते. ते विलोभनीय दृश्य मोबाईल मध्ये टिपत आम्ही द्वारकेला पोचलो. आमचे मोबाईल आम्ही बॅगेत टाकले होते, कारण सोमनाथ मंदिर दर्शनासाठी खूप कडक निर्बंध होते. बेट द्वारका जेथे श्रीकृष्णाचे वास्तव्य होते,जेथे श्रीकृष्ण सुदामा यांची भेट झाली होती. तेथील विविध आकर्षक मंदिरे पाहिले आणि त्या भूमीला नतमस्तक होऊन आम्ही सोरटी सोमनाथ दर्शनाला निघालो.

दुपारी सात्विक भोजन करून गाडी सोरटी सोमनाथ च्या दिशेने निघाली. मंदिरात मोबाईल घेवून जाता येत नाही म्हणून सकाळीच बॅगेत टाकले होते.त्यामुळे कोणाशी संपर्क होईना. वाटेत देवीचे दर्शन घेतले. जलस्थानाजवळ असलेले देवीचे मंदिर, प्रचंड ऊर्जा होती तिथे. ती ऊर्जा घेवून सोरटी सोमनाथ दर्शनाला निघालो. सोमनाथ येथे पोचल्यानंतर पहिले जुने मंदिर जे अहिल्याबाई होळकर यांनी बांधले त्या शंभू महादेवाचे दर्शन घेतले आणि नंतर नवीन मंदिरात दर्शनासाठी रांगेत उभे राहिलोत. अतीशय सुंदर अशी दोन्ही मंदिरे. व्यवस्थित दर्शन घेऊन, जेवण करून आम्ही जुनागढ कडे रवाना झालो. उद्या मुख्य गिरनार यात्रा होती.

सकाळी नाश्ता करून ८ वाजता आम्ही पायी जाणारे काकांसोबत आणि रोपवे ने जाणारे सोनाली ताई सोबत असे निघालो. शंभू महादेवाचे दर्शन घेऊन यात्रा सुरू झाली.सोबत आम्ही काठी घेतली होती. अतिशय नयन मनोहर दृष्य,सहज इकडे तिकडे बागडणारे मोर,सराईतपणे वावरणारी माकडे आणि शांतपणे चालणारे काका,सोबत सारे बंधू आणि रोप वे ची तिकिटे कॅन्सल करून काकांसोबत जाण्याचा निर्णय घेतला त्याची प्रचिती हळू हळू येत होती. शेषावन,देवीचे मंदिर, मारुतीरायांचे मंदिर, सीता वन असे चालताना एके ठिकाणी थांबून त्यांनी सांगितलेला अनुभव आणि प्रत्यक्ष महाराजांनी दिलेले दर्शन,ते स्थळ सारे काही अदभुत आणि ते दिव्य शब्द, अनुभव घेत आम्ही शेषावन आश्रमात गेलो. तिथे यज्ञ सुरू होता, त्याचे दर्शन घेऊन तिथे प्रसाद सेवन करून

आम्ही जंगलातून गिरनार गुहेच्या इथे गेलो जिथे एक दिव्य अनुभव आला. या एवढ्याशा गुहेत कितीतरी जण बसले होते यावर विश्वास बसत नव्हता. अतिशय छान अनुभव होता. त्यानंतर मात्र अंबामातेच्या मंदिराच्या दिशेने पायऱ्या चढायला सूरवात केली..सगळे पुढे गेले..पाठीमागे मी, भरत दादा,स्वप्नील भाऊ,मंदार भाऊ..श्रेयस भाऊ असे चालत होतोत..काय माहित काय झाले माझे पाय अजिबात उचलत नव्हते..हळू हळू मी चालत होते,हे तिघे बंधू सोबत सगळे अंबा मातेच्या मंदिराशी पोचले होते. मला पोचायला अजून वेळ लागणार हे लक्षात येताच काका सांगायला आले की आम्ही पुढे जातो ताई तुम्ही सावकाश या.

आता उद्या भेटू. भराभर पायऱ्या चढणाऱ्या काकांकडे मी पाहत राहिले....पुन्हा आजच्या दिवसात काका भेटणार नाहीत याचे वाईट ही वाटले. काकांनी मंदार भाऊ यांच्याकडे निरोप ठेवला की ताई ना डोली ने वर यायला सांगा. आम्ही मातेच्या मंदिराशी पोचलो..पाय खूप सुजले होते,शूज काढले स्प्रे मारला. सगळे पुढे निघाले मी दर्शन घेण्यासाठी थांबले तिथे बरीच ओळखीची लोकं भेटली. खूप जणांनी सोबत फोटो काढले,इतक्यात आमचे जावई केदार यांचे मित्र आणि दोन्ही मामा तिथे भेटले. आम्ही काकांसोबत आलो आहोत हे कळताच ते काकांना भेटायला धावत गेले. मी दर्शन घेवून आले तर पुन्हा नंतर दोन्ही मामा पुन्हा मला भेटायला आले,मामीशी बोलणे करून दिले. त्यांच्यासोबत त्यांचे एक मित्र होते ते म्हणाले ,ताई तुमचा पाय दुखतो आहे ना, मालिश करून देतो. केदार चे मामा आणि मंदार भाऊ यांनी ही दुजोरा दिला आणि त्या भाऊ नी पायाला मालिश केले,मी क्रीम लावले पाय थोडे रिलॅक्स झाले. ते सारे होळी साठी थांबले आणि आम्ही डोलीची चौकशी केली, पण मला ते योग्य वाटेना. मी मंदार भाऊ यांना म्हणाली, 'जाऊ आपण हळू हळू. श्रेयस नी माझे शूज हातात घेतले हे मला अजिबात आवडले नाही पण तो ऐकेना शेवटी शूज चहावाल्याकडे ठेवून आम्ही निघालो गोरक्षनाथांच्या शिखराकडे. श्रेयस सारखा म्हणत होता की, 'महाराज बरोबर दर्शनासाठी घेवून जातात फक्त श्रद्धा पाहिजे'.त्याची प्रचीती आली, मी न थांबता गोरक्षनाथांच्या मंदिरापाशी पोचले. मलाही खूप आश्चर्य


वाटले. मी कधी वर पोचले कळलेच नाही, मंदार भाऊ मात्र भारावल्यासारखे धावत जावून ध्यान करत होते. या आधी घरच्यांना आम्ही व्हिडिओ कॉल करून दुरून गुरू शिखराचे दर्शन घडवले आणि गोरक्षनाथ यांचे दर्शन घेवून पायऱ्या उतरू लागलो. पुन्हा गुरू शिखराच्या दिशेने पायऱ्या चढायला सुरुवात केली. खूप वारा होता,अगदी हजारो पायऱ्या चढून गेल्यावर काका आणि सारे खाली उतरत होते..आणि आम्ही काहीचं पायऱ्या दूर होतो.काकांनी थांबून टाळ्या वाजवून प्रेरणा दिली. काकांची भेट झाली याचा वेगळा आनंद होता.आम्ही चढून गुरूशिखरा पाशी पोचलो. आत प्रवेश केला आणि डोळ्याचे पारणे फिटावे इतके विलोभनीय दृष्य. महाराजांची देखणी मूर्ती आणि चरणपादूका पाहून मन भरून आले. गुरुजींची परवानगी घेवून आम्ही तिथे १० मिनीटे ध्यानमग्न झालोत आणि तृप्त मनाने पायऱ्या उतरू लागलो. कमंडलू तीर्थ येथे प्रसाद सेवन करून आम्ही निघालोत. पुन्हा गोरक्षनाथ मंदिर आणि पुन्हा पायऱ्या उतरायला सुरवात केली अंबा मातेच्या मंदिरा पाशी राम काका आमच्यासाठी थांबले होते..श्रेयस नी पुन्हा शूज हातात घेतले. एक मात्र खरं, महाराजांनी अनवाणी पायांनी दर्शन घडवले होते,अगाध महिमा. मला वाटलेच नव्हते मी गुरूशिखरापर्यंत पोचेन, पण दत्त महाराजांनी हे घडवून आणले. दिव्यत्वाची प्रचीती आली, सारेच बंधू सोबत होते. ही दिव्यत्वाची प्रचीती घेत मी निशब्दपणे एकेक पायरी उतरत होते.

|| **जय गिरनारी** ||

# स्वामी कृपेची साथ : गिरनारवारीचा अलौकिक अनुभव

सौ. स्मिता शैलेंन पाटील

बोरीवली (वेस्ट)



साधारणतः २०१६ च्या नोव्हेंबर महिन्यात व्हॉटसअॅपवर एक मॅसेज आला की, पुज्यनीय श्री. प्रमोद केणे काकांनी केलेल्या अनेक पौर्णिमेच्या गिरनारवारीतील अनुभव कथनांचा कार्यक्रम आहे. तोपर्यंत गिरनार कुठे आहे? त्याचे काय माहात्म्य आहे? हे मला काहीच माहीती नव्हते. मला अध्यात्मातील अनुभव ऐकायला आवडतात, त्यामूळे माझी देवावरील श्रद्धा द्रुढ होते असं मला वाटते, म्हणून मी कार्यक्रमाला जायचे ठरवले.

२०१६ च्या नोव्हेंबर महीन्याच्या एका रविवारी बोरीवली इस्टला नॅशनल पार्क जवळील चोगले हायस्कूल मध्ये हा कार्यक्रम होता. मी माझ्या मिस्टरांना बरोबर घेऊन कार्यक्रमाला गेले. आम्हाला पोहचायला थोडा उशीरच झाला होता, कार्यक्रम सुरु झाला होता, पूर्ण हॉल भरला होता. आम्हाला व्हरांड्यात बसायला जागा मिळाली. पूर्ण हॉलमध्ये कमालीची शांतता होती. श्री केणेकाकांचे कथन खणखणीत आवाजात सुरु होते. त्यांचे ते दिव्य अनुभव ऐकून अंगावर शहारे येत होते, सकारात्मकता वाटत होती. मी भारावून गेले. मला गिरनारचे माहात्म्य समजले होते, गिरनारीवारीची मनात तीव्र इच्छा निर्माण झाली. गुरुशिखरावरील दिव्य पादुकांचे एकदा तरी आपल्याला दर्शन व्हावे असे वाटु लागले. असो, कांकाचे अनुभव कथन संपूच नये असे वाटत होते पण ते संपले. भारावलेल्या अवस्थेत मी तेथुन बाहेर आले. श्री केणेकाकांनी लिहीलेल्या पुस्तकांचा बाहेर स्टॉल लावला होता, तिथे बरीच गर्दी जमली होती. काकांनी लिहिलेल्या “दिव्यत्वाची जेथे प्रचिती” हे पुस्तक घेण्याची माझी इच्छा झाली. तितक्यात

माझी ननंद, माझ्या मिस्टरांची आतेबहीण निताताई तिथे आली तिने ते पुस्तक मला भेट दिले. तिने अध्यात्मावरील बरीच पुस्तके मला भेट दिली आहेत, त्यामुळे माझी देवावरील श्रद्धा अधिक दृढ झाली असं मला वाटत, धन्यवाद निताताई. पुस्तक घेऊन मी घरी आले. त्यांचे अनुभव परत परत वाचले, तरी मन भरत नव्हते. पुस्तक वाचून माझी गिरनारवारीची इच्छा अधिक दृढ झाली. ते पुस्तक मी वसईला माझ्या वडीलांना वाचण्यासाठी घेऊन गेले, कारण ते दत्त भक्त होते. नंतर ते पुस्तक तिथेच राहिले.

२०१७ ला माझे वडील अचानक गेले, म्हणून मी स्वामींवर खुप रागावले होते. काही महीने मी स्वामींपासून दूर गेले, पण स्वामींनीच परत मला त्यांच्याकडे खेचून आणले. माऊलीच ती, असो.

त्यानंतर पुढील दोन वर्षे कोविडने थैमान घातले, तेंव्हा तर कुठे जाण शक्यच नव्हते, त्यादरम्यान मी युट्युबवरील स्वामींचे अनुभव, गिरनारवारीतील लोकांचे अनुभव ऐकत होते, त्यामुळे परत मला गिरनारचे वेध लागले. मी देवाला नेहमी प्रार्थना करत असे की मला गिरणारला न्या, मला गुरुशिखरावरील दिव्य पादुकांच दर्शन घडवा. २०२२ च्या ऑक्टोबर महिन्यात अक्कलकोटला जाताना, मी माझी आतेबहीण भक्ती हिला सांगितले की, “मला गिरनारला जायचे आहे, पण कसं काय जाऊ, समजत नाही” आणि नोव्हेंबर मध्ये शाळेच्या ग्रुपवर एक मॅसेज आला की श्री.राहुल डहाणूकर हे गिरणार यात्रा काढत आहेत आणि काही दिवसांनी योगायोगाने माझ्या आत्तेबहीणीनी राहूल डहाणूकरांचाच नंबर मला दिला. मी लगेच त्यांना फोन केला. तेव्हा ते म्हणाले ४ जानेवारी २०२३ ला आपण गिरणारला जाणार आहोत. त्यांनी सर्व माहिती मला दिली, मी लगेच मिस्टरांना सांगितले ते ही हो म्हणाले आणि लगेच बुकींग कऊन टाकले, अशक्य वाटणारी गोष्ट शक्य वाटू लागली, मला खूप आनंद होत होता.

माझ्या प्रकृतिकडे बघून सर्व म्हणत होते, ५००० पायऱ्या जरी रोपवेने असल्या तरी आणखी ५००० पायऱ्या तू चढू शकशील का? मलाही मनात भिती वाटत होती, शंका येत होती, खरच आपण ५००० पायऱ्या चढू शकू का? आणि

दोन दिवसांनी युटयुबवरील स्मिता ओक यांचा गिरणारवारीचा व्हीडीओ पाहीला आणि मला हायसे वाटले. हयांच्या सारख्या ७५ पेक्षा जास्त वयाच्या बाई जर उत्साहात ५००० पायऱ्या चढू शकतात, तर माझ्यासारखी ५० शीची बाई का नाही चढणार? माझ्यासाठी तो व्हिडिओ प्रचंड प्रेरणादायी ठरला. माझा आत्मविश्वास वाढला, कदाचित मी घाबरत असल्यामुळे स्वामीकृपेनेच तो व्हीडोओ पाहाण्यात आला असावा. मी तयारीला लागले.

अचानक काय झाले कुणास ठावूक १ जानेवारीला मला खूप ताप आला. आम्हाला निघायचे होते ४ जानेवारीला, आणि १ जानेवारीला रविवार असल्यामूळे डॉक्टर नव्हते मिस्टरांनी तापाची टॅबलेट दिली, कसाबसा रविवार काढला. दुसऱ्या दिवशी डॉक्टरकडे गेले, डॉक्टरांनी औषध दिलेले, पण ताप उतरायच नावच घेत नव्हता. रात्री परत डॉक्टरकडे जाऊन औषध बदलून घेतले, तरीही ताप चढत होता उतरत होता. मला वाटलं पूर्ण औषध पोटात गेल की उतरेल ताप, पण पूर्णतः ताप उतरलाच नाही. माझी अवस्था पाहून माझा मुलगा अनूज म्हणाला देखील की, “मम्मी तू नक्की जावू शकशील ना”? मी उसने अवसान आणून म्हणाले, ‘हो’. पण मी मनातून घाबरले होते दुसऱ्या दिवशी जायच होत म्हणून ३ तारखेला संध्याकाळी बोरीवलीला स्वामींच्या मठात गेले. स्वामींना प्रार्थना केली, स्वामीदेवा उद्या निघायचे आहे तुम्ही योग जुळवून आणला आहे, आता तुम्हीच मला ठणठणीत बरं करा. ५००० पायऱ्या चढायचं बळ दया. मठातच माझे मिस्टर माझ्या बरोबर होते, मी त्यांना म्हटलं की, “मला अजून बरं वाटत नाही कसतरी होत आहे, आपण डॉक्टरांकडे परत जाऊया.” आम्ही डॉक्टरांकडे गेलो डॉक्टरांनी औषध परत बदलून दिले. मी त्यांना विचारल, “मी बरी होईल ना? मी उद्या जाऊ शकेल ना?” ते म्हणाले, “का नाही जाऊ शकणार, तू ठणठणीत बरी होणार आहेस. तुझी यात्रा छान होईल, तू जा बबिनधास्त” मला हायस वाटलं. दुसया दिवशी खरच ७०% मला बरं वाटलं होतं.

आम्ही चार जानेवारीला बुधवारी घरातून १ वाजता निघालो. दुपारी २ वाजता बोरीवलीला 'सौराष्ट्र एक्सप्रेस' पकडली. मला अशक्तपणा होताच, जेवण पण नीट जात नव्हते, मनात धाकधूक होती. गाडीमध्ये रात्री ९ वाजता आम्ही जेवलो आणि झोपी गेलो.. आणि रात्री ३ वाजता मला विचित्र वाटू लागलं. थोडा ताप आला होता, मी घाबरले मला रडायला येत होते. मी नक्की ५००० पायऱ्या चढू शकेन ना? सारख हेच मनात येत होतं. मी मनोमन स्वामींना प्रार्थना केली, "स्वामी मला इथपर्यंत आणलं आहे, आता माझी गिरनारवारी संपन्न करण्याची जबाबदारी तुमची" तितक्यात निताताई आणि माझ्या मिस्टरांनी आदल्यादिवशी तिथे देवाला वाहाण्यासाठी चाफ्याची फुले आणली होती आणि जी बराच काळ झाल्याने कोमेजली होती त्यांचा सुगंध सभोवताली दरवळला, जणू काही स्वामींनी संकेतच दिला की माझी गिरनार वारी संपन्न होणार, आणि सकाळपर्यंत मी पूर्ण बरी झाली होती, माझा ताप उतरला होता.

दुसऱ्या दिवशी आम्ही ५ वाजता जुनागड स्टेशनला पोहोचलो. थंडी खूप जाणवत होती. रीक्षाने अर्ध्यातासात आम्ही हॉटेलवर पोहचलो, नंतर फ्रेश होऊन ८:३० वाजता आम्ही लंबे मारुती, पहीली पायरी अशी गिरनारच्या आसपासच्या मंदिरातील दर्शन घेतले. नंतर आम्ही जेवणं करून सोमनाथ महादेव मंदिर, भालका तिर्थ इं. मंदिरं बघून रात्री ९ वाजता परत गिरनारला आलो आणि हलकासा आहार घेऊन झोपलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी फ्रेश होऊन ६:३० वाजता, आम्ही रोपवे च्या रांगेत उभे राहीलो. बरोबर ७ वाजता आम्ही रोपवे मध्ये बसलो आणि अवघ्या १० मिनटात आम्ही गिरनारच अर्धे अंतर पार केल. आत्ता खरी गिरनार चढायला सुरवात झाली. फ्रेश असल्यामूळे आणि हवेत गारवा असल्यामुळे आम्ही बऱ्यापैकी गोरक्षनाथ टेकडीपर्यंत पोहचलो. थोडं अंतर चढल्यावर मला थकायला झालं होते. मी बुट घातले होते, पण मागच्या बाजूने अर्धवट चढवले होते म्हणजे पूर्ण घातले नव्हते. अचानक पाठीमागुन एक गृहस्थ जे साधारणतः ७० च्या आसपास असतील, वर्ण गोरापान, त्यांनी सफेद कुर्ता, पायजमा घातला होता

आणि बरेचसे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सारखे दिसत होते. ते मला म्हणाले मॅडम बुट पूर्ण घाला, नाहीतर चढायला अडचण होईल. अस म्हणून ते झपझप पूढे गेले. मी बुट पूर्ण चढवले व चालू लागले, आणि गुरुशिखर चढायला सुरवात केली. काही अंतरा नंतर पुढे गेल्यावर मला अशक्तपणा जाणवु लागला, थकायला झाल होतं, पायू थरथर कापू लागले, मी एका जागी उभे राहीले. माझ्या मिस्टरांनी मागे वळून पाहीले तर, माझी अवस्था बघून ते घाबरले, मला म्हणाले काय झालं? बरी आहेस ना? चढशील ना? मी त्यांना म्हटलं, “काही नाही ओ थोडां थकवा आहे, तुम्ही काळजी करू नका, तुम्ही पुढे जा येते हळू हळू.” ते पायऱ्या चढू लागले, मीही त्यांच्या पाठीमागून हळू हळू पायऱ्या चढू लागले. प्रत्येक पायरी चढताना स्वामीनामाचा जप चालू होता. आता गुरुशिखर जवळ आले होते मला खरंच वाटेना की, आता आपण गुरुशिखरा पर्यंत पोचत आहोत, काही अंतर चढल्यावर एका मोकळ्या चौथऱ्यावर आमचा ग्रुप थांबला होता. मी धापा टाकत त्यांना गाठले आणि कठड्याला पाठ टेकून उभे राहीले. नियोजक राहूल म्हणाले की, “इथेच चप्पल काढा, पूढे चप्पल काढायला जागा नाही”. आम्ही चप्पल काढले मी त्यांना विचारले की, माझ्याकडील हिना अत्तर आणि गुलाबजल महाराजांना अर्पण करायचे आहे ते स्वीकारतील का? ते म्हणाले नाही, तिथे काहीच स्वीकारत नाहीत. मी थोडे नाराज झाले. तितक्यात अगोदर भेटलेले गृहस्थ तिथे पोहचले आणि तेही थोडावेळ कठड्याला पाठ टेकून उभे राहीले. त्यांच्या बरोबर एक २७-२८ वर्षाचा मुलगाही होता. मी प्रचंड थकलेली पाहून ते म्हणाले, “काय हो एवढ्यातच थकलात, मी तर दर महीन्याला येतो”. तर आमच्यातील एक बाई त्यांना म्हणाली, “आमची ही पहीलीच वेळ आहे.” त्यांनी फक्त स्मित हास्य केलं. माझ्या मिस्टरांनी कौतुकाने त्यांना विचारले, कुठनं येतात? ते म्हणाले, ‘बदलापूर’. थोडंसं जुजबी बोलण झालं आणि आम्ही चढायला लागलो. आमचा ग्रुप पूढे होता ते गृहस्थ माझ्या पूढे होते. मी त्यांना विचारलं, “मला महाराजांना गुलाबपाणी आणि अत्तर अर्पण करायचे आहे तिथे स्वीकारतील का? ते म्हणाले, “हो, स्वीकारतील ना, सर्व स्वीकारतात, तुम्ही दया.” मला आनंद झाला, मी स्वामी नामजप करत पायऱ्या चढत होते, आमचा

ग्रुप पूढे होता ते गृहस्थ माझ्या सात-आठ पायऱ्या पुढे होते. परत त्यांनी पाठीमागे वळून पाहिले आणि त्यांच्याबरोबर असलेल्या मुलाशी माझ्याकडे बघून कुजबुजू लागले आणि मला म्हणाले कायं ग येतेस ना? ये. अगदी वडीलांच्या मायेने विचारलं, मला भरून आलं. मी हो म्हटलं. आणि उत्साहाच्या भरात मी गुरुशिखर चढले.


आता काही सेकंदातच त्या दिव्य पादुकांच दर्शन होणार होत. मला धन्य वाटत होते. शेवटी तो क्षण आला आणि त्या दिव्य पादुकांचे दर्शन झाले, खूप अत्यानंद झाला. असं म्हणतात की, दत्त गुरुंच्या मनात असेल तरच हया दिव्य पादुकांचे दर्शन आपल्याला होते. त्यामुळे मी सुखावले, मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो होते कारण, देवाने मला इथे आणले. मी धोतर आणि उपरण, महाराजांना अर्पण करण्यासाठी भीतभीतच दिले ते त्यांनी स्वीकारल नंतर अत्तर, गुलाबजल दिले, तेही त्यांनी स्वीकारले. मला खूप आनंद होत होता. पूढे असलेले ते गृहस्थ मला म्हणाले, “अगं दिल ना अत्तर आणि गुलाबजाम”, मी हो म्हटले. मला समाधान वाटले, छान दर्शन पण झाले. मी भरुन पावले. म्हटल आता उतरतांना त्या गृहस्थाचे आभार मानुया की ज्यांनी मला प्रोत्साहन दिले व माझा उत्साह वाढवला, त्यांच्यामुळे मी अत्तर व गुलाबजल महाराजांना अर्पण करू शकले. आणि बाहेर येऊन पाहते तर, ते गृहस्थ कुठेच मला दिसले नाहीत. मला कळुन चुकले कि, स्वामींनीच माझे मार्गदर्शन करण्यासाठी त्यांना पाठवलं होतं. श्री स्वामी समर्थ.

शेवटी आम्ही गुरुशिखर उतरायला सुरुवात केली. बघताबघता आम्ही दत्तधुनी व कमंडलू तिर्थाकडे आलो, छान दर्शन घेतले. तिथेच आम्ही स्वादिष्ट प्रसादाचा आस्वाद घेतला, तिर्थ घेतले. मी धन्य झाले. तिथून परत गोरक्षनाथ टेकडी चढले गोरक्षनाथांचे दर्शन घेतले, परत खाली उतरून अंबामातेच्या मंदिरात गेले. तिथे माता छान विराजमान आहे. मातेला चुनरी अर्पण केली, अंबामातेचे दर्शन घेऊन आम्ही पुन्हा रोपवेचा आनंद लूटत समाधानाने खाली उतरलो.

अश्या रितिने स्वामींच्या कृपने गुरुशिखरावरील दिव्य पादुकांचे दर्शन लाभले आणि आमची गिरनारवारी संपन्न झाली.

**|| श्री गुरुदेव दत्त |**

|



# माझी अविस्मरणीय गिरनारवारी

श्री. मंगेश वैद्य, नाशिक




दत्त महाराजांच्या उपासनेचा वारसा हा आम्हाला वडिलांकडून मिळालेला. म्हणून लहानपणी पासुनच मला देखील दत्त भक्ती ची आवड मनात निर्माण झाली. बऱ्याच वेळा गुरुचरित्र पारायण करण्याचे भाग्य देखील मला प्राप्त झाले. तेंव्हापासुनच गिरनार ला जाण्याचे माझ्या मनात होते. पण दत्तप्रभुंची इच्छा झाल्याशिवाय तुम्ही गिरनार ला जाऊ शकत नाही हे मी ऐकून होतो, म्हणून मी फक्त दत्तप्रभुंना प्रार्थना करायचो की महाराज मला लवकर गिरनार ला बोलवा. आणि माझा तो योग ह्या वर्षी म्हणजे दिनांक २२ एप्रिल २०२३ ला अक्षय्य तृतीयेच्या पावन मुहर्तावर आणि ज्या दिवशी गुरु पालट होणार होता अशा सुवर्ण दिवशी दत्तप्रभुंनी घडवून आणला. किती ती कृपा महाराजांची!!

मी इतक्या वर्षापासून ज्या क्षणाची वाट पाहत होतो तो योग दत्तप्रभुंनी अशा प्रकारे घडवून आणला. हा योग घडून येण्यामागे देखील एक पार्श्वभूमी आहे. इथे नाशिकला मी वेगवेगळ्या दत्त मंदिरात गेलेलो आहे परंतु गंगेच्या काठावर एक प्राचीन एकमुखी दत्त मंदिर आहे, तिथे पहिल्यांदा मी 5 महिन्यापूर्वी गेलो आणि दत्तप्रभुंच्या आरती ला हजर राहिलो. ती आरती माझ्या मनात एवढी रूजली की वारंवार मी त्या मंदिरात जायला लागलो. फक्त गुरूवारीच नाही तर जमेल तेंव्हा मी मंदिरात जाऊन दत्तप्रभुंचे दर्शन घेत होतो. एक अनोखीच ओढ़ मला लागली होती. मग हळू हळू तिथल्या गुरुजींसोबत आणि मंदिरातील इतर

भक्त मंडळीसोबत ओळख होत गेली. त्या सर्वांसोबत छान नाते निर्माण झाले आणि ह्या अक्षय्य तृतीयेच्या १ आठवडा आधी समजले की एकमुखी दत्त मंदिर परिवार गिरनार यात्रेला जाणार आहे आणि सोबतच जे जे भक्त मंडळी इच्छुक असतील त्यांना अतिशय कमी नाममात्र शुल्कावर सोबत घेऊन जाणार आहे. आणि मग मी ठरवलं की आता गिरनार ला जायचंच! मी नोकरी करत असल्यामुळे आणि टीम लीडर ची जबाबदारी माझ्यावर असल्यामुळे ४ दिवस सुट्टी भेटेल की नाही याबद्दल मनात शंका होती. पण मनात ठाम निश्चय केला होता की यावेळी काही जरी झालं तरी गिरनार ला जायचं म्हणजे जायचंच !! मनातल्या मनात दत्तप्रभुंना प्रार्थना केली की माझी सुट्टी मंजूर होऊ दया आणि मला गिरनार ला तुमचं दर्शन घेण्याचं भाग्य प्राप्त होऊ दया. आणि सर्व काही व्यवस्थित झालं. बॉस ने माझी सुट्टी मंजूर केली. आणि मी खुप खुश झालो. दत्तप्रभुंचे खुप उपकार मानले. आता ओढ़ लागली होती मी कधी गिरनार ला पोहोचतो आणि महाराजांच्या गुरु पादुका डोळे भरून पाहतो ह्याची. म्हणजे महाराजांची कृपा बघा, गिरनार ला जाण्याआधी मी एकमुखी दत्त मंदिर परिवारासोबत जोडल्या गेलो आणि त्यांच्या सोबतच माझी गिरनार यात्रा घडून आली.

अखेर तो दिवस उगवला...दिनांक २० एप्रिल २०२३ गुरुवार रोजी दुपारी ५:३० वाजता आम्ही जवळपास ७० जण गिरनार साठी निघालो. जाताना बस मधे दत्तप्रभुंचे भजन आणि कीर्तनामुळे प्रवास अजुन सूखकर वाटत होता. दुसऱ्या दिवशी रात्री साधारण ८:३० वाजता आम्ही सोरटी सोमनाथ ला पोहोचलो. तिथे सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन आम्ही जेवण केले आणि मग गिरनार ला निघालो. रात्री २ वाजता आम्ही गिरनार ला पोहोचलो. तिथे सर्वांनी एका धर्मशाळेमध्ये स्नान आटोपले आणि मग लगेच गिरनार पायथ्याशी पोहोचलो. पहिल्या पायरी वर चढ़वावा हनुमानाचे दर्शन घेतले आणि आम्हाला १०००० पायऱ्या चढण्याचे बळ दे अशी प्रार्थना करून पहाटे ३:४५ च्या सुमारास पायऱ्या चढ़ण्यास सुरुवात केली. मी पहिल्या पायरी वर नतमस्तक झालो आणि मला खुप भरून आले. माझं एक स्वप्न आज प्रत्यक्षात उतरत होतं!! दत्तप्रभुंना

मनापासून नमस्कार केला आणि गिरनार चढण्यास सुरुवात केली. गिरनार चढ़ण्यासाठी मी एक काठी तिथून विकत घेतली कारण मला ती काठी माझ्या घरी घेऊन जायची होती. ज्या काठीच्या सहाय्याने मी १०००० पायऱ्या चढ़णार आणि उतरणार ती काठी  माझ्या साठी दत्तप्रभुंच्या प्रसादासारखी होती. त्या काठीच्या सहाय्याने मी गिरनार चढण्यास सुरुवात केली. सुरुवातीच्या जवळपास १५०० पायऱ्या चढताना खुप त्रास होत होता. एवढं चालण्याची कधी सवय नव्हती. पण दत्तप्रभुंच नाव घेत एक एक पायरी चढ़त होतो. पायऱ्या चढून मी पूर्ण घामाघूम झालो होतो. मध्येच थोड़ा वेळ थांबायच, पाणी प्यायच, खड़ी साखरेचा तूकड़ा तोंडात टाकायचा आणि पुन्हा चढायला सुरु करायचं.

थोडं पुढे गेल्यानंतर आमच्या सोबतचे काही वयस्कर आजी आणि एक काका भेटले. त्यांना सारखा दम लागत होता आणि पुढे अंधार होता. म्हणून मी ठरवले की आता ह्यांच्या सोबत आपण जायच. माझ्या कडे टॉर्च, पाणी, ग्लूकॉन डी, औषधे सर्व काही बैग मध्ये होते. जर यापैकी कोणाला काही गरज वाटली तर मी त्यांच्या सोबत राहणे योग्य ठरेल असे मला वाटले आणि मी त्यांना सोबत घेऊन, त्यांची काळजी घेत पायऱ्या चढायला सुरुवात केली. आणि आश्चर्य असे की मला होणारा त्रास पूर्णपणे कमी झाला. एक थंड झुळूक हवे मध्ये आली होती. असं वाटत होतं की कोणी तरी ए.सी. चालू केला होता. गर्मी पूर्ण नाहीशी झाली.. आणि आम्हाला पायऱ्या चढ़ने सुकर व्हायला लागले. त्या आजी, काका आणि इतर लोकांना सोबत घेत मी पायऱ्या चढ़त होतो, त्यांची काळजी घेत होतो. त्यांना देखील मी सोबत असल्यामुळे धीर आला होता. सोबत मोबाइल वर दत्त नामाचा गजर सुरु होता. सर्व वातावरण एकदम प्रसन्न जाणवत होते.

पहाटेचे ५ वाजले, थोड़ा उजेड पडत होता. आणि पाहतो तर काय आम्ही ढगांच्या पण वर होतो. एकदम स्वर्गीय अनुभव होता तो.. आजुबाजूला पर्वत आणि फक्त ढग दिसत होतो. हे सर्व पाहुन डोळे सुखावत होते. आम्ही आता अंबाजी माता मंदिराजवळ पोहोचलो होतो. तिथून पुढे गोरक्षनाथ महाराज मंदिरात दर्शन घेतले आणि गोरक्षनाथ मंदिरापासून गुरुशिखर दिसत होते. काय

नयनरम्य दृश्य होते ते! सूर्य उगवला होता आणि गुरुशिखर मंदिर सोन्या सारखे उजळत होते. गोरक्षनाथांचे दर्शन घेऊन आम्ही गुरुशिखराकड़े निघालो. इतक्या वेळ आम्ही पायऱ्या चढ़त होतो आणि आता पायऱ्या उतराव्या लागत होत्या. पायऱ्या उतरताना पाय दुखत होते, पायाला गोळे येत होते. पण काठीचा आधार घेऊन आम्ही पायऱ्या उतरलो. आणि समोरच कमान दिसली "श्री गुरु दत्तात्रेय चरण पादुका द्वार". ते पाहुन उर भरून आला. ज्या क्षणाची मी वाट पाहत होतो तो क्षण काही मिनिटांच्या अंतरावर होता. इतक्या वेळ गोरक्षनाथ मंदिरापासून पायऱ्या उतरल्या होत्या आता परत गुरुशिखरावर जाण्यांसाठी पायऱ्या चढायच्या होत्या. आणि त्या पायऱ्या पण अतिशय चढत्या स्वरूपाच्या होत्या.. पायऱ्या चढताना पुन्हा त्रास झाला. पण आता त्या होणाऱ्या त्रासापेक्षा दत्तप्रभुंच्या चरणपादुकांचे दर्शन कधी होईल ह्याची ओढ़ लागली होती..

अखेर तो क्षण आला.. मी गुरुशिखरावर मंदिराजवळ पोहोचलो. हातातली काठी बाहेर ठेवली आणि आत प्रवेश केला. दत्तप्रभुंच्या चरणपादुका आणि त्यांच्या सुंदर मूर्ती पुढे मी नतमस्तक झालो आणि डोळ्यातुन अश्रू वाहायला लागले. माझा आनंद गगनात मावेनेसा झाला होता. डोळे भरून दर्शन घेतले..मनापासून नतमस्तक झालो.. मला काहीच सूचत नव्हते.. तशीच प्रदक्षिणा मारून बाहेर पडलो. बाहेर येऊन घरी वीडियो कॉल केला आणि घरच्यांना कळसाचे दर्शन दिले. ते देखील धन्य झाले. नंतर अचानक मला आठवण झाली की मी नाशिक वरुन आणलेला प्रसाद तिथे अर्पण करायचा राहिला. मी पुन्हा वर गेलो तिथे रिक्वेस्ट केली की मला फक्त प्रसाद अर्पण करू दया. आणि आश्चर्य त्यांनी मला पुन्हा दुसऱ्यांदा लगेच आत घेतले मी पेढे चा बॉक्स गुरुजीच्या हातामध्ये दिला त्यांनी तो बॉक्स गुरुपादुकांना लावून परत माझ्या हातात सोपावला.. मी पुन्हा डोळे भरून दर्शन घेतले आणि तिथून बाहेर पडलो..खाली आल्यानंतर कमंडलु कुंड आहे तिथेच अन्नक्षेत्र आहे.. तिथे सर्व भक्ताना विनामूल्य जेवणाचा प्रसाद दिला जातो. तिथेच दत्त धुनी आहे.

तिथून खाली उतरताना मी एकटाच होतो. पोटामध्ये खुप भूक होती. मी खाली उतरत होतो. समोरून आमच्या सोबतचेच एक काका वर येत होते. मी त्यांना विचारलं, "काका, ते कमंडलु तीर्थ खालीच आहे ना? मला तीर्थ घरी न्यायचय" त्यावर त्या काकानी उत्तर दिले "तीर्थ तर मला दिसले नाही" तेवढ्यात बाजूने एक व्यक्ती वर चढ़त आली आणि मला गुजराती टोन मध्ये बोलली "अरे बाबा, आप निचे जाव, उधर पहले खाना खा लो और आपको तीर्थ भी वहां पर मिल जाएगा." मी ऐकलं आणि खाली उतरायला सुरु केलं तेवढ्यात मला जाणीव झाली अरे हा गुजराती माणूस कोण होता? मी तर त्याला काही विचारले पण नव्हते, मी फक्त काकांशी बोलत होतो, आणि त्याला माझी मराठी भाषा कशी ससमजल? आणि लगेच मी मागे वळून पाहिले तर तो माणूस दूर दूर पर्यन्त कुठेच दिसत नव्हता... मला कळून चुकले की ते कोण होते.. गिरनार यात्रेचे बऱ्याच जनांचे अनुभव मी ऐकले होते की, मनात जर खरी श्रद्धा असेल तर महाराज तुम्हाला कोणत्या ना कोणत्या रुपात दर्शन देतात.. मला जी गुजराती व्यक्ती भेटली त्यांचे व्यक्तिमत्व अतिशय साधे होते, साधे पैंट शर्ट अंगावर आणि कपाळी अष्टगंधाचा टिळा.. मी मनातुनच त्यांना नमस्कार केला आणि पुढे चालायला सुरुवात केली.

पुढे जाऊन कमंडलु कुंड ला पोहोचलो, तिथे दत्तप्रभुंची धुनी आहे. तिथे दर्शन घेतले, नमस्कार केला, प्रसाद स्वरुपात भस्म घेतले आणि जेवण करण्यासाठी बाजूला गेलो तर तिथल्या बाबानी मला माझी काठी बाहेरच ठेवण्यास सांगितली, माझे मन काठी बाहेर ठेवण्यासाठी तयार होत नव्हते कारण माझी काठी हरवण्याची किंवा कोणी तरी दूसरे ती काठी घेऊन जाण्याची मला भीति वाटत होती. कारण मला ती काठी प्रसाद स्वरुपात घरी घेऊन जायची होती. आणि जेवणाचा प्रसाद पण मला घ्यायचा होता. शेवटी कस बस मी ती काठी व्यवस्थित जागा पाहून एका कोपऱ्यात नीट ठेवली आणि जेवण्यासाठी आत मध्ये गेलो. खूप सुंदर जेवण होते. बटाटा,गवार रस्सा भाजी, पोळी, भात, शिरा आणि कढी ढोकळा.. वाह! जेवण करून आत्मा तृप्त झाला. जेवण झाल्यावर ताटाला नमस्कार केला आणि हात धुवून बाहेर आलो.. आणि पाहतो

तर काय मला ज्याची भीति होती तीच गोष्ट झाली. माझी काठी तिथून गायब झाली होती. आणि त्या जागेवर दूसरिच काठी ठेवलेली होती. माझा खुप mood off झाला, खुप चिड़चिड़ झाली.. तिथे आजुबाजूला खुप काठी होत्या, मी सगळीकड़े माझी काठी शोधली पण माझी काठी कुठेच नाही सापड़ली.. शेवटी मनातल्या मनात म्हणालो, महाराज कदाचित ही तुमचीच इच्छा असेल असे मानतो आणि ती काठी घेऊन पुढील प्रवासाला लागलो.

पुन्हा गोरक्षनाथ मंदिराकडे निघालो.. आता पायऱ्या चढायच्या होत्या.. पाय खुप दुखत होते.. उन वाढत होते.. हळू हळू, काठिच्या आधाराने पायऱ्या चढ़त होतो.. गोरक्षनाथ मंदिरात पुन्हा दर्शन घेतले आणि पुढे निघालो.. आता पुढच्या सगळ्या पायऱ्या ह्या उताराच्या होत्या.. पायऱ्या उतरताना पायाला खुप गोळे येत होते.. आणि तेवढ्यात पायऱ्या उतरताना माझा पाय लचकला.. डाव्या पायाच्या गुडघ्या मधे प्रचंड वेदना होत होत्या.. कसे बसे खाली उतरत होतो.. माझी इच्छा होती कि मी पूर्ण २०००० पायऱ्या पायी चढ़ उतार करेल, रोप वे चा वापर करणार नाही.. पण नाइलाजाने माझा निर्णय बदलण्याची माझ्यावर वेळ आली होती.. माझ्या दुखणाऱ्या पायाला फक्त काठीचा आधार होता.. माझ्या सोबतचे मित्र मंडळी पण आता रोप वे ने खाली जाणार होते, कारण ऊन खुप वाढले होते. मी देखील रोप वे चे टिकट काढण्यासाठी गेलो पण तिथे अजुन एक धक्का बसला.. त्यांनी रोप वे ने काठी नेण्यासाठी परवानगी नाही असे सांगितले.. मी खुप द्विधा मनस्थिति मधे होतो.. एकीकड़े मला माझी काठी सोडायची नव्हती आणि दुसरीकड़े चालत जावे तर पाय साथ देत नव्हते.

शेवटी मी ठरवलं की काही जरी झालं तरी आता काठी सोडायची नाही. आधीच माझी एक काठी हरवली होती.. आणि मग मी जमेल तसं काठी घेऊन उरलेल्या ५००० पायऱ्या उतरत जाण्याच ठरवलं. दत्तप्रभुंच नामस्मरण केलं आणि मला शक्ति देण्याची विनंती केली आणि पायऱ्या उतरायला सुरुवात केली. माझ्या सोबत आमच्याच बस मधील एक कपल होतं.. त्यांनी पायात चप्पल पण घातली नव्हती. काय ती श्रद्धा दत्तप्रभुंवर!! आपण तर पायात चप्पल

घातली आहे.. मग आपण तर पायी चाललो पहिजेच. मग हळू हळू पायऱ्या उतरत होतो. ते बिचारे दोघे माझ्या सोबतीला थांबत होते.. शेवटी मीच त्यांना विनंती केली की उन खुप वाढले आहे आणि तूमच्या पायात चप्पल पण नाहीये, तुम्ही पुढे जा. मी हळू हळू येतो.. मग ते पुढे निघून गेले.. मी दत्तप्रभुंच नामस्मरण करत दुखणाऱ्या पायाने पायऱ्या उतरत होतो.. पण माझी काठी हरवल्याची खंत काही माझ्या मनातुन जात नव्हती. माझी १०००० पायऱ्या चढलेली काठी हरवली ह्या विचाराने मी खुप व्याकुळ झालो होतो.

दुपारचे १२:३० वाजले असतील. मी लंगडत लंगडत पायऱ्या उतरत होतो. दूर दुर पर्यन्त माझ्या मागे आणि पुढे ही कोणी नव्हते. तेवढ्यात पायऱ्या उत्तरतानां माझे लक्ष बाजूला गेले तर एक चाळीशीची व्यक्ति एकदम पातळ भगवा कपड़ा कंबरेला बाँधलेला आणि डोक्याला एक भगवा पटका गुंडाळलेला, खांद्यावर झोळी आणि हातामध्ये दोन ते अडीच फुटाची काठी घेऊन बाजुलाच खोल दरी असलेल्या दगडी कठडयावर बसलेली होती. सावळा चेहरा, धारदार मिशा आणि काळीशार दाढ़ी आणि चेहऱ्यावर एक वेगळेच तेज असलेली ती व्यक्ती पाहुन मी आधी घाबरलो.. मी पायऱ्या उतरताना ते माझ्या कडे पाहत होते आणि मी त्यांच्याकड़े पाहत होतो.. मी थोड़े पुढे गेलो आणि मागे वळून त्यांच्याकडे पाहिले आणि हात वर करुन "जय गिरनारी" असे बोललो तर त्यांनी पण "जय गिरनारी" अशी हाक दिली. आणि लगेच ते मला म्हणाले "बेटा, तेरे हात में जो लाठी है वो मूझे दे दे, और ये मेरी लाठी तू लेकर जा!"

मी काही सैकंड फक्त त्यांच्याकडे पाहत होतो. त्यांनी पुन्हा मला आवाज दिला "बेटा दे दे वो लाठी और ये मेरी ले जा" मग त्यांना बोललो "नही बाबा, मेरी ये लाठी मैं आपको नही दे सकता" ते बोलले "क्यों नही दे सकता?" मी उत्तर दिले "मुझे ये लाठी प्रसाद के रूप में घर लेकर जाना है" त्यावर ते हसले आणि बोलले "बेटे, मैंने जान बूझकर तुज़से तेरी लाठी मांगी, ये लाठी कभी किसी को देना मत, ये हमेशा तेरे साथ रखना, ये लाठी मामूली लाठी नही है, सोने के लाठी से भी कीमती ये लाठी है जो तेरे हात में है, जा अब नीचे उतर,

तेरा सब भला होगा!!!!" मला कळून चुकले की हे महाराजच आहेत. मी त्यांच्याकड़े जाण्यासाठी पुढे पाउल टाकायला लागलो.. मला त्यांना नमस्कार करायचा होता, पण आश्चर्य असे की मी त्यांच्या जवळ जाण्याऐवजी ऊलटा मागे जात होतो आणि पायऱ्या उतरत होतो.. चेहरा त्यांच्याकडे होता आणि मि उल्टया पायऱ्या उतरत होतो.. त्यांच्याकड़े पाहत मी मनात विचार करत होतो की एवढं उन तापलेलं आहे, उन्हाचे चटके बसत आहेत आणि हे बाबा एकदम निवांत उन्हामध्ये त्या दगड़ी शीळेवर बसले आहेत, हे नक्की दिव्य पुरुष आहेत.. आणि आश्चर्य, त्यांनी तिकडून उत्तर दिले "बेटे हम संन्यासी आदमी है, हमे धूप से, बारिश से, ठंडी से कुछ नही होता" माझ्या अंगावर दुसऱ्यांदा शहारे आले होते.. कारण ते माझ्या मनातले येणारे विचार ओळखत होते..

प्रयत्न करून पण मी त्यांच्यापर्यन्त पोहोचु शकलो नाही.. मग मी दुरुनच त्यांना नमस्कार करून खाली उतरण्यास सुरुवात केली. मला आश्चर्या चा खूप मोठा धक्का बसला होता.. आणि खुप आनंद ही झाला होता.. मनात विचार आला त्यांनी ह्या काठीला सोंन्याची काठी बोलले तर नेमके आहे तरी काय ह्या काठी मध्ये म्हणून मी एके ठिकाणी थांबलो आणि काठीचे निरीक्षण केले तर पाहुन मला अजुन एक धक्का बसला.. त्या काठीच्या वरच्या बाजुच्या टोकावर नागाचा फणा कोरल्या सारखा होता.. मी काठीला नमस्कार केला आणि खाली उतरायला सुरु केले. भगवंताची लीला किती अगाध आहे.. माझी काठी हरवली म्हणून मी दु:खी झालो होतो.. परंतु दत्तप्रभुंनीच त्या काठीच्या जागी ही नागाचा फणा असलेली दिव्य काठी मला प्रसाद म्हणून दिली होती.. काठी हरवल्यावर माझी जी चीड़चीड़ झाली होती त्याबद्दल मी मनातच दत्तप्रभुंची माफी मागितली आणि पुढच्या प्रवासाला लागलो.. आता माझ्या मनात हरवलेल्या काठीमुळे झालेल्या नाराजीची जागा प्रसादरूपी मिळालेल्या दिव्य काठीच्या आनंदाने घेतली होती. आणि मी लंगड़त पण उत्साहाने पायऱ्या उतरत होतो..


पण परीक्षा अजूनही संपलेली नव्हती. दुपारचे २ वाजले होते. डोक्यावरचा सूर्यदेव आग ओकत होता.. शरीराला उन्हाचे चटके बसत होते, पाय आणि

गुड़घेदुखी अत्यंत वाढली होती.. आता मात्र सहनशक्ती संपत चालली होती.. पाय तिरपे टाक़त दोन्ही हातामध्ये काठी पकडून एखादा लंगड़ा अपंग व्यक्ती जसा चालतो तसा मी चालत होतो..  दत्तप्रभुंच नाव घेत मला पायऱ्या उतरण्यासाठी शक्ती दया अशी विनवणी करत होतो.. माझ्या मागे पुढे कोणीच नव्हते.. मी एकटा चालत होतो... येताना पायऱ्यावर जे दिसनारे जे नंबर होते ते देखील उतरताना दिसत नव्हते. तेवढ्यात एका बाजूला एक पाणी आणि कोल्ड ड्रिंक चे दुकान मला दिसले, त्या दुकानात एक ५०-५५ वर्षे वयाची व्यक्ती होती. मी त्यांना विचारल "बाबाजी और कितनी सीढिया बाकी है?" तर समोरून हसत ते उत्तरले "बेटा, जान कर क्या करोगे ?? नीचे उतरना तो है ही तुझे.. घर पे बीवी बच्चे राह देख रहे है ना ! नही तो आजा यहां पर मेरे पास, तेरे खाने पीने का पूरा इंतेज़ाम मैं कर लूंगा, मेरे साथ ही रह ले" आणि ते परत हसायला लागले.. मी फक्त त्यांच्याकड़े पाहत होतो.. तेवढ्यात ते पुन्हा बोलले "जा बेटा उतर अब नीचे, थोड़ा ही बाकी है" आणि मी पुढे चालयला लागलो. माझ्या लक्ष्यात आले की, दत्तप्रभु माझी परीक्षा घेत आहेत आणि मला एका नंतर एक दिव्य अनुभव येत आहेत.. आणि एवढ्या त्रासामध्ये पण माझ्या चेहऱ्यावर हसू उमटले..

आता जेमतेम १५०० पायऱ्याचा प्रवास बाकी असेल. मी नामस्मरण करत एकटाच पायऱ्या उतरत होतो.. आता माझे गुड़घे ठणकायला लागले होते.. पण कसा बसा उतरत मी २०० व्या पायरीवर आलो आणि तिथे मला पायाची मालिश करुन देणारे दुकान दिसले.. त्यांनी १०० रुपये घेऊन माझ्या पायाची छान मालिश करून दिली. मी त्यांना १०० रुपये दिले आणि त्यांना नमस्कार करण्यासाठी खाली वाकलो तर ते काका म्हणाले "अरे सर ये क्या कर रहे हो ?" मी बोललो "आप मेरे से उम्र में इतने बडे है, और बडो से पैर दबा लेना मुझे अच्छा नही लगा, इसलिए आपके पैर छुए" ते काका पण कौतुकाने हसत माझ्याकडे पाहत होते. त्यांनी हाथ वर करून आशिर्वाद दिल्यासारख केलं आणि मी पुढच्या प्रवासाला लागलो...

आणि अखेर दुपारी ३:४५ वाजता मी परत पहिल्या पायरीवर पोहोचलो.. चढ़वावा हनुमानाचे परत दर्शन घेतले, त्यांचे आभार मानले की तुम्हीच मला शक्ती दिली आणि माझी गिरनार यात्रा पूर्ण करून घेतली.. त्यानंतर पहिल्या पायरीवर पुन्हा नतमस्तक झालो, डोकं टेकवलं आणि दत्तप्रभुंचे आभार मानले, या प्रवासा दरम्यान आलेले अनुभव पुन्हा आठवले आणि डोळे भरून आले.. खरच दत्तप्रभु अजूनही आहेत आणि मनात जर खरी श्रद्धा असेल तर ते आपल्या भक्ताना गिरनार प्रवासा दरम्यान १००% अनुभूती देतात.. हात जोडून नमस्कार केले आणि प्रार्थना केली की, "दत्त महाराज, मला परत लवकर तुमच्या दर्शनाला बोलवा !"

**॥अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त॥**



# गिरनारवारी: एक अनाकलनीय अनुभव

सौ. गिरीजा संजय सावरकर

रत्नागिरी



गिरनार पर्वतावरील स्वयंभू दत्त पादुकांचे दर्शन घेणे दत्तात्रेयांचे दर्शन घेणे हे असंख्य दत्त भक्तांची इच्छा असते ज्याठिकाणी दत्तात्रेयानी बारा हजार वर्षं तपश्चर्या केली त्या पावन भूमीचे दर्शन घ्यावे असे बरेच दिवस माझ्या मनात येत होते पण दहा हजार पायऱ्या चढून गिरनार सफर करता येईल की नाही अशी मनात भीती होती पण रोप-वे झाला आणि ती भीती अर्धी कमी झाली आता गिरनारला नक्की जायचे असे मनाने घेतले आणि योग ही जुळून आला.

रात्री सव्वाअकराची ट्रेन पकडायची तर सव्वा दहाला निघायलाच हवं.पहिला टप्पा मुंबई मग मुंबई ते जुनागड असा २० तासांचा प्रवास होता .जोशीकाका रिक्षा वेळेत घेऊन आले आणि देवांच्या,स्वामींच्या पाया पडून मी घराबाहेर पडले. हे घेतलं,ते घेतलं ,औषधं घेतली, पैसे , कपडे ,मोबाईल घेतला अशी उजळणी करत स्टेशनवर येऊन पोचलो.२-३ महिने आधी प्लॅनिंग करून शेजारची ममता आणि मानसी यांचे घरातले निघाले होते .अचानक आजच सकाळी "मी पण येऊ का ?"असे विचारले तेव्हा "या ना !"असं ती म्हणाली हे पहिलं विशेष. त्यांच्या २२-२३ जणांच्या गृपमधले २ जण कमी झाले आणि माझ्या डोक्यात किडा वळवळू लागला .मोठ्ठा प्रश्न म्हणजे तिकिटांचं काय ? निघायच्या दिवशीच सकाळी अकरा वाजता अभिजित-साई ट्रॅव्हल्स -कडे गेले तर

तत्काळ वगैरेचा पर्याय वापरून १२ वाजता तिकीटे हातात पडली .पहिले अशक्य शक्य झाले.

पावसाने ८-१० दिवसापासून हजेरी लावायला सुरुवात केली होती. निघायच्या दिवशी जुनागडलाही पाऊस पडतोय, गिरनार चढताना पाय-यांवरुन पाणी येतंय वगैरेच्या बातम्या आणि व्हीडीओ क्लिप फोनवर येत होत्या. ज्येष्ठ नागरिक होऊन ६-७ वर्ष उलटलेली आणि दम्याशी ब-यापैकी मैत्री राखून असलेली मी निघाले होते मारे दत्तमहाराजाना भेटायला. हे दुसरं अशक्य...

ममताचा हात धरुन शूरपणा करायला निघालेय आणि तिलाच त्रास नाही दिला म्हणजे झाले ,असं मनोमनी वाटत होतं.स्वामीच आता कृपा करोत जेणेकरून माझा निग्रह आणि आत्मविश्वास काहीच डळमळू नये.शरीराने साथ द्यावी ५००० पाय-या चढायच्या आहेत हे विचार सतत घोळत होते प्रवास छान झाला जुनगडच्या तनेटी भागातल्या मंगलम् हॉटेलमधे बुकिंग होते तेथे येऊन विश्रांती घेतली.साधारणपणे ही माझ्याबरोबरची मंडळी याआधीही इथे येणारी होती.नेहमी रात्री ११ वाजता ते निघतात व सर्व पाय-या चालत चढून जातात.पण मी व मानसीची आई याना त्रास कमी व्हावा म्हणून ५ जणांनी पहिला टप्पा रोपवेने जायचे ठरले.शेवटची रोपवेची फेरी ७ वाजता असते म्हणून आम्ही ६ वाजता रोपवेने अंबाजी मंदिरापर्यंत गेलो .मातेचे दर्शन घेऊन तिथे थांबायचे व चालत येणा-यांबरोबर रात्री पुढच्या वाटचालीला लागायचे असे ठरवले.

पण जो भेटे तो सांगे,"माँजी हम यहाँ रुकनेकी परमिशन नहीं देते। रातको यहाँ कोई नहीं रहता।यह गीरका फॉरेस्ट एरिया है।बिबटे और लायन रातको बाहर निकलते है! आप डंडे लेकर चलते रहना किधर रूकनेकी जगह नहीं है!" ७ वाजले होते.तेवढ्यात एकजण भेटले त्यानी सिनि.सिटीझन अहात कमंडलू तीर्थापाशी जा. आश्रमात ४ वाजेपर्यंत थांबायला देतील असे सांगितल्यावर हुशारी वाटली आणि "गणपती बाप्पा मोरया ,जय अंबे,जय गिरनारी!" असे स्मरण करून कूच करायला सुरूवात केली .

चालताना मला धाप लागत होती पण शुद्ध हवा ,मुबलक प्राणवायू आणि गार वारा यामुळे न थकता गोरक्षशिखर गाठले.या यात्रेतले हे सगळ्यात ऊंच स्थान आहे. ,सूऽऽऽसू करणारा वारा,नुकतीच पौर्णिमा झालेली असल्याने साथीला जेमतेम वाट

दिसेल इतपतच प्रकाश होता. काळे ढग डोक्यावर सुसाट वा-यावर धावत होते त्यामुळे चंद्रदर्शन दुर्मिळ होते.अशा थंडीवा-यात,पावसात शेजारच्या गुरुशिखरावरच्या पादुकांकडे पहात साडेबारा वर्षे गोरक्षनाथांनी तपश्चर्या केली होती त्या शीळेवर डोके टेकवून पुढे निघालो. काठीचा आधार घेऊन चालत रहाणे आणि कमंडलू तीर्थ गाठणे हे ठरवले होते .चालताना माझ्या मागे राहून ममता माझी खूप काळजी घेत होती.

या वारीत फक्त चढण नाही. तर चढणे, उतरणे,परत चढणे असे चालावे लागते त्यामुळे थकवा येत नाही असे असेल का ? नाहीतर दुस-या मजल्यावर चढल्यावर मिनीटे धापा टाकत बसणारी मी आज किती पाय-या चढते आहे.

**"चालो वाटे आम्ही तुझाची आधार। चालविसी भार स्वये माझा !!**

अशा तुकोबांच्या उक्तीचा प्रत्यय वारंवार येत होता तेच बोलावतात ,नेतात हेच खरे ! आता फूट उंचावरच्या या ठिकाणापासून कमंडलू तीर्थाकडे उतरत जायचे होते आमची वाटचाल सुरू झाली जसजसे जवळ जाऊ लागलो, उंचावरही झांजा व आरत्या ऐकू येत होत्या.शब्द कळत नसले तरी आरत्या चालू आहेत हे कळत होतं.आणि कधी आम्ही गुरुदत्तांच्या सुंदर लोभस मूर्तीसमोर कमंडलू तीर्थमंदिरात पोचलो ते कळलंच नाही.तेथे खूप छान आनंदलहरी आणि शांतता अनुभवाला येत होती.प्रसादासाठी हाक आली.पोळी आमटी व शिरा असा प्रसाद घेऊन झाला. रात्रीचे ९:३० वाजले होते त्या मठातून काही सोय होत नाही हे सांगून त्यानी विषय मोकळा केला.विनंती करुनही ऐकत नाहीत मग बाहेर जाऊनच चालत रहावे लागेल नाहीतर आभाळाचं पांघरूण आणि वसुंधरेची बैठक आज गोड मानायची आणि इथून निघायचे हे पक्कं झालं

पन्नास पाय-या वर जाऊन तिथेच टेकलो.गप्पा मारत हसत थंडी उडवत होतो.जरावेळाने कमानीपर्यंत जाऊन थांबायचे,जाणारे येणारे भेटतील असा विचार करून परत कमान दिसेल असे जाऊन बसायचे ठरले.मग लगेच त्याची अंमलबजावणी सुद्धा झाली.वेळ जाता जात नव्हता जेमतेम ११ वाजले होते.काही वेळाने थोडी कुजबूज कानावर आली.आम्ही सावध होतोच. १५ मिनिटात बॅटरीचा झोत हवेतून आला मी उभी राहिले.चाहून घेऊन हात उंच केला. तीन व्यक्ती आमच्या पासून काही अंतरावर होत्या.हातात पावरफुल बॅटरी होत्या. गुरूशिखराकडे ते लगेच जाणार होते. आम्हा ५

जणांना अजून तिघे सोबतीला आहेत ह्या विचाराने आम्ही त्यांच्या सोबतीने जाण्यासाठी उठलो. त्यांच्यासोबत दोन कुत्रेही होते. आम्हा ज्येष्ठाना जपून नेणा-यांमधे अजून तिघांची भर पडली,आणि सोबत दोन एकनिष्ठ कुत्रे. ज्याजागी आम्ही मगाशी होतो तिथे बिबट्याचा वावर असतो असं त्या माणसांकडून कळलं ,काळजाचा ठोका चुकला.त्या तिघांची एकमेकांशी ओळख नाही. तीन गावचे तीन येता येता भेटले होते आमच्या दृष्टीने ही अद्भूत प्रचिती होती

हवेतून तरंगत नेल्यागत आम्ही दत्तशिखरी केव्हा गेलो-नाही कळले.शेवटच्या पायरीवर जाऊनही आत गेल्याशिवाय नीटसं काही दिसणार नाही हे कळलं. सगळ्या पाय-या दवाने भिजल्या होत्या.वरच्या १० पाय-या उतरून आम्ही बसणार तोवर ते तिघे खाली उतरू लागले.आम्हाला बसायला पूर्ण कोरडा चौक दाखवून ते निघाले.आम्हाला कळेना, दर्शन घेतल्याशिवाय हे कसे निघाले?पण ते थांबेनात. "परगावातून एवढ्या लांबून येऊन, १०००० पाय-या चढत इथवर पोचून दर्शन न घेता का जाताय ?"असं विचारल्यावर गडबड आहे लगेच जायला हवं म्हणून ते तिघेही जाताहेत हे आम्हाला अनाकलनीय वाटलं.ही दत्तगुरूनी दिलेली प्रचितीच आहे असा आमचा विश्वास दृढ झाला होता.कुत्रे मात्र थांबले त्यातला एक मला अगदी खेटून बसला होता काठीनं ढोसललं तरी हलला नाही शेवटपर्यंत.एवढं सगळं होऊन वाजला होता एकच.

पुजारी पूजेला यायला पुरे ७ तास होते. थंडी वारा वाढत होता पण फक्त वेळ कसा जायचा याशिवाय चिंता नव्हती. दत्तगुरूंनी आपल्या पायाशी आणून बसवलं होतं. मनोमन नामस्मरण करत दर्शनाच्या ओढीनं आम्ही बसत, कठड्याला टेकून डुलक्या घेत वेळ घालवत होतो.दवाने कपडे ओलसर झाले होते साडेचारपासून एकेक गृप दाखल होऊ लागले. 6 पर्यंत १००-१५० जण सहज जमले. पुजारीबाबांनी येऊन पूजा ,आरती,शंखनाद केला आणि दर्शनासाठी दार उघडले, सार्थक झाले. क्षुद्र भक्ताची काळजी वहाणा-या त्या भक्तवत्सलाच्या चरणांवर लोटांगण घातले. फटफटीत उजाडलं होतं. उतराला सुरुवात केली तेव्हा रात्री हे सर्व कसे चढलो असं आश्चर्य वाटत होतं. उतरून आलेलं गोरक्षशिखर चढताना वाट संपतच नव्हती पण एवढं चढताना थकलो,गळून गेलो असं वाटत नव्हतं.

पूर्ण गोरक्षशिखर चढून उतरून अंबाजी मंदिराशी येईपर्यंत साडेआठ वाजून गेले होते. १२ तास+ तहान, भूक,आणि शरीराचे सगळे इतर आवेग विसरून वारी संपन्न झाली हे केवढे आश्चर्य !!!सगळंच अलौकिक !!!अवर्णनीय !! . रोपवेने परत खाली आलो आणि अशी ही आमची वारी सुफळ संपूर्ण झाली, ही त्या दत्तगुरुंची कृपा. तारकमंत्रातले..

"**कितीदा दिला बोल त्यानीच हात,**


**नको डगमगू स्वामी देतील साथ**"

खरं आहे पूर्णत्वाने पटलं.कारण त्यानीच ही अगम्याची वारी घडवली होती.

|| **श्री गुरुदेव दत्त** ||

# माझी अनोखी गिरनारवारी: श्वानाच्या रुपात दत्तदर्शन

सौ.रुपाली दिलीप साठे
पुणे



वयाच्या सोळाव्या वर्षी पासून स्वामींच्या सेवेत ते आज तागायत त्यांच्या कडेवर आहे मी. माझी माय बाप आहेत स्वामी.

पुस्तकांच्या सेवेतूनच मला: प्रमोद केणे यांचे पुस्तक मिळाले व गिरनार काय हे हे समजले. चार-पाच वर्षापासून गिरणारला जाण्याची खूप इच्छा परंतू योग काही येत नव्हता. छोटी बहिन कॅन्सरने ग्रस्त होती तीच्या सेवेतच होते. तीलाही जाण्याची खूप इच्छा, ताई काही झाल तरी गिरणारला जायच आपल्याला. नियतीच्या मनात नव्हते आम्ही दोघी सोबत जावा, ती खऱ्या अर्थाने स्वर्गात गेली ते महाराजांना भेटायला. २५ डिसेंबर २०१८ रोजी त्यानंतर कोरोना आला तो गेला. त्यानी शिकवल अर्जंट काही नसत. ११ फेब्रुवारी २०२१ सकाळी सहा वाजता मेसेज वाचला गिरणार यात्रा. माझे दिर डॉ. बाबासाहेब मानकर यांच्या दत्तसेवा परिवार यांच्या ग्रुपवर सकाळीच फोन केला. भाउ मी येणार माझं नाव घ्या यादीत, अशा रितीने महाराजांच बोलवण आल. खुप उत्साह, उत्सुकता, ओढ जायची काय करू काय नाय. नुसताच आनंद बहिणीची प्रचंड आठवण ती असली तर आपण गेलो असतो सोबत. डोळे भरून आले काय कराव? काय घेऊन जाऊ तिची आठवण तिकडे? कोणाला काहीच सुचना मग लक्षात आल तिचा चिता भस्म मी ठेवला होता. तिचा मुलगा त्याच्या साठी

अंगारा म्हणून असाच मायेपोटी. कारण तो माझ्याकडेच रहाणार होता, ‘मायमरो मावशी जगो’. वय वर्ष ८ त्याच.

असो मग काय पॅकींग झाल. आम्ही म्हणजे मी, माझा मुलगा आदित्य वय १८ वर्ष, बहिनीचा मुलगा अधिराज ११ वर्षे, मोठ्या बहिणीची मुलगी प्राजक्ता वय २० वर्ष आणि आकांक्षा वय १७ वर्ष आणि माझी पुतण्याची बायको अंजली वय २१वर्ष अशी माझी टिम. दत्तसेवा परिवारची ७० लोक अशी आम्ही सर्व ८० जण होतो. कधी एकदाच पोहचतोय खुप उत्साह होता जाण्याचा. पुणे स्टेशनवर आलो आणि एक विपरीत घडल, माझी तारीख नसताना मला मासिक पाळी आली आणि मी तिथेच थबकले, पण कोणाला सांगणार काय करणार? माझ्या पोरीचा उत्साह पाहुन मी गप्प बसले आणि जुनागड ला गेल्यावर ठरवू काय ते म्हणाले. अखेर पोहचलो जुनागडला, लालजी आश्रम दुसरा मजला जिथून दत्तशिखराचे दर्शन झाले. धन्य पावले महाराज आता बस इथुनच भरून पावले मी. माझी मुल समजुतदार तीही स्वामी सेवेत असतात कायम. त्यांना सांगीतल बाळांनो शिखरावर मी नाही येऊ शकत, तुम्ही जा. मी खालीच थांबते. खुप समजावलं पण पोर ऐकनात मग काय करु.

आम्ही जिथे थांबलो त्या पॅसेजमधे गेले. दत्तशिखराकडे मांडी घालुन बसले आणि महाराजांना म्हणाले, “महाराज मी एक शरीर म्हणून नाही तर, एक आईचा आत्मा बोलते. गुरुराया मी कधीही येईन परत शिखरावर, माझी दोन पोर येतील पण, या मुली नवऱ्याच्या घरी गेल्यावर येतीला का नाही माहीत नाही. माझी मुल माझ्याशिवाय नाही तयार बाप्पा, मी एक निर्लज्ज आई म्हणून तुझ्या शिखरावर येत आहे. या माउलीला माफ कर. आईला सर्व काही माफ असत ना! गुरुमाऊली पण मी येईन पण तुझ पावित्र्य भंग नाही करणार. मी काही दुरुन दर्शन घेईन. तुझ्या चरणावर माझी सावली नाही पडु देणार पण माझ्या लेकरांना दर्शन घडुदे रे !! मी क्षमा मागितली अन गिरणार चढण्यास सुरुवात केली. एवढंच माहिती होत की १०००० पायऱ्या चढायच्यात.

८० लोकांमध्ये माझी मुल लहान होती, सगळ्यांना वाटलं ही मुल चढतील का? पण आश्चर्य असं की, सर्वात आधि माझी मुल होती शिखरावर. महाराजांची कृपा म्हणायची. एक एक पायरी चढत होते पायऱ्या काही संपत नव्हत्या सगळे जण इइकड-तीकडे झाले. कोणी मागे, कोणी पुढे माझी मुल कधीच निघुन गेली होती. मी कासवाच्या गतीने जात होते. महाराजांची माफी मागत होते. दत्तगुरु आई मला माफ कर गं! मी एक निर्लज्ज आई आहे, या माझ्या मुलांसाठी या अवस्थेत मी शिखर चढत आहे, पण बाप्पा तुझ्या गाभाऱ्यात नाही हा येणार खालीच सुरक्षीत अंतरावर बसेल बाप्पा. असं करत माफी मागत चालत होते. खर सांगु गिरणार असं स्थान ठिकाण आहे भल्याभल्यांचा माज मोडतो. तिथं कोणी गरीब नाही, कोणी श्रीमंत नाही. इथे फक्त तुम्ही, तुम्ही आणि स्वतः तुम्ही पायऱ्या चढून वरती जायचय. तुम्ही आणि तुमचे कर्म बस. बघता बघता आंबा माता मंदीर आले सगळे कस स्वर्गासारख वाटत  होत. वरून जे तलेठी गाव दिसत होत ना त्याच वर्णन नाही सांगु शकत. बघता बघता गोरक्षनाथ शिखर आलं. आतापर्यंत फक्त पायऱ्या चढत होते, कुठेही पायऱ्या उतरलो नाही. अंबामाता मंदीरापर्यंत पायऱ्या चढायच्या होत्या. तो आयुष्याचा चढ़ होता खरी आता सुरुवात आयुष्याच्या उतारावर. गोरक्षनाथ शिखर आले आणि फक्त पायऱ्या उतरायला सुरूवात झाली. १५०० हजार पायऱ्या उतरल्यावर दोन कमान होत्या. गुरु शिखर आणि कमंडलू कुंड. गुरु शिखराच्या कमानीतून पुन्हा पायऱ्या चढायच्या होत्या. बापरे काय हे! ‘महाराज कुठे आहात तुम्ही कुठे जाऊन बसलाय आपण. गुरुराया शक्ती दया, बळ दया, माफी दया. पायऱ्याचा चढउतार जीवनाचा चढ उतार वाटत होता. खुप काही वेगळच फिल होत होत. प्रचंड उर्जा होती तीथ.

बघता बघता गुरुशिखर आले. पहाटे पाच वाजले होते. मी हळूहळू नकळत ३० ते ४० पायऱ्या सोडून कोपऱ्यात बसले. मंदीर उघडले नव्हते,पुजारी आले नव्हते. काही वेळाने पुजारी आले ५० जण तरी असतील पायऱ्यांवर बसलेले, दत्तनामाचा जयघोष झाला. मंदीर उघडले आणि सगळे जण दर्शन घेऊन बाहेर येत होते. आणि मी एव्हढे चढून ही गप्प कोपऱ्यात बसले होते. डोळे बंद केले

आणि रडत होते. मनात बोलत होते, “हे भगवंता काय रे हा बाईचा जन्म घाणेरडा दिलाय, तुझ्या जवळ असुन तुझं दर्शन नाही. शरीर विटाळाच आहे रे पण आत्मा तुझा रे. ‘गुरुराया दर्शन दे मला दर्शन हे आणि मी डोळे उघडले. पहाते तर एवढ्या गर्दीतून एक श्वान माझ्या पुढे येऊन थांबले. मला काय वाटले, मी माझ्याकडचे बिस्कीट दिले तर ते खाईना. मनात बोलले महाराज खाकी ओ. आणि त्यांनी बिस्कीट खाल्ले. विशेष म्हणजे माझ्याकडेच तोंडाजवळ तोंड करून उभे होते, मग मी सहजच महाराजांच्या पादुकांना स्पर्श करून आणलेले (माझ्या मुलाने) ड्रायफ्रुटस आश्चर्य म्हणजे सगळे ड्रायफ्रुट त्या श्वानाने खाल्ले. लोक पहातच राहिले, हे काय? आणि खाउन झाल्यावर ते माझ्या मांडीच्या समोरच बसले ध्यानाला.त्याचे डोळे भगवे होते. आणि विशेष म्हणजे, त्याला कोणीही चढताना किंवा उतरताना पाहिले नाही. खर सांगु मला महाराजांनी दर्शन दिले जणू. आणि एक सांगायचे, माझी  बहिणही गिरणार चढली. तिचा चिताभस्म तिथेच वायुविहार केला. दत्त महाराज खरच खुप दयाळू, कनवाळू आहेत. मी नाही गाभाऱ्यात जाऊ शकले तर त्यांनी असे दर्शन दिले मला. जय गिरणारी तेरा भरोसा भारी. त्यानंतर महाराजांची इतकी कृपा झाली, की फेब्रुवारी पासुन ते जानेवारी २०२२ पर्यंत शाकंभरी पौर्णिमा माझी पाचवी वारी आहे.

॥ **श्री गुरुदेव दत्त** ॥



**आशा आहे या अनुभवांमुळे आपली दत्त भक्ति**

**अधिक दृढ होईल, असेच अनेक अनुभव पुढील**

**भागात आपण वाचू शकाल. लवकरच**

**दूसरा भाग घेऊन येत आहोत. धन्यवाद !!**

**Team JK Bhakti**